साप्ताहिक

# माणूस

१६ ऑक्टोबर ८२ दोन रुपये



"मला त्यांच्याकडून खूपच शिकता आलं. माझी त्यांची गाठ पडली हे माझं सुदैव!"

—विल्यम शिरर



"बेरुतवर आम्हाला कब्जा करायचा असता तर जगातली कोणतीही शक्ति मला थोपवू शकली नसती!"

शेरॉन

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : बाविसावे

अंक : एकोणिसावा

१६ ऑक्टोबर १९८२

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

अनंत सालकर

□

## सप्रेम नमस्कार

□ आपल्या ता. १८ सप्टेंबरच्या अंकात 'तथास्तु' या संपादकीयात 'मर्ढेकर–गाडगीळ सत्यकथेद्वारा पुढे आले' असे वाक्य आहे. मला गंगाधर गाडगीळांच्यापुरता (हेच गाडगीळ आपणास अभिप्रेत असतील तर) खुलासा करायचा आहे.

गाडगीळांची पहिली गोष्ट 'प्रिया आणि मांजर' वाङ्मय–शोभेच्या जून १९४१ च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे. दुसरी 'पुरुषस्य भाग्यम्' सप्टेंबर ४१ मध्ये, तिसरी 'तुळसाचे लग्न' जानेवारी ४२ मध्ये प्रसिद्ध झाली आणि मग त्यांच्या गोष्टी येतच राहिल्या आणि १९४६ साली 'मानसचित्रे' हा त्यांच्या कथांचा संग्रह मी प्रसिद्ध केला. त्या संग्रहाला प्रस्तावना तात्यासाहेब केळकरांची आहे. गाडगीळांच्या सूचनेवरूनच मी ती मिळवली. 'बाई शाळा सोडून जातात' ही तात्यांना अतिशय आवडलेली उत्तम गोष्ट त्यात आहे.

गाडगीळांच्या कथांचा पहिला सूर विनोदी स्वरूपाचा होता. पुढे त्यांनी तो बदलला; पण त्यांच्या पहिल्या कथांत जे वेगळेपण होते तेही उल्लेखनीय होते. यशवंतराव पेंढारकरांच्या घरी वि. स. खांडेकरांची गाठ पडली तेव्हा त्यांनी मोठ्या उत्सुकतेने या उदयोन्मुख लेखकाची चौकशी केली. कथासंग्रह काढताना मात्र विनोदी कथा त्यातून गाडगीळांनी वगळल्या; पण पहिली कथा म्हणून, 'प्रिया आणि मांजर' त्यात घेतली.

तात्यांची प्रस्तावना गाडगीळांना पुरेसा न्याय देत नाही असे वाटल्यावरून मी 'प्रकाशकाचे पान' जोडले आणि त्यांचे 'नवेपण आणि वेगळेपण' दाखवून दिले. गाडगीळांना जर हिऱ्याची उपमा दिली तर त्याला पैलू पाडण्याचे श्रेय भागवत किंवा चित्रे यांनी घेतले तरी चालेल. मर्ढेकरांनी ती हिरकणी आपल्या आंगठीत घालून मिरवली असेल; पण निदान ही काच नसून हिरा आहे एवढे ओळखण्याचे श्रेय तरी मला मिळावे.

गाडगीळांनी स्वतः 'अनुष्टुभ' नावाच्या नियतकालिकात हे श्रेय मला दिले आहे. त्यांच्या पहिल्या कथा 'साभार परत' करणाऱ्या संपादकांना त्यांनी 'झब्बू' म्हटले असून मी झब्बू नाही असे त्यांनी मला शिफारसपत्र लिहिले आहे. दूरदर्शनवरील त्यांच्या मुलाखतीतही 'बाई शाळा सोडून जातात' ही कथा मला आवडल्याचा त्यांनी साक्षेपाने उल्लेख केला होता.

'सत्यकथा' बंद पडल्याचे मलाही दुःख होते; पण मुंबईच्या एका दैनिकाने, 'गोखले–गाडगीळ हे सत्यकथेत प्रथम लिहिणारे लेखक' म्हणून त्यांचा उल्लेख केला. आज तुम्हीही गाडगीळांचा उल्लेख केलात. तेव्हा सध्याच्या साहित्यिक जमान्यात ते पक्के होऊन बसेल–म्हणून ही सत्य घटनेची नोंद मी करीत आहे.

२९ सप्टेंबर — मनोहर महादेव केळकर
संपादक, वाङ्मय–शोभा, पुणे

□ मी आपल्या 'माणूस'ची नियमित वाचक आहे. लेखनाचा दर्जा आपण कायम ठेवला आहे.

मी ३१ जुलै, ७ ऑग. २८ ऑग. ४ सप्टें. हे चार अंक वाचले. त्यातील 'सूर्य'ची भाषांतरे फारच छान वाटली माझ्यासारख्या वाचकांना बातमीतून अन्वयार्थ काढता येत नाही. राजकारणावरील 'तयार' लेखांवरूनच राजकारण कळते. अशांना तर हे लेख मेजवानीच. सुशिक्षित स्त्रिया (व पुरुष) सहसा इंग्रजीतून राजकारणावरचे लेख वाचणे टाळतात. ह्या चार लेखांकांनी सर्व थरांपर्यंत राजकारण व त्याचा अतर्क्य गलिच्छपणा जाऊन पोहोचेल निश्चित.

श्री. जैन हे सत्ताधारी पक्षाशी इतक्या धीटपणे, परखडपणे बोलताना पाहून 'अजूनही काही होऊ शकेल' ही आशा वाटते. ब्रह्मचारी, मनेका यांचं गलिच्छ राजकारण उघडकीला आणणारा हा एकांडा शिलेदार! टोल्याला प्रतिटोला हाणण्याचं त्याचं धैर्य विलक्षण आहे. सिंहाच्या गुहेत जाऊन एखाद्या उंदराने 'तुझ्या अंगाला घाण वास येतो' हे म्हणण्याच्याबरोबरच त्यांची त्या बड्या त्रयीशी झडलेली प्रश्नोत्तरे आहेत.

हे लेख भाषांतरित वाटत नाहीत. कुठेही सांधा खटकत नाही. तरीही ७ ऑ. च्या अंकात सर्वत्र इंग्रजी प्रतिशब्द दिले आहेत ते का? कारण भाषांतर अगदी सुस्पष्ट आहे.

गेल्या वर्षीच्या 'माणूस' दिवाळी अंकातील 'भिंती' या दीर्घकथेनंतर खडपेकराचे हे चार लेखांक म्हणजे 'माणूस'चे वैभव आहे. तसेच मेघा देशपांडेचा (धीरेंद्र) 'ब्रह्मचारी'वरचा लेखाकही छान आहे.

तरीही एक प्रश्न मनात उठतो तो असा की, ह्या स्फोटक घटनेवरील लेखाकांचे संपादन जे आपण एवढ्या धाडसाने केलेत, त्या लेखाकांची जाहिरात आपण कोणत्याही सर्वाधिक खपाच्या दैनिकात केली का नाही? त्या योगाने त्यांचा सर्वत्र प्रसार झाला असता, चर्चा झाल्या असत्या; पण तसे झाले नाही.

डोंबिवली हे वाचन-रसिकांचं शहर आहे. पण तेथेही जाणवले की, असे स्फोटक लेखाक 'माणूस'मध्ये येत आहेत, हे फार कमी लोकाना माहीत आहे.

तुमच्या धाडसी संपादनाचा, लेखिकेच्या परिश्रमांचा फायदा जनमानसांपर्यंत पोचवण्यासाठी तुम्ही त्या लेखाकांची जाहिरात केली असती तर बरे झाले असते असे मला वाटते.

'माणूस'ने आतापर्यंत लोकांना खूप काही दिलेले आहे. यापुढेही 'माणूस' असाच उत्तरोत्तर विषयांच्या वैविध्याने समृद्ध राहील असा विश्वास आहे.

२७ सप्टेंबर — सुवर्णा पाध्ये, डोंबिवली पूर्व

◻ मध्यन्तरी 'माणूस'चं काही खरं नव्हतं बाकी! पण 'वर्धापनदिना'नंतर मात्र एकदम कात टाकली जणू 'माणूस'ने. आजकाल माणूस दुर्लक्ष न करता येण्याइतका महत्त्वाचा वाटू लागला

रेखा देशपांडे, निखिल वागळे, द्वारकानाथ संझगिरी वगैरे मंडळी 'माणूस'मध्ये आजकाल भेटतात—छान वाटतं. 'लाल राज्यातली वार्तापत्र' मला वाटतं अपुरंच राहिली—उरलेल्यांचा जरूर 'इंतजार' आहे. आतापर्यंत 'स्पोर्टस्'ला 'माणूस' मध्ये जागा नव्हती. तेही सुखद आश्चर्य अलीकडे. मात्र अपेक्षा एकच की, दहा ठिकाणी आलेल्या लेखाची ठिगळे वापरून केलेली 'गोधडी' नसावी..काही तरी नवीन असावे.मेधा देशपांडे-'पुणे वार्ता' आणि ललिता बर्वे—'मुंबई वार्ता' चांगल्याच पेश करतात.

'सबला' हे प्रकरण तसे कशासाठी नेमके होते समजले नाही खैर. जयंत प्रधानाची 'दोन कॉम्रेडस्' मात्र जबरदस्त का. सलाम काय अफलातून ग्रेट असेल ना! जगप्रसिद्ध पुस्तकाचे अनुवाद ही माणूसची 'खासियत'च आहे.

तर 'माणूस' चे हे 'ईस्टमनकलरपण' टिकावे हीच शुभेच्छा!

२४ सप्टेंबर — सुरेखा जोशी, देवरुख

◻ मी साधारणत. सर्वच मराठी साप्ताहिके नियमित वाचीत नाही; परंतु नजरेखालून 'माणूस' साप्ताहिक मात्र अवश्य जाते. आपल्या २५ सप्टेंबरच्या अंकातील सर्वच लेख वाचनीय आहेत. त्यातील उल्लेखनीय बाब म्हणजे नुकतेच मॅगसेसे पारितोषिक प्राप्त झालेले थोर कार्यकर्ते, उरळी–कांचनचे श्री. मणिभाई देसाई यांच्या कार्याची माहिती आपण वाचकांना करून दिलीत. हे औचित्याला धरूनच नाही का? अशी माहिती माझ्या वाचनात तरी नाही!

२३ सप्टेंबर — शाम गणेश गोरे, अहमदनगर

◻ दि. २५ सप्टेंबर १९८२ च्या 'माणूस' मधील 'पुणे वार्ता' हे सदर वाचले. महाराष्ट्र साहित्य परिषदेत 'सत्यकथे'च्या अस्तावर झालेल्या चर्चेचा मागोवा 'इतिश्री सत्यकथा' या शीर्षकाखाली घेतलेला आहे. तो अतिशय नेमकेपणाने घेतलेला आहे.

परंतु प्रा. स. शि. भावे यांच्या बोलण्यातील काही तात्त्विक विचार त्यात आले असते तर या नेमकेपणाला पूर्णता आली असती. हे विचार या मागोव्यात राहून गेलेले दिसतात.

हे तात्त्विक विचार असे : 'दर महिन्याला वेळेवर परिपूर्ण कलात्मक अंक काढण्यामागे 'सत्यकथे'ची सत्त्वशील अभिजात व्रतभावना होती. दुसरीकडे, 'सत्यकथा' ही एक सामाजिक चळवळ होती आणि कोणत्याही सामाजिक चळवळीला सामाजिक संस्थेचे अधिष्ठान लागते; परतु, सामाजिक संस्था म्हटली की शुद्ध सत्त्वशीलतेत तडजोड आली. टक्केवारीने तडजोड करणे म्हणजे शुद्ध सत्त्वशीलता बाजूला सारणे. हे 'सत्यकथे'ने नाकारले. त्यासाठी तिने संस्था होण्याचे नाकारले.आत्महत्या पत्करली आणि एखाद्याने आपल्या तत्त्वासाठी संस्था होण्याचे नाकारले, तर त्याला आपण 'का?' असे विचारू शकत नाही.

'वास्तविक अशी सत्त्वशील अभिजात वृत्ती टिकावी ही प्रवृत्तिवादी व्यक्तीची सामाजिक जबाबदारी असते, पण आजच्या उपयुक्ततावादी सामाजिक रचनेनं अशा वृत्तोला किंमत दिली जात नाही. अभिजात सत्त्वशीलता ही conformist होण्याचे नाकारते संस्था होण्याचे नाकारते. तिने आपण होऊन एकटेपणा पत्करलेला असतो. या व्रताची शुद्धता टिकविणे हे आज या प्रवृत्तिविरोधी शक्तीमुळे कठीण झाले आहे. त्यामुळे आजच्या सामाजिक धारणेकडे पाहता, शुद्ध अभिजात सत्त्वशीलता, त्याविरुद्ध तशी नसणारी, तडजोड करायला लावणारी दुटप्पी वृत्ती असा मूलभूत संघर्ष दिसतो. अभिजात सत्त्वशीलता जपू पाहणाऱ्या प्रत्येकाच्याच वाट्याला हा संघर्ष येतो. त्यासाठी, संस्था होण्याचे अमान्य करून सपणे पत्करण्याच्या निर्णयाला प्रश्न विचारायचे नसतात. 'सत्यकथे'चे बंद पडणे हे अशा अपरिहार्य संघर्षातून, त्यातल्या निर्णयातून आलेले आहे.'

३० सप्टेंबर — मीना संगमनेरकर, पुणे

२५ सप्टेंबरच्या आपल्या अंकातील 'श्री. अरुण शौरी आणि त्याची पत्रकारिता' हा प्रा. ह. म. घोडके याचा लेख आवडला श्री. अरुण शौरी यांच्या पत्रकारितेची काही ठळक वैशिष्टये त्यानी मांडली व ती खरी आहेत; परंतु भ्रष्टाचाराविरुद्ध श्री. शौरी यांनी अघोषित युद्ध सुरू केले आहे असे म्हणणे मात्र हास्यास्पद ठरेल. कारण, ते स्वतःच भ्रष्टाचाराच्या घरात राहतात. त्यांची रोजीरोटीही त्यावरच अवलंबून आहे. गोयंकासेठ किंवा त्यांचा इंडियन एक्स्प्रेस म्हणजे महात्मा गांधीचा 'हरिजन' नव्हे. काचेच्या घरात राहणाऱ्याने आज बाहेरच्यावर केलेली ती दगडफेक आहे.ती त्याच्या स्वत.वरही उलटू शकते. इंदिरा गांधीच्या भ्रष्टाचाराविरुद्ध बोलणारे, लिहिणारे सारे हरिश्चंद्राचे अवतार आहेत असे कृपया कोणी समजू नये. हां, प्रसिद्धीच्या झोतात मात्र ते येऊ शकतात.

२९ सप्टेंबर — वसंत लुले, नागपूर

◻ माणूसचा प्रत्येक अंक उत्सुकतेनं वाचतो. ज्ञान आणि मनोरंजन याचा सुरेख संगम, विविध विषयांवरील उद्बोधक लेख, विल्यम शेररच्या 'Gandhi–a memoir'वरील लेखमाला, आचार्य रजनीश, मणिभाई, जब्बार वगैरे सारं काही चागलं आहे. हे सात-यानं टिकलं तर 'माणूस'चा भविष्यकाळ उज्ज्वल आहे अशी खात्री वाटते.

तुमचे संपादकीय अग्रलेखही आवडले, त्यातील आठवतात ते राष्ट्रपतींची निवड, रामाची सीता (की रावणाची?) सत्यकथेचं तथास्तु वगैरे.

१ ऑक्टोबर — रंगा मराठे, पुणे

## पुणे वार्ता

# मैफिल

मैफिली रंगवणारी माणसं वेगळीच असतात! ती कधी रंगतात आणि आपल्याला रंगवून टाकतात, पत्ताच लागत नाही. परवा अशीच एक मैफिल रंगली होती. बाबासाहेब पुरंदऱ्यांनी त्यांच्या नेहमीच्या सफाईनं ती रंगवली होती.

बाबासाहेबांना नुकतीच साठ वर्षं पूर्ण झाली. साहित्यपरिषदेनं हे निमित्त साधून ४ ऑक्टोबरला त्यांची प्रकट मुलाखत घ्यायचं ठरवलं. प्रश्नकर्ते होते श्री. ग. वा. बेहरे, सौ. वीणा देव, वि. ग. कानिटकर आणि द. मा. मिरासदार. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते परिषदेचे अध्यक्ष श्री. ज. जोशी.

संध्याकाळी ६॥ वाजता मुलाखत सुरू होणार होती. सहा वाजताच ट्रेनिंग कॉलेजचा हॉल पूर्ण भरला होता. ६॥ वाजता आलेले लोक दारं–खिडक्यांत उभे होते.

मुलाखतीला सुरुवात केली बेहेऱ्यांनी. ते सुरुवातीलाच म्हणाले, 'आम्ही चौघांनी मुलाखतीची अशी तयारीच केलेली नाही; (मैफिली रंगतात त्या अशा!) पण एक मात्र नक्की की, आम्हा सगळ्यांना बाबासाहेबांबद्दल प्रेम, आदर आहे. या झपाटलेल्या झाडाची स्वप्न, उपक्रम समजावेत हा आमचा हेतू आहे.' बेहेऱ्यांचा पहिला प्रश्न होता–– शिवशाहिरीच्या या वेडानं तुम्हाला द्रव्य, मान मिळाला. आता इतिहासातील इतर व्यक्तिमत्त्वांच्या चरित्रमाला गुंफाव्यात असं तुम्हाला वाटत नाही का?

बाबासाहेब म्हणाले, 'असं मनापासून वाटतं; पण शिवचरित्रातच इतकी नवीनवी माहिती उपलब्ध होत आहे की, ती माहिती लोकांपर्यंत पोचवायला मी एकटा अपुरा पडेन असं वाटतंय.' ते म्हणाले, 'अनेक ऐतिहासिक व्यक्तींवर अन्याय होत आहे तर काहींची वारेमाप स्तुती! या सगळ्यांचा अभ्यास करावा असं मला प्रामाणिकपणे वाटतं; पण सध्या तरी माझ्यामागे शिवचरित्र सांगणारा माणूस मला कोणीही दिसत नाही!'

नंतरचा प्रश्न होता–इतिहासलेखनपद्धतीबाबत. वीणा देव म्हणाल्या, 'आपल्या इतिहासलेखनावर नैतिकतेचा, आदर्शाचा इतिहास असा आरोप आहे. वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून इतिहासाचं परिशीलन व्हावं, त्यासाठी वेगळ्या पद्धतीनं इतिहास मांडला जावा असं तुम्हाला वाटतं का?'

कोणत्याही इतिहाससंशोधकाचं याबाबत दुमत असायचं अर्थातच कारण नाही. पुरंदरे म्हणाले की, आज इतिहासलेखनात दिसते ती व्यक्तिपूजा, वीरपूजा. वस्तुनिष्ठ लेखनासाठी ऐतिहासिक व्यक्तींच्या चुका सुद्धा स्पष्ट शब्दात मांडायला हव्यात. जसं संभाजीराजांनी मोगलांचा आश्रय घेतल्यानंतरही शिवाजीनं त्यांना माफ करणं, या ठिकाणी ते थिटे पडतात हे नाकारून चालणार नाही.

ज्या देशाला संस्कृती आहे त्या देशातले लोक इतिहासाशी नातं जोडणारच. शिवाजीराजे हा तर आपला गौरवशाली इतिहास! तीनशे वर्षांपूर्वीचा हा इतिहास ऐकताना वाटत रहातं, त्या वेळचे प्रश्न वेगळे, उत्तरं वेगळी. आजच्या पिढीचं आणि शिवाजीराजांचं काही एकसंध नातं आहे का? असावं का? आजच्या तरुण पिढीचा हा प्रश्न वि. ग. कानिटकरांनी विचारला. कानिटकर म्हणाले, 'आजचे थोर थोर नेते सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी देव–देवतांचं महत्त्व कमी करा असं म्हणताहेत. तशा बातम्या आम्ही पेपरमध्ये वाचतो, ऐकतो. अशा वेळी शिवशाहिरी आम्हाला प्रतिगामी वाटते. तुम्हाला काय वाटतं?'

ते म्हणाले, 'आजच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रश्नांची पाळंमुळं खोल आहेत. शिवाजीचा अभ्यास राष्ट्रनिर्मितीच्या दृष्टीनं व्हायला पाहिजे. कोणतीही गोष्ट एकदम घडत नाही. त्याच्यामागे प्रवाह असतात. शिवाजी या माणसानं राष्ट्रनिर्मितीचा एकेक बिंदू ओळखला आहे. त्याचे धागे शोधताना आपण प्रतिगामी ठरणार आहोत का? शिवाजीचे त्या काळातले प्रगत विचार सांगताना ते म्हणाले, 'ज्या धर्मपीठांनी, पंडितांनी समुद्रबंदी घातली, टिळकांच्या काळात त्यांना त्यासाठी प्रायश्चित्त घ्यावं लागलं, ती बंदी तोडण्यासाठी शिवाजीनं शंकराचार्यांची परवानगी मागितली नाही तर आरमाराला आज्ञा केली की, राष्ट्राच्या उभारणीसाठी, संरक्षणासाठी जाता येईल तितकं पश्चिमेकडे जा. महाराष्ट्रात क्षत्रिय कोणी राहिलं नाही असा ओरडा करणाऱ्या पंडितांसमोर त्यांनी 'क्षत्रियकुलावतंस' अशी पदवी घेतली. क्षात्रतेजाचं पुनरुज्जीवन त्यांनी केलं, राष्ट्रनिर्मितीचा पाया रचला. आज राष्ट्रनिर्मितीचा विचार करण्यासाठी ही पाळंमुळं शोधायला पाहिजेत म्हणजे पुढचे प्रश्न लवकर सुटतील.'

द. मा. मिरासदारांनी त्यांना खास 'सर्वसामान्यांचे' प्रश्न विचारले. उदा. शिवाजीला लिहिता–वाचता येत होतं का? आणि शिवाजी–रामदासस्वामी यांचं नेमकं नातं कोणतं?

शिवचरित्रावरचा प्रतिगामित्वाचा आरोप खोडून काढताना बाबासाहेब रंगत चालले होते. आता तर त्यांना नेमका प्रश्न सापडला. त्यांनी शिवाजी आणि त्याआधी शहाजीराजे, जिजाऊ आणि त्यांचं कुटुंब शिक्षित नाही तर सुशिक्षित होतं याचं साधार विवेचन केलं. आबासाहेब मुजुमदारांना सापडलेल्या पत्रात 'जय भवानी' हे अक्षर जिजाबाईंचं असल्याचा पुरावा दिला. ऑस्टिननं (ईस्ट इंडिया कंपनीतला अधिकारी) आपल्या पत्रात दिलेला Raja read the letter and signed it हा दाखला दिला. १६६४ मध्ये गागाभट्टांना राजांनी शंकराचार्य, मंडनमिश्र आणि कुमारिलभट्ट यांचा त्या त्या काळातला द्वैत–अद्वैताबद्दलचा वाद ग्रंथित करण्याबद्दल विनंती केली होती, ते सांगितलं. बाळकृष्णबुवा संगमेश्वरकर यांना 'करणकौस्तुभ' लिहिण्याबद्दल शिवाजीराजांनीच सांगितलं होतं. शिवाजीच्या पदरी ३३ पंडित होते.

येवढे पुरावे दिल्यानंतर मिरासदारांच्या भवानी तलवारीबाबतच्या कुतूहल-बद्दल ते बोलले. बॅ. अंतुल्यांनी फेमस केलेल्या या तलवारीबद्दल उत्सुकता होतीच!

बाबासाहेब म्हणाले की, लंडनच्या बकिंगहॅम पॅलेसमध्ये आहे ती 'जगदंबा' तलवार,

भवानी नव्हे; पण सातारची तलवार 'भवानी' असण्याची जास्तीत जास्त शक्यता आहे.

शिवाजीची प्रतिमा आपलं सरकार सर्वधर्मभावी राजा अशा शब्दात उभी करत आहे. त्याबद्दल तुम्हाला काय वाटत ? या बेहेऱ्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, 'खरा शिवाजी तुम्हाला सोसणार नाही. तुमच्यासाठी सर्वधर्मं समभावी शिवाजीच ठीक आहे. शिवाजी सर्वधर्मसमभावी होता हे वेगळं सांगायलाच नको; पण तो समभाव एका समर्थ, पुरुषार्थी, शूर माणसाचा होता, भेकडाचा नव्हता. वेळ आली तेव्हा मिशनऱ्यांचे हात तोडायला त्यानं कमी केलं नाही. औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रात 'जे मुसलमान नाहीत हा त्यांचा दोष आहे का ?' असा परखड प्रश्न विचारला. सर्व धर्मपंडिताना त्यानी योग्य मान दिला; पण त्याचा राजकीय हस्तक्षेप स्पष्टपणे दूर ठेवला. या पार्श्वभूमीवर शिवाजीच्या 'सर्वधर्मसमभाव' या प्रतिमेचा आपण वर्तमानकालीन राजकीय व्यापार करत आहोत असं वाटतं.'

नंतरचे प्रश्न बाबासाहेबांना त्याच्या जुन्या आठवणी सांगायला लावणारे होते. पिसाळ घराण्यातले कागद मिळवताना झालेली गमत, रामोशी घराण्यातली सुरेख तलवार हातात आली त्याची कथा, न. चि. केळकरानी केलेलं त्यांच्या लिखाणाचं कौतुक, 'आणखी लिही' म्हणून दिलेलं प्रोत्साहन. ते म्हणाले, 'इतक्या असंख्य आठवणी आहेत. त्यातल्या काही खारट-तुरट आहेत; पण तिकडे दुर्लक्षच केलेलं ठीक. त आपल्या खानदानीला शोभणार नाही.'

मुलाखत संपत आली. कानिटकरानी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला. त्यांनी बाबासाहेबांना त्याच्या शिवचरित्रातल्या प्रस्तावनेची आठवण करून दिली.त्यातला गांधीच्या अहिंसक शिकवणीचा आणि मार्क्सच्या समाजवादाचा त्या वेळच्या समाजमनावरच्या विचारसरणीचा प्रभाव आणि 'शिवाजी' हा मंत्र विसरला गेला तर या दोन्ही 'वादां'चा उपयोग नाही हे त्या वेळचं प्रस्तावनेतलं प्रतिपादन मान्य करून कानिटकर म्हणाले, 'आता या दोन्ही विचारसरणींचा प्रभाव ओसरला आहे असं नानासाहेब गोऱ्यांसारखे नेते म्हणतात. मग पुढे काय ?'

बाबासाहेब म्हणाले, 'शिवाजी हे तत्त्वज्ञान आहे, राष्ट्रनिर्मितीचा गाभा आहे. ब्रिटिश माणसाच्या जसा नेल्सन रक्तात आहे, चर्चिल रक्तात आहे तसा जेव्हा शिवाजी आपल्या रक्तात भिनेल तेव्हा आपण टिळकाचा, शिवाजीचा, चाणक्याचा, श्रीकृष्णाचा वारसा सागू शकू शिवाजीचं तत्त्व जेव्हा आपण विसरू तेव्हा दुसऱ्या बाजीरावाची कारकीर्द सुरू झाली असेल !'

त्यानंतर वीणा देव यांनी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला–'बाबासाहेब, तुम्ही घाशीराम पाहिलात का ? कधी ? नाटक पाहून तुम्हाला काय वाटलं ?'

सहा महिन्यांपूर्वी बाबासाहेबांनी 'घाशीराम' पाहिलं. ते त्यांना सकारण आवडलं. दिग्दर्शनामुळे. तेंडुलकरांना इतिहास कळलेला नाही. अगदी नाना फडणविसांमधला 'ना' सुद्धा ! हे त्याचं मत. त्यातल्या असंख्य चुकांपैकी 'दिव्य' करण्याचा नाटकातला उल्लेख तर पूर्ण खोटा. ते म्हणाले, 'दिव्य करण्यासाठी छत्रपतींची परवानगी लागत होती. अशी गल्लीबोळात दिव्यं होत नसत !'

ते म्हणाले, 'घाशीराम म्हणजे ब्राह्मणांच्या विरुद्ध उगवलेला सूड आहे !'

'शिवसृष्टी' आणि 'जाणता राजा' ही बाबासाहेबाची नवी स्वप्नं. शिवाजीमहाराजांच्या काळातल्या एका किल्ल्याचं सादर्त दर्शन त्यांना शिवसृष्टीत घडवायच आहे तर ऐतिहासिक वास्तूत १००।१२५ कलाकारासोबत त्याना 'जाणता राजा'मध्ये ऐतिहासिक प्रसग साकार करायचे आहेत. बाबासाहेब उत्साहानं सागत होते.

प्रकट मुलाखतीतला शेवटचा प्रश्न बेहेऱ्यांनी विचारला– 'तुम्हाला शिवशाहीर म्हटलेलं आवडेल की इतिहाससंशोधक ?' बाबासाहेब म्हणाले, 'राजमातासाहेबानी दिलेलं 'शिवशाहीर' हे बिरुद मी स्वीकारलं; पण अभ्यासपूर्वक शाहिरी करणारा शाहीर असं म्हटलेलं मला अधिक आवडेल. बखरकार म्हटलं तर अधिक आवडेल. मी कशिदा काढला; पण सुई मात्र अभ्यासकाची आहे हे मी विनय बाजूला ठेवून सांगतो.'

नतर सत्कारसमारंभ झाला. टाळ्या वाजवताना लोक भारावून गेले होते. उपस्थित असलेल्या सर्वांनी उभे राहून शिवशाहिराला मानाचा मुजरा दिला !

दोन तास रंगलेली मुलाखत संपली. दोन तास जी व्यक्ती बोलत होती त्यात एका नटाचं,लेखकाचं,अभ्यासकाचं आणि इतिहाससंशोधकाचं बेमालूम मिश्रण होतं. बाबासाहेबांच्या लोकप्रियतेचं मूळ या वेगळ्या मिश्रणात आहे. हे रसायन त्याच्या वडलांकडून त्याच्याकडे आलं हे त्यानी अभिमानानं सागितलं.

मुलाखत घेण्यासाठी चार प्रश्नकर्ते हजर होते; पण निमित्तमात्र. सूत्रं बाबासाहेबांनी कधीच हातात घेतली होती. कारण त्याच्या झपाटलेपणाचा परिचय जमलेल्या प्रत्येक श्रोत्याला होता. फक्त व्याख्यानातून ज्या रसिक श्रोत्यानी त्याना ३६॥ लाख रुपये मिळवून दिले त्यांना त्याचे आवेशपूर्ण, स्फूर्तिदायक शब्द हवे होते आणि ते तसे बोलत होते. इतिहास त्याच्या जिभेवर होता.

मुलाखत संपली. दोन तास भारावलेले श्रोते पाहून वाटलं, बाबासाहेबाना आज तरुण पिढीकडून अपेक्षित आहे ते शिवाजीचं क्षात्रतेज, पुरुषार्थ ! शिवाजीच्या गौरवशाली इतिहासात दग होणारे श्रोते, वर्तमानकाळाचं भान ठेवून, बाबासाहेबांच्या या अपेक्षेचा विचार करत असतील का ?

---

# हसरी संध्याकाळ

शनिवार, ९ ऑक्टोबरची संध्याकाळ वेगळी होती अधिक प्रसन्न, हसरी होती. कै. शंकरराव किर्लोस्कर स्मरण समितीनं एका असामान्य व्यंगचित्रकाराला–आर. के. लक्ष्मण याना निमंत्रित करून रसिकांना एक दुर्लभ संधी उपलब्ध करून दिली. लक्ष्मण बोलले, त्यांनी त्याच्या रेषेचं सामर्थ्य प्रात्यक्षिकातून दाखवलं, हसत हसत प्रश्नांना उत्तरे दिली. जाता जाता खळकरपणानं सध्याच्या राजकारणाबद्दल मंत्र्याना टपल्या मारल्या, लहानपणचे मजेशार किस्से सांगितले आणि सतत तासभर टिळक स्मारक मंदिरात गर्दी केलेल्या चाहत्याना हसवून त्यानी ती सध्याकाळ संस्मरणीय केली.

साडेसहा वाजता कार्यक्रम सुरू झाला. प्रास्ताविक 'किस्त्रिम'च्या संपादिका शांताबाई किर्लोस्कर यांनी केल. कै. शंकरराव किर्लोस्कर यानी १९३२।३३ साली कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये रेखाचित्राच्या सहाय्यानं दिलेल्या व्याख्यानाचं त्यानी स्मरण करून दिलं. लक्ष्मण यांना बोलण्यासाठ विनंती करताना त्या म्हणाल्या 'व्यंगचित्र

काराला हास्यदृष्टी आणि उपहासदृष्टी, दोन्ही असाव्या लागतात लक्ष्मण यांच्या उपहासातला निर्विष विनोद फार महत्त्वाचा आहे '

नंतर लक्ष्मण बोलायला उठले. ( ते इंग्रजीत बोलले) सुरुवातीलाच ते म्हणाले, ' व्यंगचित्र काढायला मी कोणाकडून शिकलो नाही. त्याबद्दल माझं कोणतंही औपचारिक शिक्षण झालेलं नाही. मला एस. एस. सी. झाल्यावर मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् मध्ये जाण्याची अतिशय इच्छा होती. मी माझी काही चित्रं त्यांना पाठवली तर ती पाहून माझ्याजवळ पुरेशी पात्रता नसल्याचं त्यांनी कळवलं. मग मी पुढे तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राचा पदवीधर झालो. आता राज्यशास्त्रातलं मला विशेष कळत नाही; पण त्याच्या खऱ्या आविष्काराबद्दल मात्र बरंच कळतं.' नंतर ते म्हणाले की पुढे जे. जे स्कूलच्या डिनसाहेबांनी एका प्रदर्शनाच्या उद्घाटनाला बोलावलं त्या वेळी तिथल्या विद्यार्थ्यांना मी माझा मागचा किस्सा सांगितला आणि म्हटलं, बरं झालं. नाही तर मी तुमच्यासारखा चित्रकार होऊन बक्षिसांच्या मागे लागलो असतो. व्यंगचित्रकार झालोच नसतो.

लक्ष्मण म्हणाले, माणसानं जगण्यासाठी हसायला पाहिजे. वास्तवापासून दूर जाण्यासाठी निसर्गानं शोधलेली ही युक्ती आहे. व्यंगचित्र कशाबद्दल काढायचं ? मानवी अहंकार, भ्रष्टाचार, विसंगती, सामाजिक ढोंग हे त्याचे विषय. हे सगळं राजकारणात आहे म्हणून मी राजकीय व्यंगचित्र काढतो. आजच्या राजकारण्यांबद्दल बोलताना लक्ष्मण म्हणाले, राजकारण आणि व्यंगचित्रकला यांच्यातली तफावत सध्या बरीच कमी झाली आहे. मला तर सतत भीती वाटत राहते की ते लोक माझ्या व्यवसायाचं राष्ट्रीयीकरणच करून टाकतील. त्यांना वाटेल लक्ष्मणची मक्तेदारी कशाला ?

लक्ष्मण म्हणतात, सामान्य माणसाच्या खडतर आयुष्यात हास्याची लहर निर्माण करण्याची गरज मी भागवतो. रागाच्या जगात त्रासलेला माणूस त्याला जे सोसावं लागतं त्याबद्दल राजकारणी लोकांना जबाबदार धरतो. एखाद्या मंत्र्याची टर उडवलेली पाहिली की त्याला खूप बरं वाटतं.

मला लोक विचारतात, तुम्ही जीवनाकडे काही वेगळ्या दृष्टिकोनातून बघता का ? मी सांगतो नाही. इतरांप्रमाणेच त्याला जीवनाचे प्रश्न सतावत असतात. पण विदूषकासारखं ओठात हसू आणि डोळ्यात आसू असं त्याचं जगणं असत.

व्यंगचित्रकार हा जन्मावाच लागतो, तो तयार करता येत नाही असं सांगून ते म्हणाले ज्याच्याजवळ उत्कृष्ट विनोदबुद्धी, चित्र काढण्याची क्षमता आणि प्रचंड सामान्यज्ञान आहे तो व्यंगचित्रकार होतो यापैकी एखादाच गुण ज्यांच्याकडे असतो ते डॉक्टर इंजिनिअर किंवा आर्किटेक्ट होतात !'

लक्ष्मणनी पहिलं व्यंगचित्र कोणाचं काढलं असेल ? खुद्द त्यांच्या वडलांचं ! (त्यांच्या आई-वडलांनी मुलांना पुरेसा मोकळेपणा दिला होता.) सहा-सात वर्षांचे असताना वर्गात गणिताचे शिक्षक शिकवत असताना त्यांनी एक मांजर काढून ठेवलं. सरानी ते पाहिल्यावर म्हणाले. ' माझी चेष्टा करतोस ?' लक्ष्मणना अर्थातच प्रश्न पडला, पण या मांजरात आणि सरामध्ये कुठे काय साम्य आहे ? सर म्हणतात, ' नीट बघ ?' आणि खरोखरच त्या रागीट मांजरात त्यांना गणिताचे सर सापडले. लक्ष्मण म्हणाले, ' पुढे पुढे तर मला हा छंदच लागला. नंतर काही माणसं मला निर्जिव वस्तूंसारखीसुद्धा दिसायला लागली उदा. ट्रक.

नंतर रंगमंचावर ठेवलेल्या कॅनव्हासवर लक्ष्मणनी त्यांच्या हातातली जादू दाखवून थक्क केलं. एकापाठोपाठ एक स्टॅलिन, द गॉल, हिटलर, चर्चिल, माओ, म. गांधी, पं. नेहरू, इंदिरा गांधी, मनेका गांधी आणि शेवटी त्यांचा चिरपरिचित ' कॉमन मॅन ' काही क्षणात रेखाटले. चित्र रेखाटताना सुरुवातीच्या एखाद्या रेषेवरून लोक त्या प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांना ओळखू शकत होते. रेखाटन पूर्ण झाल्यावर उत्स्फूर्तपणे टाळ्यांचा कडकडाट होत होता. लक्ष्मण म्हणाले, ' पूर्वीच्या राजकारण्यांना स्वत.च व्यक्तिमत्त्व होतं. त्यांचे चेहरेही वेगवेगळे, ठसठशीत असायचे. मौलाना आझाद आणि राजगोपाल चारी किती वेगळे दिसत आता सगळ्यांचे चेहरे सारखेच झाले आहेत. एखादा केंद्रिय मंत्री समोर आणला तर तुम्ही तो ओळखू शकणार नाही !

नंतर लक्ष्मण यांची काही व्यंगचित्रं पडद्यावर दाखवली. प्रेक्षक सतत हसत होते. पुन.प्रत्ययाचा आनंद घेत होते, त्यातल्या विनोदी चिमट्यांना मनापासून दाद देत होते. ती दाद म्हणजे चित्रकाराचा खरा गौरवसोहळा होता !'

नंतर प्रश्नोत्तरांचा छोटा कार्यक्रम झाला. उत्तरं देताना लक्ष्मण म्हणाले, ' मी लोकांचा प्रतिसाद मिळवण्यासाठी प्रयत्न करत नाही. काही लोक, एखादा मंत्री आपणहून येऊन सांगतात तोच प्रतिसाद; पण त्यानं काही फरक पडत नाही. मला माझं काम आवडतं इतकंच ! चित्र काढण्यापूर्वी मी कोणाशीही त्याबद्दल चर्चा करत नाही. एखाद्या चित्राचा दृश्य परिणाम काय होईल याची दृष्टी ज्यांना नाही त्यांनी व्यंगचित्राबद्दल काही सांगितलेल मला आवडत नाही. दिवस-रात्र माझ्या डोक्यात नवीननवीन चित्रांचीच कल्पना असते. दोन-दोन तास वृत्तपत्र समोर ठेवून मी त्यातील पांढऱ्या जागा वाचत असतो. माझ्या ऑफिसमध्ये साडेचार वाजता मला चित्र तयार ठेवायला लागत. चित्र आधी सुचतं की, चित्रासाठी एखादी सूचक ओळ? प्रश्न अवघड आहे. दोन्ही डोक्यात घोळत असतं; पण नेमकं उत्तर मात्र देता येणार नाही. आधी अंड की कोंबडी ? असाच तो वाद आहे.

नेमकी, खेळकर उत्तरं देऊन लक्ष्मण खाली बसले. टाळ्या वाजत होत्या. लोकांना त्यांचा *आवडता कलाकार इतक्या जवळून बोलताना*, त्याची कला सजीव करताना, प्रश्नांना उत्तरं देताना भेटला होता.

नंतर मुकुंदरावही थोडक्यात पण चांगलं बोलले. ते म्हणाले, ' लक्ष्मणच्या कलेतला निम्मा वाटा आपल्या राजकारण्यांच्या performance ला आहे. त्याबाबत लक्ष्मण इतकं सुदैवी कोणी नसेल !

लक्ष्मणच्या कलेचा मुकुंदरावांनी मनापासून गौरव केला. ते म्हणाले, ' माझं सगळं आयुष्य मी पांढऱ्यावर काळं करण्यात घालवलं आणि लक्ष्मण मात्र नेमक्या पांढऱ्या जागा शोधत राहिले. मी ' किर्लोस्कर 'साठी अग्रलेख् लिहीत असे. चार-चार पानी अग्रलेख लिहिल्यानंतर मी जेव्हा दुसऱ्या दिवशी लक्ष्मणचं कार्टून बघायचो, तेव्हा वाटायचं, मला नेमकं हेच म्हणायचं आहे ! मला जे चार पानात जमत नसे ते तो नेमकं एका बारीक चौकोनात दाखवत असे. '

लक्ष्मण यांची कला ' ग्रेट ' आहे असं सांगून ते म्हणाले, ' सर्वसामान्यांची भावना हा त्यांच्या चित्रांतला उगम आहे. त्यांच्याबद्दलची जिवत सहानुभूती त्यांच्या चित्रात आहे म्हणून ते श्रेष्ठ आहे. त्यांच्या चित्राचं वैशिष्ट्य सांगताना ते म्हणाले, ती राजकीय दृष्ट्या परखड, विधायक दिशा देणारी आणि अतिशय निर्मळ असतात !

लक्ष्मण यानी आपले गुरु म्हणून डेव्हिड लो याचा उल्लेख केला होता. मुकुंदराव म्हणाले, लक्ष्मणच्या बाबतीत ' शिष्यात् इच्छेत् पराजयम् ' हे वचन त्यांनी खरं केलं आहे. आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

शनिवारची ती भारावलेल्या अवस्थेतील लोकांची गर्दी ओसरली. हसरी संध्याकाळ बराच काळ लक्षात राहील !

—मेधा देशपांडे

खोमेनी, भुत्तो, गोल्डा मायर, इंदिरा गांधी इत्यादी
जागतिक नेत्यांच्या बेडर मुलाखती घेणारी
सुप्रसिद्ध स्त्रीपत्रकार ओरियाना फलासी.
तिने घेतलेली इस्राएलचे संरक्षणमंत्री एरिक शेरॉन
यांची ही मुलाखत.
बेरूतमधील पॅलेस्टिनी निर्वासितांच्या
हत्याकांडापूर्वीची ......

**भाषांतर : रवींद्र गुर्जर**

# ओरियाना आणि शेरॉन



**ओरियाना फलासी :** जनरल शेरॉन, तुमच्या युद्धाचा पहिला टप्पा आता पार पडला आहे. अराफतची माणसं बेरूत सोडून गेलेली आहेत. तथापि ते लोक ताठ मानेने बाहेर पडले. सामर्थ्यवान इस्राएली फौजांशी अडीच महिने त्यांनी लढा दिला. आंतरराष्ट्रीय सहानुभूती पूर्वी नसताना आता मात्र त्यांना ती प्राप्त झाली आहे. लेबाननवर प्रथम कब्जा करणारे आणि स्वामित्व सांगणारे ते आहेत, हे खरं; पण त्यांनाही मातृभूमी असण्याचा हक्क आहे. साऱ्या जगानं ते मान्य केलं आहे. अराफतचा राजकीयदृष्टया विजय झाला, हे त्याचं म्हणणं अनाठायी नाही. तुम्ही त्याच्यावर राजकीय 'मेहेरबानी' केलीत, असं काही जण म्हणतात, तेही चूक नाही. तुम्हाला तेच अभिप्रेत होतं.

**एरिक शेरॉन :** मला त्यांना बेरूतच्या, लेबाननच्या बाहेर घालवायचं होतं–आणि त्यात मी पूर्ण यशस्वी झालो आहे. अराफतनं काय वाटेल तो दावा करावा, त्याला काहीच किंमत नाही. वस्तुस्थिती काय आहे आणि भविष्यात त्यामुळे काय काय घडणार आहे, हे महत्त्वाचं. कदाचित त्याला खरोखर असं वाटत असेल की; आपला राजकीय विजय झाला; पण पुढे त्याला समजून येईल को, त्याचा मुख्यतः राजकीयदृष्टयाच पराभव झालेला आहे. अराफतच्या वतीनं मी या युद्धाचं विश्लेषण करू ? मी त्याला लष्करी पराभव मानत नाही. इस्राएल–लष्कर बलाढ्य आहे यात वादच नाही आणि पॅलेस्टिनी मुक्तिसंघटनेचे दहशतवादी, सीरियन्स धरून अवघे १०,००० होते. तरीही आम्हाला त्यांचा चांगलाच ताण जाणवला. याउलट राजकीयदृष्टया तो पूर्ण खच्ची झाला आहे. त्याचं कारण मी सांगतो. दहशतवादाचं एक आंतरराष्ट्रीय केंद्रस्थान म्हणूनच त्याची काही ताकद आहे आणि एखाद्या देशावर ताबा ठेवून, राज्यात आपलं राज्य स्थापूनच हे केंद्र अस्तित्व टिकवू शकतं. लेबानन हा असाच एक देश होता. तिथूनच ते जगातल्या कुठल्याही भागात कारवाई करू शकत होते. आता ते आठ निरनिराळ्या देशांत परागंदा झाले आहेत. अल्जेरिया ते येमेन, इराक ते सुदान– त्यामुळे त्यांना पूर्वीसारख्या हालचाली यापुढे अशक्य आहेत. ती आशाच त्यांनी सोडावी.

काल रात्री हेन्री किसिंजरचा मला फोन आला होता. या विभागात नव्या युगाची नांदी होत आहे, असं तो म्हणाला पॅलेस्टिनी प्रश्न सुटण्यासाठी नव्या शक्यता निर्माण होत आहेत मुक्तिसंघटना पुन्हा सावरेपर्यंत इस्राएलला या प्रश्नावर तोडगा शोधण्यासाठी १२ ते १८ महिने मिळतील असं त्याचं मत आहे.

**ओरियाना :** पॅलेस्टाइन मुक्तिसेनेचं निर्गमन गौरवाला पात्र झालं आहे. थोडा अश्रुपात, मूर्खपणाचा गोळीबार इ. झाला हे मला मान्य; पण त्यांचं सैन्य उजळ माथ्यानं, आपले गणवेष आणि ध्वजांसहित रवाना झालं. का तुमच्या दृष्टीस ते तिरस्कृत वाटलं ? टेकडी ओलांडून ते देश सोडत असताना तुम्ही दुर्बिणीतून तुच्छतेनं त्यांना पाहत होता का ?

**शेरॉन :** नाही. मला बायबलच्या उक्तीप्रमाणे वाटलं. 'शत्रूच्या पराभवामुळं हर्षभरित होऊ नका !' ते जरी खुनी मारेकरी असले आणि ते आहेतच; ते जरी बलात्कार करत असले...थांबा, मला अडवू नका. मला हवं ते उत्तर देऊ द्या– ते जरी बलात्कारी असले,

मी म्हणतो, हलकट, बलात्कारी, गुन्हेगार असले तरी काहीही झालं तरी ते मनुष्यप्राणी होते. तथापि 'निर्गमन' असा शब्द तुम्ही वापरू नका. त्यांची हकालपट्टी करण्यात आलेली आहे. 'देश खाली केला' असं तुम्ही म्हणू शकला असता; पण केव्हा? त्या दहशतवाद्यांना जे हवं ते आम्ही मान्य केलं असतं तर! उदाहरणार्थ, बेरूतमधून आमच्या फौजा काढून घेणे. त्याउलट त्यांनीच आम्हाला हवं ते स्वीकारलं. म्हणून ती हकालपट्टीच!

ओरियाना : तुम्ही तसं म्हणा; पण एक सांगा–त्यांना तुम्ही दहशतवादी का म्हणता? निःशस्त्र लोकांमध्ये जो दहशत निर्माण करतो तो दहशतवादी म्हणता येईल. उदा. रस्त्यावरून चालणारा एकाकी माणूस. दहशतवादी गाड्या जाळतात; बस किंवा इमारत उध्वस्त करतात–आणि पॅलेस्टिनी मुक्तिसंघटनेनं यासारखे असह्य गुन्हे असंख्य केले आहेत यात वादच नाही; पण बेरूतमध्ये त्यांनी तसं केलं नाही बेरूतमध्ये ते सैनिक बनले. तुम्हाला त्यांनी सैनिकांसारखं तोंड दिलं. बंदुका विरुद्ध बंदुका, रणगाडे विरुद्ध रणगाडे!

शेरॉन : मला राजदूत हबीब यांची आठवण येतेय्. ते जेव्हा 'फौजी' असा शब्द (त्यांच्या भाषणात) वाचायचे, तेव्हा त्यांच्या ओठावर दरवेळी हसू येई. त्यांना माझी प्रतिक्रिया ठाऊक होती म्हणूनच म्हणा! छे, बाईसाहेब, ते सैनिक नव्हते. बेरूतमध्ये सुद्धा नाही. तुम्ही एखाद्या रुग्णालयाच्या शस्त्रक्रियाविभागात प्रवेश करता. तिथे डॉक्टर्स एका जखमी माणसाला वाचवण्याची धडपड करत आहेत आणि तुम्ही त्याच्या नाकातली प्राणवायूची नळी बाहेर खेचून तुमच्या जखमी लोकांसाठी जागा खाली करायचं फर्मान सोडता, तेव्हा तुम्हाला सैनिक म्हणता येणार नाही. तुम्ही दहशतवादी मारेकरीच! सीरियन्स तसे वागत नाहीत. जॉर्डन किंवा इजिप्तचे सैनिक तसं वागत नाहीत. अराफतचे खुनी मात्र तसंच करतात. अगदी नेहमी, पहिल्यापासून! लेबाननजवळच्या आमच्या सरहद्दीपाशी आमचे बरेच लष्करी तळ आहेत; पण त्याच्यावर अराफतनं हल्ले केले नाहीत. त्यांनी लहान मुलं, स्त्रिया आणि वृद्धांवर गोळीबार केला. भेकड! मला काहीही सांगा; पण त्यांना सैनिक म्हणायला लावू नका!

ओरियाना : दहशतवादी हा शब्द तुम्ही अपमानास्पद अर्थानं वापरता ही वस्तुस्थिती आहे; पण मग इस्राएल–निर्मितीच्या वेळी तुम्ही ब्रिटिश आणि अरबांविरुद्ध झगडताना वेगळं काय केलंत? इर्गन, स्टर्न, हॅगाना–या दहशतवादी संघटना नव्हत्या? १९४७ मध्ये बेगिन यांनी किंग डेव्हिड हॉटेलवर बॉम्ब टाकून ७९ लोकांची हत्या केली; ही कृती दहशतवादी नाही? बेगिन स्वतः ते मान्य करतात. काही दिवसांपूर्वी न्यूयॉर्कमध्ये त्यांना खाना दिला असताना ते बोलायला उठले, तेव्हा सुरुवातीला त्यांनी असे शब्द उच्चारले : 'मी माजी दहशतवादी आहे.'

शेरॉन : बेगिनच्या आधिपत्याखाली असलेली संघटना नागरिकांवर हल्ले करत नसे. श्री. बेगिन यांच्या अभिमानाचा तो खास मुद्दा होता. त्या हॉटेलवर टाकलेल्या बॉबचं लक्ष्य ब्रिटिश लष्कर होतं आणि त्या लोकांच्या मृत्यूची जबाबदारी ब्रिटिश हायकमिशनरवर जाते. आम्ही दहशतवादी नव्हतो, तर स्वातंत्र्यासाठी झगडत होतो. ब्रिटिश वसाहतीविरुद्ध आम्ही लढलो.

ओरियाना : पण अराफतचे लोकही असंच म्हणतात की, आम्ही स्वातंत्र्य सैनिक आहोत. आमचा लढा इस्राएली वसाहतवादाविरुद्ध आहे. मला असं सांगा की, आपण बेरूतमध्ये घुसून त्या सर्व लोकांना का ठार केलं नाही, याचा आता तुम्हाला पश्चात्ताप होतो का? एक जनरल म्हणून काही एका गोष्टीपासून आपण वंचित राहिलो, असमाधानी राहिलो असं नाही तुम्हाला वाटत?

शेरॉन : हे पाहा, गेल्या जानेवारीमध्ये मी परिस्थितीची पाहणी करण्याकरता गुप्तपणे बेरूतला गेलो होतो, ही गोष्ट सर्वांना ठाऊक झाली आहे. मी नेहमीच तसं करतो. म्हणजे माझी तयारी सांगोपांग असते. सुधारणा किंवा फेरफार मला अजिबात मंजूर नाही. म्हणून मी गेलो. तिथे दोन दिवस आणि एक रात्र राहिलो. शहरातून फेरफटका मारला. बंदरापर्यंत गेलो. लोकांशी खूप बोललो. नंतर पूर्व भाग आणि पश्चिम भागाच्या मध्यभागी असलेल्या एका इमारतीच्या गच्चीवर उभं राहून बेरूत शहर काळजीपूर्वक न्याहाळलं. अखेरीस माझ्याबरोबर प्रवास करणाऱ्या एका व्यक्तीला मी म्हटलं– तेच पुढे पंतप्रधान बेगिन यांनाही जेरुसलेममध्ये सांगितलं : 'यदाकदाचित आपल्याला लेबाननमध्ये प्रवेश करावा लागला, तरी बेरूत शहरात जायचं नाही!' का ते समजलं? सीरियन्स आणि दहशतवाद्यांनी व्याप्त असलं तरी ते राजधानीचं शहर आहे. लाखो नागरिक वास्तव्य करीत असलेलं राजधानीचं शहर. मिस् फलासी, मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणतो की, अत्यंत अनिवार्यता निर्माण झाल्याशिवाय बेरूतमध्ये शिरायचं नाही असा माझा निश्चय होता आणि विश्वास ठेवा की, बेरूतमध्ये घुसण्याखेरीज पर्याय नाही, अशी आमची पूर्ण खात्री झाली असती तर जगातील कोणतीही शक्ती मला अडवू शकली नसती! लोकशाही निर्णय माना किंवा मानू नका, आमच्या सरकारला ते आवडलं नसतं तरीही मी शहरात प्रवेश केला असता. माझ्या म्हणण्याचा अर्थ, मी त्यांचं मन वळवलं असतं आणि अखेर ते साध्य केलंच असतं!

ओरियाना : मग तुम्ही तसा नेटानं प्रयत्न का करत होता? तुमच्या लष्करी हस्तक्षेपाच्या अखेरच्या टप्प्यात मी तिथे होते आणि जनरल शेरॉन, मी जागरूकपणे अभ्यास करत होते. १०० मीटर्स घेताना तुमची माणसं मरत होती. ५०, अगदी २५ मीटर्स आगेकूच करतानाही त्यांना अशक्य झालं होतं.

शेरॉन : मिस्, मी खोटं सांगत नाहीये. लष्करीदृष्ट्या आम्ही कुठल्याही क्षणी आत जाऊ शकत होतो. अर्थात जर तशी आवश्यकता असती तर. त्याची पूर्ण तयारी झालेली होती. आमचं लष्कर जगातल एक सर्वोत्कृष्ट आहे; हे विसरू नका! बहुतेक सर्व अरब देशांबरोबर आमचा लढा चालू आहे आणि आम्हाला त्याचा भरपूर अनुभव आहे.

ओरियाना : पण जनरल, घराघरातून लढा देणाऱ्या लोकांच्या शहरात लढण्याचा अनुभव तुम्हाला नाही. माझी चूक असेल तर सांगा; पण असं करण्यात तुमची फार मोठी प्राणहानी झाली असती. साधारण एक हजार सैनिक मृत्युमुखी पडले असते, म्हणूनच मुख्यतः तुम्ही शहरात प्रवेश केला नाही ना?

शेरॉन : मी तुमच्या डोळ्यांना डोळे भिडवून सांगतो–नाही, नाही, नाही, नाही! पहिली गोष्ट : तुम्ही म्हणता एवढी आमची

हानी झाली नसती, त्याच्या जवळपाससुद्धा नाही. श्री. बेगिन याना आमचे सैन्यप्रमुख म्हणाले त्याप्रमाणे काही डझन सैनिक मारले गेले असते. दुसरी गोष्ट : आम्ही थांबलो ते खरं म्हणजे पॅलेस्टिनी मुक्ति-सेना निघून जाणार याची खात्री झाल्यामुळं. मिस् फलासी, बेरूत म्हणजे स्टालिनग्राड नाही आणि पीएलओ म्हणजे काही रेड आर्मी नाही !

स्टालिनग्राडमध्ये नागरिकांच्या खांद्याला खांदा देऊन लाल सैन्य लढलं. त्याउलट बेरूतमध्ये दहशतवाद्यांनी नागरिक ओलीस धरून ठेवले होते. स्टालिनग्राडमध्ये लाल सैन्य आणि जनता जिवात जीव असेपर्यंत लढली. अराफतचे दहशतवादी तसे वागले नाहीत. आपण लढत आहोत, एवढा आभास निर्माण करण्यापुरते ते जुजबी लढले-मरेपर्यंत नाही. कधीच नाही ! ते कधी लढलेलेच नाहीत. आम्ही सरहद्दीपासून अवघ्या चार दिवसात बेरूतच्या उपनगरात पोचलो. ओक्षाई, बोर्ज एल् ब्रॅज्ने, हेगशालम छावण्या आणि अगदी विमानतळ कबजात घेताना आश्चर्य म्हणजे अगदीच कमी किंमत मोजावी लागली. कारण ते लढलेच नाहीत !

त्याचा मला आदर वाटत नाही, अराफतचा आदर वाटत नाही याचं ते आणखी एक कारण आहे. मला इजिप्तबद्दल आदर आहे. कारण त्यानी आमच्याविरुद्ध चांगली झुंज दिली. जॉर्डनचा आदर वाटतो.कारण त्यानीही चांगलाच प्रतिकार केला. सीरियाचंही तसंच आहे; पण अराफतची माणसं भेकड आहेत, म्हणून त्याचा आदर मला कधीच वाटला नाही.

ओरियाना : मग असं असेल अमेरिकेला तुम्ही तिथे घुसणं मान्य नव्हतं, हे त्याचं कारण असू शकतं. माझी काही चूक होतेय् का सांगा. तुम्हाला तुमच्या दोस्ताचा, सरक्षकाचा राग ओढवून घेणं परवडण्यासारखं नव्हतं ! राष्ट्राध्यक्ष रेगन तुमच्यावर किती भडकले होते, हे सर्वांना ठाऊक आहे. श्री. बेगिन यांनी बळेच मागवून घेतलेल्या वॉशिंग्टन–भेटीत रेगन यांनी त्याचं किती थंडपणे स्वागत केलं !

शेरॉन : बेगिन बळंच वॉशिंग्टनला गेलेले नाहीत. तुम्ही त्यांना ओळखत नाही, लेबाननमध्ये शिरून युद्ध करण्यासाठी आम्हाला कोणाच्याही परवानगीची आवश्यकता नव्हती. अमेरिकेची सुद्धा! इस्राएल राज्याची घोषणा करताना आम्ही त्यांची संमती घेतली होती का ? जेरुसलेमची राजधानी म्हणून स्थापना, तिथे सरकार स्थापून संसद निर्माण करताना आम्ही कोणाला विचारलं होतं का ? सुएझ कालव्यात शिरताना एन्टेबीवर गरुडझेप घेताना, बगदादमधील अणुभट्टीवर बॉम्ब टाकताना आम्ही अमेरिकेची परवानगी घेतली होती का ? आमचं स्वतंत्र राष्ट्र आहे; आमचे निर्णय आम्ही मुक्तपणे घेतो आणि आम्हाला मित्र आहेत. संरक्षक नाही. आम्हाला रक्षक नको आहेत.आम्हाला आज्ञा घेणं आवडत नाही! अखेरचं सांगतो की, बेरूतमध्ये मी प्रवेश केला नाही.कारण तिथल्या नागरिकाचो जीवितहानी आम्हाला नको होती.

ओरियाना : ओ ख्राइस्ट ! हे खरं नाही. काय ही तुमची कथा सांगता ! त्या नागरिकांवर कित्येक आठवडे तुम्ही निर्घृण बॉम्बफेक केलीत. एवढा दारुगोळा अलीकडच्या कुठल्याच युद्धात मी पाहिलेला नाही. कारण मी आपल्या काळातील बहुतेक सर्व युद्धांच्या ठिकाणी हजर राहिलो आहे. कित्येक दिवस तुम्ही त्यांच्यावर आगीची बरसात केली. समुद्रातून, आकाशातून हल्ले करून त्याना जमीनदोस्त केलंत आणि आता असा देखावा करताय की त्यांना वाचवण्यासाठी तुमची धडपड होती. आणखी थोड्याफार बंदुकीच्या गोळ्यानी काय फरक पडणार होता ?

शेरॉन : तुम्ही कठीण करताय्, खरंच कठीण करताय् मला ठाऊक आहे की, तुम्ही तिथे हजर होता आणि सगळं काही पाहिलेलं आहे; पण मला हे सुद्धा ठाऊक आहे की आम्ही निरपराध नागरिकाच्यावर कधीच हेतुपुरस्सर बॉम्बफेक केलेली नाही. बहुतेक बॉम्बहल्ले मी 'बहुतेक' म्हणतोय. कारण युद्ध हे शेवटी युद्धच– दहशतवाद्यांच्या तळावर किंवा मुख्य कचेऱ्यावर झालेले आहेत. म्हणजे फॉकलानी विभागात, बोलेवर्द माझराच्या दक्षिणेस.

ओरियाना : कॉव्हेंट्री १९४१, बर्लिन १९४५ इथले हल्लेसुद्धा मी पाहिले आहेत बरं ! पण तुम्ही म्हणता तेवढ्याच ठिकाणी बॉम्बिंग केलेलं नाही. शहराच्या मध्यभागीसुद्धा बॉम्ब टाकलेले आहेत घरं, रुग्णालयं, हॉटेल्स, शाळा, वकिलाती ...

शेरॉन : नाही, नाही, नाही, नाही! तिथे मारा झाला तो त्याच्याजवळच लष्करी तळ होते म्हणून ! नागरिकांच्या पाठीआड दहशतवादी दडले होते म्हणून त्या ठिकाणी आम्ही हल्ले केले ही काही हवाई छायाचित्रं पाहा. व्हॅटिकन वकिलातीपासून १२० मीटर्सवर ८२ मि मि मॉर्टर बॅटरी; इजिप्त वकिलातीजवळ १५ मीटर्सवर तशाच बॅटरीचा स्फोट; सोव्हिएत वकिलातीपासून ३०० मीटर्सवर भरपूर तोफगोळ्यांचा मारा. जपानी आणि चिनी वकिलातीजवळ तोच प्रकार. पुढे स्पॅनिश वकिलात –१३० एम् एम् चे गोळे. अमेरिकन वकिलातीच्या सभोवार कित्येक रणगाडे उभे दिसतात. तुमचा या गोष्टीवर एक क्षणभर तरी विश्वास बसेल का, की अमेरिकन वकिलात आम्हाला नष्ट करायची होती ? ती काय किंवा इजिप्त आणि अन्य वकिलाती ?

ओरियाना : ठीक आहे, ते मी मान्य करते; पण अखेरच्या दिवसांत तुम्हीही तेच केलं आहे. अलेक्झांड्रे हॉटेल आणि हॉटेल डी दिय् हॉस्पिटलच्या आसपास तुमचेही रणगाडे उभे होते म्हणून दर रात्री आणि पहाटेस पॅलेस्टिनी मॉर्टर्स आणि अन्य दारुगोळा तिथे येऊन आदळत होता; पण इथे तुमचं म्हणणं बरोबर आहे, असं मी कबूल करते. शिवाय पॅलेस्टिनी संघटनेनं काही वेळा निंद्य वर्तन केलेलं आहे विमानविरोधी तोफा त्यांनी हॉस्पिटलच्या छतावर बसवल्या होत्या; पण मुद्दा हा नाही. तुमच्या बॉम्बिंगचा अतिरेक आणि अनावश्यकता ! बेरूतवरून एखादा डास उडावा आणि तुम्ही टनावारी दारुगोळा त्याच्यावर उडवावा. तसं जर घडलं नसेल तर जगभर पसरलेले ज्यू लोक आणि अध्यक्ष रेगन यांनी केलेला धिक्कार कशासाठी ?

शेरॉन : आमच्या अतिरेकाबद्दल तुम्ही जशी अतिशयोक्ती करीत आहात, तशीच अध्यक्ष रेगन यांच्या कानावर गेली आहे ते एकदा

**मला इजिप्त-जॉर्डनबद्दल आदर आहे, कारण त्यांनी आमच्याशी झुंज दिली.**

काही तरी म्हणाले होते खरे की, 'या युद्धाचं (लाजिरवाण) प्रतीक म्हणजे दोन्ही हात तुटलेली एक मुलगी!' कुणी तरी त्यांच्या टेबलावर इजिप्तचा ममीसारखा दिसणारा, बॅण्डेजमध्ये गुडाळलेला लहान मुलीचा फोटो टाकला होता—म्हणून ते तसं म्हणाले. अर्थात आम्ही तिचा शोध लावला. ती मुलगी नसून मुलगा होता आणि त्याचे दोन्ही हात शाबूत होते. फक्त एका हाताला जखम झाली होती. त्याला तसं बॅण्डेज बाधल होतं. कारण...

ओरियाना : आपल्याला जर फोटोंबरोबर झगडायच असेल तर मी तुमच्यापुढे फोटोंचा ढीग रचू शकेन. बाँबफेकीत मरण पावलेली किंवा जखमी झालेली असंख्य मुलं त्यात दिसतील माझ्या बॅगेत तसा एक फोटो आहे; पण तो तुम्हाला दाखवावा असं मला वाटत नाही.

शेरॉन : बघू दे तरी...

ओरियाना : नको. कारण तो मला पुन्हा बघायलाही नकोय्. त्यामुळं मला वेदना होतात. माझा संताप अनावर होतो.

शेरॉन : तरीही मला तो बघायचाय्.

ओरियाना : मी नको म्हणतेय्. तशी गरज नाही.

शेरॉन : आहे. आता तर तो पाहिलाच हवा!

ओरियाना : ठीक आहे.

(ओरियानाबाई बॅगेतून एक फोटो बाहेर काढतात. त्यात काही मृत मुलांचा खच पडला आहे. त्यांची वयं असतील एक वर्ष, दोन, चार, फार तर सहा इ. ती इतकी लहान आणि मृत झालेली आहेत एवढीच त्यातली भयानकता नाही. त्यांचे अक्षरशः तुकडे तुकडे झालेले आहेत. सगळयात धाकटयाचा पाय तुटून बाजूला पडलेला आहे. थोरल्याचा हात गायब आहे. एक लहानसा पंजा दयेची भीक मागत उंचावलेला आहे.

एरिक शेरॉन तो फोटो उचलतो आणि निरखून बघतो. क्षणभर त्याचा चेहरा आकुंचन पावतो आणि डोळे गढूळ होतात. लगेच तो स्वतःला सावरतो आणि फोटो बाईकडे परत देतो.)

शेरॉन : मला...मला खूपच खेद होतोय्. अगदी मनापासून मला खरोखर इतकं दुःख झालय् की अराफतच्या दहशतवाद्यांनी किबुल्ला-मधल्या आमच्या मुलांना असंच मारलंय् त्याची मला आठवण झाली. हे सुद्धा तुम्हाला सांगू नये असं वाटतंय. कुठेही असं घडणं क्लेश-दायकच. प्रत्येक मृत्यू हा खेदजनकच आहे आणि मुलाचं मरण तर असह्यच; पण तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवायला हवा. हे जे काही घडलं ते हेतुपुरस्सर झालेल नाही. उलट आम्ही ते टाळायचा आटो-काट प्रयत्न केला. दहशतवाद्यांनी बेरूत सोडून जाणं भाग आहे, एवढंच त्याना बजवायचं होतं आणि केवळ बाँबफेकीमुळंच ते शक्य होणार होतं.

ओरियाना : मग त्यांनी देश सोडून जायचं मान्य केल तरीही तुम्ही हत्याकांड का चालू ठेवलं? आणि जेव्हा ११ ऑगस्टला तसा करारही झाला—त्याबद्दल श्री. हबीब यांना धन्यवाद द्यायला हवेत—त्यानंतरही तुम्ही बाँबहल्ला चालू ठेवायची आज्ञा का दिली? सुमारे ६०० जणांचा बळी घेणारा तो अखंड १२ तास चाललेला सर्वांत भीषण बाँबवर्षाव...

शेरॉन : कारण अराफतनं आपला खळ चालूच ठेवला. त्याचा नेहमीचा खोटेपणा आणि फसवणूक. खोटारडा इसम! त्यानं आमचं हसं करायचा प्रयत्न केला त्याच्यावर कधीच विश्वास ठेवता येणार नाही—कधीच नाही! कावेबाजपणा हा त्याचा स्थायीभाव आहे. आपला शब्द ते नेहमीच फिरवतात, कराराचा भंग करतात. हकाल-पट्टी होत असतानाही त्यांनी तेच केलं. उदा. सगळयाची नावं ते देणार होत; पण तस केल नाही. जीप्स आणि ट्रक्समधून जाणार नाही, असं त्यांनी कबूल केल होत; पण प्रत्यक्षात तसा प्रयत्न केला. ११ ऑगस्टला पुन्हा त्यानी मागणी केली की, आम्ही बेरूत सोडून निघून जाव आणि आंतरराष्ट्रीय फौजा तिथे याव्यात. म्हणून मी हल्ला चढवला आणि कस...कसं कोण जाणे, पण त्याचा उपयोग झाला. पुढच्या रात्री म्हणजे १२ आणि १३ ऑगस्टच्यामध्ये त्यानी आमच्या अटीपुढे मान तुकवली आणि मी युद्ध थांबवलं!

ओरियाना : तुम्ही थांबलात ते तुमच्या सरकारनं तुम्हाला थोप-वलं म्हणूनच ना?

शेरॉन : मिस् फलासी, ते बाँबहल्ले म्हणजे वैयक्तिक शेरॉनच्या इच्छापूर्तीसाठी चालू नव्हते. सरकारकडूनच तशी योजना झाली आणि त्याला मंजुरी मिळाली. म्हणून जेव्हा पंतप्रधान आणि सपूर्ण मंत्रिमंडळान ज्या हल्ल्यांना मंजुरी दिली होती, त्यांनाच ते थाबवावेसे वाटले आणि थाबले. हे माझं म्हणजे शेरॉनचं युद्ध नाही. सुरुवातीला तुम्ही तसं म्हणाला होता, म्हणून सागतो. हे इस्राएलचं युद्ध आहे.

ओरियाना : तरीही त्याचा संकल्प शेरॉन यांनीच सोडलेला होता. त्याचं ते स्वप्न होतं. त्यानां ते हवं होतं. त्याची तयारी त्यानीच केली. हे युद्ध त्यानीच सर्वार्थानं चालवल. अगदी प्रत्येक तपशिलासह म्हणजे अगदी त्यांच्या पद्धतीनंच आणि तसं करताना त्यांच्या दोस्तांची,त्यांच्या रागालोभाची पर्वाही त्याना नव्हती. जनरल शेरॉन, अमेरिकेचे स्टेट सेक्रेटरी जॉर्ज शुल्टझ यानी तुमचं स्वागत का केलं नाही? आणि एक वरिष्ठ अधिकारी म्हणाला सुद्धा की, 'इस्रा-एलच्या संरक्षणमंत्र्याची वॉशिंग्टनमधली उपस्थिती स्वागतार्ह नाही.'

शेरॉन : तसं म्हटलं गेलं हे खरं आहे. मला समजलं आहे; पण काही तासांनी शुल्टझ याचा प्रवक्ता म्हणाला की, 'ते काही खरं नाही, श्री. शेरॉन याचं वॉशिंग्टनला नेहमीच स्वागत आहे. तथापि राजदूत हबीब यांच्या मार्फत कुठलाही संपर्क साधणे इष्ट आहे.' शिवाय, वॉशिंग्टनला मला बोलवा, अशी अपेक्षा मी कधीच व्यक्त केलेली नाही. अध्यक्ष रेगन किंवा संरक्षणमंत्री वेनबर्गर किंवा शुल्टझ यापैकी कोणाचेही निमंत्रण मला नको आहे. शुल्टझबद्दल मात्र काय वाटतं, हे देवालाच ठाऊक आहे. केवळ बेगिन यांची इच्छा होती की, मी स्वतः वॉशिंग्टनला जाऊन काही माहिती अमेरिकन सरकारला द्यावी. इकडच्या भागात काय घडतंय् ते त्यांच्या कानाव वर घालावं. म्हणून अमेरिकेतील आमच्या दूतामार्फत त्यांनी ही भेट ठरवली. सत्य काय ते आपण सागितलंच पाहिजे!

ओरियाना : मग या युद्धात अमेरिकेनं तुमच्याविरुद्ध जी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली, त्याचा अर्थ तुम्ही काय लावता?

शेरॉन : या आमच्या खतरनाक मोहिमेत जयाचं पारडं फिरेल अशी त्याना भीती वाटते. या युद्धाचा वाढलेला कालावधी अमे-

पृष्ठ २५ वर

## परराष्ट्र

# भारत-बांगला बोलणी

## फराक्का रद्द; पण पुढे ?

वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती गांधी आणि बांगलादेशचे लष्करी राजवटीचे मुख्य प्रशासक लेफ्टनंट जनरल इर्शाद यांच्यात दिल्लीत झालेल्या वाटाघाटींतून अखेर फराक्का करार रद्द झाला. दोन्ही देशांची संयुक्त नदी आयोग दोन्ही देशांनी सुचवलेल्या योजनांची पाहणी येत्या दीड वर्षांत करील आणि त्याच्या शिफारशी विचारात घेऊन दोन्ही देशात दीर्घकालीन स्वरूपाचा करार होईल. दोन्ही राष्ट्रप्रमुखांच्या वाटाघाटीतून प्रश्न सुटलेला नाही; पण तो त्यांनी मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे.

फराक्का करार रद्द झाला. जनता सरकारच्या राजवटीत १९७७ मध्ये हा करार झाला होता. भारताने तो करायला नको होता. त्यात आपला फायदा नसून नुकसानच आहे अशी टीका इंदिरा गांधींनी त्यानंतर केली होती. हा करार रद्द करुन जनता सरकारने केलेली चूक आम्ही दुरुस्त करीत आहोत अशी प्रतिमा इंदिरा गांधी निर्माण करू पहात आहेत ती मात्र बरोबर नाही. फराक्का कराराबाबत एक लक्षात घेतले पाहिजे की, तो कायम स्वरूपाचा तोडगा म्हणून जनता सरकारने मान्य केलेलाच नव्हता. कायम तोडगा निघेपर्यंतच्या काळापुरती ती तात्पुरती तरतूद होती. त्या करारानुसार गंगेच्या पाण्याची पातळी फार कमी असते त्या काळात–जानेवारी ते मे महिन्यात–फराक्का धरणातून भारताने २५००० क्युसेक पाणी घ्यावे आणि बांगलादेशला ३४५०० क्युसेक पाणी द्यावयाचे असे ठरले होते. कलकत्ता बंदरात गाळ साठून ते बंद पडू नये या उद्देशाने फराक्का धरण बांधण्यात आले व त्यासाठी १५६ कोटी रुपये खर्च करण्यात आला; पण तेवढ्याने प्रश्न पूर्णपणे सुटला नाही. उन्हाळ्यात गंगेत पाणी कमी असते व त्यामुळे फराक्का धरणातही पाणी कमी साठते. तेव्हा पाणी कसे वाढवावयाचे यासाठी कायम स्वरूपाच्या योजना आखायला हव्यात. फराक्का करार करतानाही या प्रश्नाचा विचार झाला होता आणि तो मार्गी लावण्याचे प्रयत्नही झाले होते. पाणी वाढवण्यासाठी कोणती योजना हाती घेणे फायद्याचे हे दोन्ही सरकारच्या तज्ज्ञांनी सुचवावे असे ठरले होते. संयुक्त तडी आयोगाने तीन वर्षांत पाहणीचे काम पुरे करून योजना सादर करावयाची अशी करारात अट होती. तीन वर्षांचे अखेरीस आणि त्यानंतर दर सहा महिन्यांनी कराराचा आढावा घ्यावा अशीही तरतूद त्यात होती.

बांगलादेशने प्रथमपासून सहकार्य केले असते तर कायम स्वरूपाची योजना १९८० अखेर तयार होऊन गेल्या दोन वर्षांत तिच्या अंमलबजावणीच्या दृष्टीनेही पावले टाकली गेली असती; पण बांगलादेशच्या आडमुठ्या धोरणाने पहिल्या तीन वर्षांत पाहणीचे काम सुरू सुद्धा झाले नव्हते. वाटाघाटींच्या अनेक फेऱ्या झाल्या पण त्यातून प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने काहीच प्रगती झाली नाही. या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देण्याचा बांगलादेशचा प्रयत्न होता, तर दोन्ही देशांनी आपसात वाटाघाटी करून तो सोडवावा अशी भारताची भूमिका. बांगलादेशने प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेतही उपस्थित केला होता; पण दोन्ही देशांनी आपसात हा प्रश्न सोडवावा असे युनोने सुचविले व बांगलादेशाचा हा प्रयत्न फसला.

कायम स्वरूपाचा तोडगा म्हणून भारताने एक व बांगलादेशने एक अशा दोन वेगळ्या योजना सुचविल्या आहेत. गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांना जोडणारा कालवा बांधावा अशी भारताची सूचना आहे तर गंगेच्या वरच्या भागात नेपाळमध्ये धरणे बांधावीत आणि नेपाळलाही या योजनेत सहभागी करावे अशी बांगला देशची योजना आहे. त्याने आपलीच योजना मान्य होण्याबाबत आग्रह धरल्याने वाटाघाटीत प्रगती झाली नाही. बांगलादेशाच्या भूमिकेत खरोखरच बदल झाला असेल तर दीड वर्षात दोन्ही योजनांच्या पाहणीचे काम पूर्ण होऊन कायम स्वरूपाचा तोडगा शोधणे शक्य आहे. फराक्का करारात तीन वर्षांची मुदत घातली तेव्हा अशीच आशा भारताने बाळगली होती; पण प्रत्यक्षात वेगळाच अनुभव आला.

याबाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. राष्ट्रप्रमुख पातळीवर बोलणी होतात तेव्हा प्रश्नांचा फारसा तपशिलात जाऊन विचार होत नाही आणि मतभेदांपेक्षा मतैक्याच्या बाबींवरच अधिक भर दिला जातो. वाटाघाटी उपयुक्त झाल्या, यशस्वी झाल्या असे वातावरण निर्माण केले जाते. मोरारजीभाई देसाई आणि झियाउर रहमान यांच्यात फराक्का कराराच्या वेळी बोलणी झाली, त्या वेळीही ती यशस्वी झाली असेच म्हटले गेले होते आणि कराराप्रमाणे घडले असते तर प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागलाही असता. तपशिलात जाऊन विचार होतो तेव्हा खऱ्या भूमिका पुढे येतात व अडचणी जाणवू लागतात. इंदिरा गांधी व ईर्शाद वाटाघाटी यशस्वी झाल्या का याचे उत्तर खरोखर दीड वर्षाने मिळणार आहे. बांगलादेशच्या भूमिकेत खरोखर बदल झाला आहे का हे त्या वेळी दिसणार आहे.

वास्तविक दोन्ही देशांनी या प्रश्नावर आपल्या भूमिका मांडून बरीच वर्षे झालेली आहेत. उन्हाळ्यात गंगेचे पाणी कमी होते. ते वाढविण्याची योजना तज्ज्ञांनी पाहणी करून सुचवावी असे मे १९७४ मध्ये इंदिरा गांधी–मुजीब यांच्या वाटाघाटीतच ठरले होते. तेव्हापासून आठ वर्षे या प्रश्नाचा घोळ चालूच आहे. तज्ज्ञ अजून पाहणी करीतच आहेत. दोष तज्ज्ञांचा नाही. सरकार सांगते त्याप्रमाणे ते करणार, तीन वर्षात पाहणीचे काम पुरे करून कायम स्वरूपाची योजना सुचवावी असे फराक्का करारात ठरले असता पहाणीचे काम सुरू सुद्धा झाले नव्हते याचा अर्थ काय ? पाहणी एवढ्यात करू नका अशा सूचना बांगलादेश सरकारनेच तज्ज्ञांना दिल्या असल्या पाहिजेत. अधिकारी आणि तज्ज्ञ स्वत: पुढाकार घेऊन काही करू शकत नाहीत. हे निर्णय देशाच्या प्रमुखानीच घ्यावयाचे असतात– या प्रश्नाचा

घोळ दूर करून सहकार्याने तो सोडविण्यास भारताची प्रथमपासून तयारी होतीच. या वेळी नवे घडले ते एवढेच की जनरल इर्शाद यांनी सहकार्याची भूमिका घेतली.

इंदिरा गांधी–इर्शाद वाटाघाटीत या मुख्य प्रश्नाशिवाय आणखी दोन प्रश्नांवर निर्णय झाले. दहाग्राम व अंगरपोटा हे पश्चिम बंगालच्या प्रदेशाने वेढलेले बांगलादेशाचे दोन छोटे बेटवजा भूभाग आहेत. तेथे जाण्यासाठी तीन बिघा म्हणून ओळखला जाणारा भूपट्टा भारताने कायमचा खंडाने बांगलादेशला दिला. तसे करताना भारतीयांच्या हितसंबंधास कोणताही बाध येणार नाही. याची दक्षता घेण्यात आली आहे.

दोन्ही देशात व्यापार व आर्थिक सहकार्य वाढविण्यासाठी संयुक्त आर्थिक आयोग नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. दोन्ही देशात एकमेकांच्या सहकार्याने कोणते प्रकल्प हाती घेता येतील याचा विचार व आखणी हा आयोग करील.

बांगलादेशच्या संदर्भात भारताच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न होता तो म्हणजे मिझो व नागा बंडखोरांना बांगलादेशच्या चितगाव टेकड्यांचे भागात थारा दिला जातो. तेथून त्यांच्या हालचाली चालतात. चीनकडून त्यांना शस्त्रे मिळतात हे थांबविण्यासाठी बांगलादेश काय करणार आहे ? संयुक्त पत्रकात किंवा जनरल इर्शाद यांच्या भाषणात यासंबंधी काहीही उल्लेख नाही की इंदिरा गांधींनी वाटाघाटीत हा प्रश्नच उपस्थित केला नाही ? याबाबत निश्चित आश्वासन इर्शाद यांच्याकडून घेणे आवश्यक होते. □

---

**अवती भवती**

शरद कृष्णन

# वासनाकांड

कलकत्याच्या शाम बाजार विभागात राहणाऱ्या सेन कुटुंबियांसाठी तो दिवसही नेहमीसारखाच होता. अर्थात वर्षानुवर्षे घरात वावरणाऱ्या विमलाने नेहमीच्या सवयीप्रमाणे सेनसाहेबांसाठी नास्ता तयार केला आणि मग ती त्यांना उठवण्यासाठी गेली. सेनसाहेबांची झोप सावध असल्याने सर्वसाधारणपणे दारावर एकदोनदा टिकटिक केल्यावर दार उघडले जाई; परंतु त्या दिवशी काही प्रतिसाद मिळेना. दार उघडले जात नाही असे पाहिल्यावर विमलाने हाका मारल्या आणि तरीही सेनसाहेब उठण्याचे चिन्ह दिसेना. तथापि विमलाचा आरडाओरडा ऐकून शेजारच्या खोलीत झोपलेला त्यांचा मोठा मुलगा अशुतोष जागा झाला. काय गडबड आहे हे पाहण्यासाठी तो बाहेर आला. डॅडी उठत नाहीत असे पाहिल्यावर त्यानेही हाका मारून पाहिल्या; पण उपयोग झाला नाही. वेळ तशी पहाटेची असली तरी शेजारी राहणाऱ्या सी. पी. दासगुप्ता आणि त्यांच्या पत्नीला बोलावण्यात आले. दासगुप्ता यांनी दार फोडण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे दार फोडण्यात आले. दरम्यान जवळच रहाणारे डॉ. बी. के. मुखर्जी यांनाही पाचारण करण्यात आले. डॉक्टरांनी सेन यांची तपासणी करून त्यांना मृत्यू आल्याचे घोषित केले।

या अनपेक्षित बातमीने सेन कुटुंबामध्ये एकच हलकल्लोळ उडाला. सेन यांच्या कुटुंबामध्ये घरामधील चार माणसे होती. स्वतः सेन, नुकताच नोकरीला लागलेला बावीस वर्षांचा मुलगा अशुतोष आणि त्याच्या दोन लहान बहिणी–सतरा वर्षांची चंदा आणि तिच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान असलेली शिप्रा. कुटुंबामधील या माणसांखेरीज कुटुंबाचाच एक घटक बनून गेली वीस-बावीस वर्षे या कुटुंबाबरोबर राहणारी विमला आणि वरकामासाठी ठेवलेला आणि जवळजवळ सोळा वर्षे या कुटुंबाबरोबरच राहणारा नोकर बोलाई––असे एकूण सहाजण त्या घरात रहात होते. सेन यांची उमर ५५ वर्षांची असली तरी तब्येत उत्तम होती. त्यांना हृदयविकार अथवा अन्य कोणताही गंभीर आजार नव्हता. स्वाभाविकपणे त्यांच्या या अकल्पित मृत्यूने सेन कुटुंबावर मोठाच आघात झाला. आपल्या वडिलांना हृदयविकाराचा जबर झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले अशी अशुतोषची खात्री असली तरी सेन यांचे निधन अनपेक्षित असल्याने पोलिसांना बोलावणे जरूर होते. त्याप्रमाणे पोलिसांना बोलावण्यात आले. इन्स्पेक्टर एस. पी. गुहा चौकशीसाठी हजर झाले. प्रकरण दुर्दैवी असले तरी अगदीच सरळ दिसत होते; परंतु तरीही त्यांनी सेन झोपले होते त्या खोलीची तपासणी केली. सेन यांच्या उशाशी गर्भधारणाप्रबंधक गोळ्यांचे एक पाकीट मिळाले. पाकिटामधील काही गोळ्या वापरलेल्या दिसत होत्या. गुहा यांनी या गोष्टीची नोंद घेतली. विधुर असलेल्या सेन यांना या गोळ्यांची गरज कशासाठी भासत असावी अशी शंका त्यांच्या मनात जरूर निर्माण झाली; परंतु शवचिकित्सेचा तपशील हाती पडल्यावरच त्यांनी पुढील हालचाल करायचे ठरवले. दरम्यान घरामधील मंडळींचे आणि नोकरांचे जाबजबाब घेतल्यावर आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट पुढे आली. सेन यांची पत्नी लिपिका हिला पंधरा वर्षांपूर्वी अशाच प्रकारे मृत्यू आला होता. घरामधील मंडळींचे जबाब घेतल्यावर गुहा यांच्या लक्षात आले की, तिन्ही मुलांना विमलाबद्दल आदर असून ते तिला मावशीप्रमाणे मानतात. आणि मावशी म्हणूनच हाका मारतात. विमलाकडून जी हकिगत समजली त्यावरून असे जिव्हाळ्याचे नाते निर्माण व्हावे असाच हा ऋणानुबंध असल्याचे स्पष्ट झाले. ही विमला सेनसाहेबांच्या विवाहानंतर त्यांची पत्नी लिपिका हिच्याबरोबर सेनसाहेबांकडे आली. लिपिकाच्या माहेरच्या एका नोकराणीची ती मुलगी. लिपिकाला ती विशेष आवडत असल्याने तिने तिला लग्नानंतर आपल्या सासरी आणले. घरकामासाठी विमलाचा उत्तम उपयोग होत असल्याने कोणत्याच तक्रारीचे कारण नव्हते सेनसाहेबांचे लग्न झाले त्या वेळी विमलाचे वय केवळ १० वर्षांचे होते. तेव्हापासूनच या कुटुंबाचा एक घटक बनून आपण रहात असल्याचे विमलाने सांगितले. तसेच लिपिकाचे अकल्पित निधन झाले त्या वेळी सेनसाहेबांची मुले लहान

असल्याने आपण लग्न केले नाही व या मुलांच्या देखभालीतच अनेक वर्षे खर्ची घातली असेही तिने सांगितले. तिचे वागणे, बोलणे, पेहराव या साऱ्यामुळे गुहा चांगलेच प्रभावित झाले. अशी नोकरमाणसे या दिवसांतही असावीत याचेही त्यांना थोडे-फार अप्रूप वाटले; पण तरीही सेनसाहेबांच्या खोलीत मिळालेल्या गर्भधारणाप्रतिबंधक गोळ्यांचा त्यांना विसर पडला नव्हता. सर्वांच्या जबान्या झाल्या होत्या. आता केवळ बलाई या नोकराचा जबाब घेतला की, काम संपणार होते; परंतु या बलाईने बाँबगोळा टाकला ! त्याने आपल्या जबानीमध्ये सांगून टाकले की, सेन यांचे निधन झाले त्या रात्री ११ वाजता विमलाला त्यांच्या खोलीतून बाहेर पडताना त्याने पाहिले होते. सेन यांच्या मृत्यूनंतर त्याला लिपिकाचा मृत्यू नेमका आठवला. १५ वर्षांपूर्वी लिपिकाचे निधन झाले त्या वेळीही विमला तिच्या खोलीतून बाहेर पडताना त्याने पाहिली होती; पण नोकरीला लागून दोन-तीन महिनेच झाले असल्याने तो त्या वेळी काही बोलला नाही; पण ही जुनी आठवण त्याने गुहासाहेबांना या वेळी मात्र आवर्जून सांगितली. आपल्या जबानीचा शेवट करताना त्याने सांगून टाकले की, विमला जणू काही घराची मालकीण असल्याप्रमाणेच वावरत होती आणि अनेक वेळा ती सेनसाहेबांच्या खोलीत झोपत असे. बलाईच्या जबानीनंतर नेमका प्रकार काय असावा हे गुहासाहेबांच्या लक्षात आले. सेनसाहेबांच्या खोलीत मिळालेल्या गोळ्यांच्या पाकिटाचा अर्थही त्यांना उमगला. शवचिकित्सेमध्ये असे स्पष्ट झाले की, अर्सेनिक विष पोटात गेल्यामुळे सेन यांना रात्री २ वाजता मृत्यू आला असावा !

## तातडीने हालचाल

सेन यांचा खून झाला आहे हे स्पष्ट झाल्यावर इन्स्पेक्टर गुहा यांनी तातडीने हालचाल करून विमलाला उलटतपासणीसाठी बोलावून घेतले. विमलाबद्दलचा आपला संशय त्यांनी अशुतोषजवळही बोलून दाखवला. विमलाने केवळ त्याच्या वडलांचा खून केला आहे असे नव्हे तर १५ वर्षांपूर्वी त्याच्या आईचा जो मृत्यू झाला त्यालाही विमलाच जबाबदार असावी अशी त्यांची खात्री असल्याचे त्यांनी अशुतोषला सांगितल्यावर त्याला जबर धक्का बसला ! पोलिसांनी पुन्हा बोलावल्यावर विमला चमकली खरी; परंतु बाह्यात्कारी तिने आपला थंडपणा कायम ठेवला; परंतु इन्स्पेक्टर गुहा आक्रमक होते. त्यांनी विमलाला बलाईने दिलेल्या जबानीचा तपशील सांगितला. तसेच तू भले कुमारी असलीस तरी तुझ्या पोटाला पडलेल्या या वळकट्या दुसरेच काही सांगतात असेही त्यांनी तिला सुनवले. सेनसाहेबांवर विषप्रयोग करण्यात आल्याचे सिद्ध झाले आहे अशी माहिती तिला दिल्यावर विमला कोलमडून पडली! तिने गुन्हा कबूल केला आणि आपला कबुलीजबाब नोंदवला. मनुष्यस्वभावाचे आणि मानवी वर्तनाचे अनेक गहिरे रंग तिच्या या कबुलीजबाबात पहावयास मिळतात. आपल्या कबुलीजबाबात ती म्हणते की, लिपिकाच्या लग्नानंतरची ५ वर्षे व्यवस्थित गेली. सेनसाहेबांचे आणि लिपिकाचे बरे चालले होते; परंतु त्यांचे माझ्यावर लक्ष होते. मी पंधरा वर्षांची असताना आम्ही त्यांच्या बराकपूर येथील शेतावर गेलो होतो. तेथे मी बेसावध असताना त्यांनी माझ्यावर बलात्कार केला. मी हे कुणाला सांगू नये म्हणून माझी मनधरणी केली


श्री. सेन पतिपत्नी
हेच खुनाला बळी पडले


विमला
जिच्या हातांनी गुन्हा घडला

आणि मला भेटीदाखल एक साडी व अंगठी दिली. मी खूष झाले. पुढे आमचे नवराबायकोसारखे संबंध सुरू झाले. हे सारे लिपिकापासून दीर्घकाळ लपून राहणे शक्यच नव्हते. आमचे प्रेमप्रकरण ऐन रंगात आले असतानाच तिने एकदा आम्हाला पकडले. नवऱ्याची निर्भर्त्सना केली आणि माझी हकालपट्टी करणार असल्याचे सांगितले. सेन यांना बायकोचे हे वर्तन आवडले नाही. अधिक बभ्रा होण्यापूर्वीच बायकोचा काटा काढण्याचे त्यांनी ठरवले. ज्या विषाचे बाह्यात्कारी कोणतेही परिणाम लगोलग दिसणार नाहीत असे अर्सेनिक विष त्यांनी मिळवले आणि त्यांच्या सांगण्यावरून मी ते दुधाच्या ग्लासातून लिपिकाला दिले. रात्री झोपेतच लिपिकाचे निधन झाले! आपल्या पत्नीचे हृदयविकाराने निधन झाले असे भासवून हा खून पचवण्यात सेन यशस्वी ठरले! मी त्यांना आपले मानले, त्यांच्या मुलांना आपले मानले, माझी इच्छा एकच होती की मला जर मूल झाले तर त्याची देखभाल सेन यांनी करावी आणि आपल्या इस्टेटीमधील योग्य वाटा त्याला द्यावा. सेन या गोष्टीला तयार झाले. त्यामुळे वर्षानुवर्षे आमचे चोरटे संबंध कायम राहिले. मी गर्भवती असताना त्यांनी मला दार्जिलिंग येथे पाठवले. तेथेच मला एक मुलगा झाला. मुलगा दीड वर्षाचा झाल्यावर मी पुन्हा कलकत्त्याला येऊन सेनकुटुंबाबरोबर नेहमीप्रमाणे राहू लागले. दार्जिलिंग येथे असलेला माझा मुलगा मोठा झाला. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाऊ लागला. माझे आणि सेनसाहेबांचे संबंध नेहमीप्रमाणेच होते. मुलाचा खर्चही तेच चालवत असल्याने मला काळजी नव्हती; परंतु अलीकडे त्यांच्या वागण्यात तुटकपणा येऊ लागला. मुलगा मोठा झाला, कर्ता झाला. त्याला कलकत्ता महानगरपालिकेमध्ये नोकरी लागल्यावर त्याच्या लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्या. सेनसाहेबांनी स्वतःसाठी सून निश्चित केली. आपल्या मुलाचे लग्न होऊन सून घरात आल्यावर आपणाला विमलची अडगळ होईल असे त्यांना वाटू लागले. आत्तापर्यंत सारे गुलदस्तात होते; परंतु पुढे ते तसेच राहील याची खात्री नव्हती. मी आता घर सोडून जावे असे सेन यांनी सुचवले. माझ्या मुलाला इस्टेटीमध्ये वाटा देण्याचेही त्यांनी नाकारले. आपल्या विचाराशी ते पक्के आहेत हे माझ्या लक्षात आल्यावर ज्या पद्धतीने त्यांनी लिपिकाचा काटा काढला त्याच पद्धतीने मी त्यांना माझ्या मार्गातून दूर करायचे ठरवले! त्यांच्या निधनाने माझ्या परिस्थितीमध्ये कोणताही फरक पडणार नव्हताच. घरामध्ये मला

महत्त्वपूर्ण स्थान होतेच. अशुतोषच्या लग्नाचे बोलणेही माझ्या संमतीनेच चालले होते. घरामधील पैसाअडका, दागदागिने या साऱ्याचे नियंत्रण माझ्याकडेच होते. या परिस्थितीमध्ये केवळ सेन बदल करू शकत होते.योग्य तडजोड झाली असती तर गोष्ट वेगळी होती; परंतु ती होत नाही हे लक्षात आल्यावर मी सेन यांना बाजूला करायचे ठरवले. शाम बाजारामधील एका होमिओपाथिक दवाखान्यातून तिने आर्सेनिक विष मिळवले. ज्या दिवशी तिने सेनसाहेबांना हे विष दिले, त्या दिवशी त्यांचे निकराचे बोलणे झाले. त्यानंतर त्यांचा नेहमीप्रमाणे शरीरसंबंधही झाला. रात्री झोपण्यापूर्वी सेनसाहेबांनी दूध प्यावे म्हणून दुधाचा पेला विमलने तयार ठेवला होता. स्वतःच्या मनाशी योजल्याप्रमाणे तिने या दुधामध्ये अर्सेनिक विष कालवले होते. लिपिकाचा खून जसा पचला तसाच हाही खून पचेल अशी तिची भावना होती; परंतु हा खून उघडकीस आला आणि मग विमलाने मन मोकळे केले !

ही हकीगत समजल्यावर अशुतोषला फार मोठा धक्का बसला. त्याच्या बहिणीही चांगल्याच हादरल्या; पण ही कठोर वस्तुस्थिती अशुतोषने स्वीकारली आहे. वडलांच्या पश्चात तो आता आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पार पाडत आहे. आईसारख्या असलेल्या आपल्या मानलेल्या मावशीच्या वर्तनाचा बोध त्याला होत नसला तरी दार्जिलिंग येथे वाढणाऱ्या तिच्या मुलाचा या प्रकरणी काही दोष नाही. तसेच तो आपल्याच वडलांचा मुलगा असल्यामुळे त्याची जबाबदारी अशुतोषने स्वीकारली आहे. विमला सध्या तुरुंगात असली तरी ज्या मुलासाठी तिने हा सारा अट्टाहास केला त्याचा अशुतोषने भाऊ म्हणून स्वीकार केला असून त्याच्या पालन-पोषणाची आर्थिक जबाबदारी उचलली असल्याने तिला आता स्वतःच्या भवितव्याची काळजी वाटत नाही. तिला आता भवितव्य तरी कोठे आहे म्हणा ! लिपिकाचा आणि सेनसाहेबांच्या खुनाचा कबुलीजबाब तिने दिला असल्याने दीर्घ मुदतीचा कारावास किंवा मृत्युदंडही तिच्या वाट्याला येईल. केल्या कृत्याचे हे प्रायश्चित्त तिला घ्यावेच लागेल ! पाशवी वासनेच्या आहारी गेल्यानेच हे सारे रामायण घडले. सेनसाहेब व विमला यांनी संगनमत करून केलेला लिपिकाचा खून पचला असे आपणास वाटले तरी त्या खुनालाही पंधरा वर्षांनंतर वाचा फुटलेली दिसते. सेन यांना ज्या पद्धतीने मृत्यू आला त्यावरून लिपिकाला काव्यात्मक न्याय मिळाल्याचेही दिसून येते. ज्या बाईचा १२–१५ वर्षे उपभोग घेतला तिला खिडकारण्यास सेन का सिद्ध झाले असावेत ? स्वतःच्या प्रतिष्ठेपुढे त्यांना विमलाचे महत्त्वच जाणवले नसावे. मुलगा आता कर्ता झाला, घरात सून येणार, आपलेही वय आता उतरणीला लागलेले, आता हे नसते झंजट घरात ठेवले आणि पुढे कदाचित ते उघडकीस आले तर आपलीच अप्रतिष्ठा होईल असेही त्यांना वाटले असावे. विमलला सेनसाहेबांबद्दल काही भावनाच नसतील ? असे कसे असेल ? प्रथम तिच्यावर बलात्कार झाला असेलही; परंतु नंतरचा सगळाच मामला खुषीचा होता. तरीही सेन यांच्याबद्दल तिच्या मनात प्रीती अथवा विश्वास नसावा? एका घरात राहतात म्हणून त्यांचे संबंध असावेत. तथापी मुलांना त्याचा जराही सुगावा नसावा ? याचा अर्थ हे सारे प्रकरण त्यांनी विलक्षण गुप्तपणे सांभाळले असले पाहिजे ! सेनसाहेबांबरोबर तिचे काय संबंध असतील ते असोत; पण त्यांच्या विरुद्ध खुनाचे कारस्थान करताना तिच्यामधील आई जागी झाली असावी आणि तिच्यामधील या आईनेच व्यभिचारी सेनसाहेबांचा बळी घेतला असावा ! सेनसाहेब तर मरून गेले ! आपल्या या खुनी पित्याबद्दल अशुतोष, चंद्रा आणि शिप्रा या भावंडांना काय वाटत असेल ?... तसे पाहायला गेले तर हे एक साधे व्यभिचाराचे आणि खुनाचे प्रकरण; परंतु मानवी स्वभाव, वासना आणि मातृत्वाची भावना, या तिन्हींचा संयोग या दोन खुनांमध्ये पहावयास मिळतो—आणि हो, उघड्या डोळ्यांनी हे सारे प्रकरण पाहणारा बनाई बोलला म्हणूनच या खुनाला वाचा फुटली आणि हे सारेच प्रकरण उजेडात आले ! □


# तिसरी आवृत्ती

संपत आली





# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०





# महात्मा आणि माणूस

गोलमेज परिषदेला जाण्यासाठी गांधी लंडनला निघाले.
त्यापूर्वी हिंदू–मुस्लिम प्रश्न मात्र ते सोडवू शकले नाहीत.
गांधींच्या दौऱ्याचा वृत्तांत लिहिण्यासाठी शिरर यांना
शिकागो ट्रिब्यूननं पाठवलं होतं.
मर्सेलिसमध्ये शिररनी गांधींना गाठलं. सतरा वर्षांनी गांधी
युरोपच्या भूमीवर पाय ठेवत होते.
गांधी शिररना म्हणाले, ' गोलमेज परिषदेत भाषण
करण्याचा माझा विचार नाही; पण लँकेशायरच्या
गिरणी-कामगारांपुढे मी माझी बाजू मांडीन. '
गांधी लंडनला पोचले.
त्या गोठवणाऱ्या थंडीतही त्यांनी फक्त शाल पांघरली
होती.
सोमवारी गोलमेज परिषद सुरू झाली, त्या दिवशी गांधींचं
मौन होतं.
दुसऱ्या दिवशीचं त्यांचं भाषण मात्र वादळी होतं. भारत
आणि ब्रिटन यांनी समान पातळीवरून काम करावं या
मुद्द्यावर ते जोर देत होते. नंतर ते लँकेशायरला निघाले.
तिथल्या कापड-उद्योगाच्या मागासलेपणाविषयी गांधींना
बोलताना पाहून शिरर चक्रावून गेले. . . .

**' गांधी–अ मेमॉर '–विल्यम शिरर**
**लिखित पुस्तकाचा परिचयात्मक**
**संक्षेप व स्वैर रूपांतर**
**भाग नववा । निखिल वागळे**

गोलमेज परिषद काही यशस्वी झाली नाही.

स्वराज्याच्या संदर्भात कोणतंही नेमकं वचन न देण्याची ब्रिटिशांची चाल मात्र यशस्वी. एका अर्थानं ते स्वाभाविकच होतं. हिंदू आणि मुसलमानांना, तसंच अस्पृश्य वगैरे इतर अल्पसंख्यांकांना झुंजत ठेवायचा खेळ ब्रिटिश खेळत होते. जोपर्यंत सगळे भारतीय एकत्र येत नाहीत तोपर्यंत सरकार तरी वचन कसं देऊ शकणार? असला मानभावी प्रश्नही सरकारी गोटातून विचारला जात होता.

गांधींना ते अपमानास्पद वाटत होतं; पण ब्रिटिशांच्या दृष्टीनं ही चाल सहजसाध्य होती.

पंतप्रधान रामसे मॅकडोनाल्ड तर सतत यावरून भारतीय प्रतिनिधींना टोमणे मारत होते. या टोमण्यांमुळं का होईना; पण हिंदू–मुस्लिम नेते तोडगा काढतील असं चित्र सप्टेंबरच्या अखेरीच्या एकदोन दिवसात निर्माण झालं होतं.

गांधी रिट्झ हॉटेलमध्ये आगाखानांना भेटत होते. रात्रभर त्यांची चर्चा चाले. सगळ्यात मजेची गोष्ट म्हणजे आगाखानना इंग्लंडमध्ये कुणी मुस्लिम नेता म्हणून ओळखत नव्हतं. हा करोडोपती मुसलमान घोड्यांच्या शर्यती खेळण्यात तरबेज आहे एवढीच त्यांची ख्याती होती. गोलमेज परिषदेच्या काळातही लंडनची वृत्तपत्रं आगाखानच्या

परिषदेतल्या कामगिरीचं वृत्त छापत नव्हती, तर त्यांचे घोडे, जॉकी यांची रसभरित वर्णनं करण्यात दंग होती !

तडजोड दृष्टिपथात आल्याचं गांधींनी मला सांगितलं. खरं तर त्यांच्या आशावादाचा अनुभव मला भारतातल्या उन्हाळ्यात आला होता; पण अनुभवानं शहाणपण शिकणाऱ्यांपैकी बहुधा मी नव्हतो. पुन्हा एकदा मी या आशावादाच्या आहारी गेलो आणि हिंदू-मुस्लिम प्रश्नात तडजोड होणार अशा अर्थाची बातमी दिली.

या वेळी तरी ब्रिटिशांची पावलं मला ओळखता यायला हवी होती. हिंदू-मुस्लिम नेत्यांत तडजोड न होणं त्यांच्या हिताचं होतं आणि तसे प्रयत्न ते पडद्याआडून करत होते. माझ्या बातमीपत्रात मी तसं म्हटलं होतं. त्यामुळं सरकारची नाराजीही पत्करावी लागली होती; पण एक दिवस उदारमतवादी मानल्या जाणाऱ्या 'न्यूज क्रॉनिकल 'नं या विषयावर संपादकीय लिहिलं आणि माझ्या मताला दुजोरा मिळाला.

'भारतातले जातीय तणाव कायम रहावेत या दृष्टीनं काही शक्ती कार्यरत आहेत. या तणावांमुळंच गोलमेज परिषद फिसकटली असं भासवण्यात या शक्ती यशस्वी होतील!' न्यूज क्रॉनिकलनं म्हटलं होतं.

दिवसेंदिवस या शक्ती प्रभावी होत होत्या आणि उघडपणे वावरण्यास त्यांनी सुरुवात केली होती.

एक ऑक्टोबरला संध्याकाळी हाउस ऑफ कॉमन्समध्ये घडलेली घटना याबाबत बोलकी ठरावी. दोन्ही सभागृहांचे सभासद मोठ्या प्रमाणात जमले होते. यात बहुसंख्या हुजुरांची. भारतीय मुस्लिमांना या सभेचं खास आमंत्रण होतं. किंबहुना सभेचं लक्ष्यच ते होते. सगळ्या गोऱ्या सभासदांचा प्रयत्न एकच—'तुमचं भवितव्य ब्रिटिशांच्या राज्यातच सुरक्षित आहे. ते हिंदूंच्या हाती सोपवून तुम्ही काय साधणार ?' प्रत्येकजण या मुस्लिमांना विचारत होता. खुशामतखोरीला ऊत आला होता. या प्रांतातलं ब्रिटिशांचं सारं कसब जणू पणाला लागलं होतं !

मुस्लिम जर राजाशी एकनिष्ठ रहात असतील तर त्यांना योग्य ते बक्षीस देण्यात येईल, त्याचा लढाऊपणा लक्षात घेऊन भारतीय सैन्यात त्यांच्याकडे महत्त्वाची कामगिरी सोपवली जाईल आणि हिंदूंना त्यांच्यावर कुरघोडी करण्याची संधी कधीही दिली जाणार नाही असं ठोस आश्वासन लॉर्ड लॉइड आणि लॉर्ड ब्रेन्टफोर्ड या हुजूर पक्षीय खासदारांनी या सभेत दिलं.

या आश्वासनानं सर मोहम्मद शफी आणि शौकत अली भारावूनच गेले.

'तुम्ही आमच्या मागण्या मान्य करा. आम्ही राजदंडाशी कधीही प्रतारणा करणार नाही!' शौकत अली ब्रिटिश भुलथापेला बळी पडले होते. आपल्या नेहमीच्या आडदांड आवेशात त्यांनी पुढे गर्जना केली, 'आम्हाला ब्रिटिशांशी मैत्रीचं नातं जोडायचं आहे!'

त्याबरोबर सभेत एकच जयघोष झाला—'शाब्बास! वाहाव्वा!! आगे बढो...'

मग सभागृहातला मजूर पक्षाचा एकमेव खासदार उठला आणि म्हणाला, 'दोन एकनिष्ठ मुस्लिमांची मतं आपण ऐकली. कुणा राष्ट्रीय मुस्लिमाला इथे आपली मतं मांडायची आहेत का?'

राष्ट्रीय मुस्लिमांचे एकमेव नेते सभागृहात हजर होते—सर अली इन्मान. ते ताबडतोब उठले; पण अध्यक्षस्थानी असलेल्या लॉर्ड ब्रेन्टफोर्डना ते दिसले किंवा त्यांचा आवाज त्यांना ऐकू आला नाही. त्यांनी सभा तहकूब केली!

जयघोषात मात्र खंड नव्हता. 'भारतीयांपासून भारत वाचवण्यासाठी' गोऱ्यांना आता हे एकनिष्ठ मुस्लिम मदत करणार होते.

त्या दिवशी संध्याकाळी मी गांधींना भेटलो. 'सगळीकडे अंधारल्यासारखं वाटतंय.' ते म्हणाले; पण त्यांनी आशा सोडली नव्हती. त्यांच्या विनंतीनुसार पंतप्रधान मॅकडोनाल्डनी अल्पसंख्याक समितीची बैठक आठवडाभर पुढे ढकलली होती. या अवधीत गांधी तडजोडीचा आणखी एक प्रयत्न करणार होते. सभा तहकूब होताना आपल्या देशबांधवांकडे वळून त्यांनी कडवटपणे म्हटलं होतं, 'एका फाटक्या पटकुरासाठी आपण भांडतो आहोत. हे पटकूर ब्रिटिशांच्या ताब्यात आहे आणि आपण आपसातले मतभेद मिटवत नाही तोपर्यंत ब्रिटिश ते आपल्याला देणार नाहीत!' आगाखान आणि इतर मुस्लिमांबरोबरची आपली बोलणी चालू रहातील असं गांधींनी मला सांगितलं.

'मी अजूनही आशावादी आहे.' ते मिष्किलपणे हसले आणि अचानक विषय बदलत म्हणाले, 'ते जाऊ द्या.उद्या इथे एक छोटासा वाढदिवससमारंभ होणार आहे. त्याला तुम्ही जरूर यायचं!'

वाढदिवसाचं निमंत्रण मला गांधींच्या काही मित्रांनी अगोदरच दिलं होतं. त्यांना मोठा थाटमाट करायचा होता; पण गांधींनी नकार दिला. शाकाहारी जेवणाची अटही त्यांनी घातली. जेवणावर फळं द्यावीत, जेवणाचा सगळा खर्च एका शिलिंगच्या आत बसावा म्हणजे गरिबानी समारंभात सहभागी होता येईल असं त्यांचं म्हणणं होतं.

दोन ऑक्टोबर १९३१. काय वाटल असेल त्या दिवशी गांधींना? माझ्या मनात आलं. बासष्टावं वर्ष त्यांना लागणार होतं. अजूनही त्यांची प्रकृती ठणठणीत होती. इंग्लंडमधल्या थंडीलाही ते खुशाल तोंड देत होते.

गांधींना पूर्णपणे थकवा आल्याचं पाहून मी उठलो. दरवाजाशीच त्यांचे डॉक्टर भेटले.ते गांधींच्या दिवसरात्री काम करण्याच्या पद्धतीमुळे काळजीत होते.

'आता तर ते चारेक तासच झोपतात;' ते म्हणाले, 'आम्ही त्यांना काम कमी करायला सांगतो; पण ते त्याकडे लक्षच देत नाहीत!'

¤

गांधींचा तो वाढदिवस संघर्षमयच म्हणायला हवा. दिवसरात्र ते तोडग्यासाठी झगडत होते. त्या सतपुरुषाच्या व्यक्तिमत्त्वाचं हे योद्धेपण पाहून त्या दिवशी वेस्टमिन्स्टर हॉलमध्ये जमलेल्या गोऱ्या पाहुण्यानाही धक्का बसला.

याचा अर्थ त्याच्या चेहऱ्यावरचा निरागसपणा लोपला होता असा मात्र नाही. एक जुन्या पद्धतीचा इंग्लिश चरखा यामंडळींनी गांधींना भेट दिला तेव्हा एखाद्या लहान मुलासारखा त्याना आनंद झाला. जगाच्या कानाकोपऱ्यातून अक्षरशः शेकडो अभिनंदनपर तारांचा वर्षाव झाला होता. त्यांना आलेल्या वाढदिवसाच्या भेटीत तर सोन्याच्या नाण्यापासून शेळीपर्यंत सारं काही होतं!

गांधी हे पाहून मनोमन सुखावले. अर्थात आवश्यक तो करारीपणाही त्यांनी कायम ठेवला. हे विशेषत्वाने जाणवलं त्यांच्या भाषणाच्या वेळी.

'नेहमी नम्र असणारे भाषण करताना जणू झंझावातच झाले होते' मी त्या वेळच्या माझ्या बातमीपत्रात लिहिलंय.

वाढदिवसासाठी जमलेल्याना असं काही ऐकायला मिळेल अशी पेक्षा नव्हती. अशा सुखद प्रसंगी तरी गांधी राजकारण बाजूला ठेवतील असं त्यांना वाटलं होतं.

पण गांधींनी ब्रिटिशांवर कठोर टीका केली.

'स्वराज्य हा तुमच्याप्रमाणेच आमचाही जन्मसिद्ध अधिकार आहे. त्यासाठी कोणतीही किंमत द्यायला आम्ही तयार आहोत. स्वातंत्र्यासाठी रक्तपात घडवायची आमची इच्छा नाही हे खरं. माझा अहिंसेवर विश्वास आहे आणि त्याप्रमाणे मी आचरण करतो हेही खरं; पण गरज पडलो तर रक्त सांडायलाही आम्ही तयार आहोत. आमच्या पवित्र गंगामातेचं सारं पाणी रक्तानं माखलं तरी बेहत्तर; पण आम्ही स्वातंत्र्य मिळवूच !'

अशो रक्ताची भाषा गांधीनी यापूर्वी कधी केल्याचं मला आठवत नव्हतं. हा कडवटपणा, उग्रपणा आणि आवेशही गांधीच्याबाबत मी कधी अनुभवला नव्हता.

जमलेले गोरे हितचिंतकही अस्वस्थ झाले; पण गांधींना पर्वा नव्हती. पर्वा करायची वेळही निघून गेली होती.

तसं पाहिलं तर गांधीनी अशा तऱ्हेचं मत पंधरवड्यापूर्वी ब्रिटिश खासदाराकडेही व्यक्त केलं होतं; पण लंडनमधल्या एकाही वृत्तपत्राला ते प्रसिद्ध करायची गरज वाटली नव्हती.

"ब्रिटिशांची भारतातली सत्ता फायदेशीर आहे असं मानण्याइतकं दुसरं ढोंग नाही. ब्रिटिशांच्या सत्ताकाळातच भारताच्या दारिद्र्यात भर पडली आहे आणि स्वातंत्र्याचे हक्क भारतीयांना नाकारले जाताहेत हे तुम्ही विसरू शकत नाही. ब्रिटिशांचं हे राज्य सुराज्य नसून कुराज्य आहे असं मी तुम्हाला स्पष्टपणे सांगू इच्छितो !" गांधी पुढे म्हणाले.

त्यांच्या शब्दांना प्रतिसाद दिला सभागृहात पसरलेल्या निःस्तब्ध शांततेनं. वाढदिवसाच्या समारंभाचा 'असला' अनुभव जमलेल्या ब्रिटिशांच्या दृष्टीनं अनोखा होता.

जेवण आटोपल्यावर गांधी ताबडतोब सेन्ट जेम्स पॅलेसमध्ये गेले. बैठक अर्थातच हिंदू–मुस्लिम प्रश्नावर तोडगा काढण्यासाठीच. तिथून त्यांची भेट सर सॅम्युअल होअर या गृहखात्याच्या सचिवाकडे ठरली होती. झगडा दुहेरी होता – फक्त ब्रिटिशांशीच नव्हे तर देशबांधवांशीसुद्धा !

कधीकधी गांधींना राजकारण नकोसं वाटायचं. वाढदिवसाच्या संध्याकाळी त्यांना तसंच वाटलं असावं. कसल्या तरी अनामिक ओढीनं ते ईस्ट एण्ड वसाहतीत परतले. तिथे गोदी-कामगारांच्या मुलांनी त्यांच्यासाठी समारंभ आयोजला होता. गांधी तिथे सर्वार्थाने रमले, मुलात मूल झाले ! त्या दिवशीचा तो त्यांचा सगळ्यात आनंदाचा क्षण असावा ... माझ्या मनात आलं.

¤

त्या आठवड्याची अखेर एखाद्या दिवास्वप्नासारखी होती.

अगोदरच लंडनची सगळी वृत्तपत्रं गांधीविरोधी होती. त्यांना अपयश येतंय हे पाहून तर ती चेकाळलीच. दुसरीकडे मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, पारशी, अस्पृश्य वगैरे अल्पसंख्याकांच्या मागण्या दिवसेंदिवस वाढत होत्या.

शनिवार दिवसभर आणि रविवारी सकाळपर्यंत गांधी अल्पसंख्याकांना एकजुटीची विनवणी करत होते.

"स्वराज्याची मागणी आपण एकजुटीनं करू या. स्वतंत्र मतदारसंघ आणि इतर मागण्यांबाबत एखाद्या निःपक्षपाती आयोगाचा विचार करता येईल किंवा या मागण्यासाठी निवडून आलेल्या भारतीय नेत्यांची एक समिती नेमता येईल." त्यांनी सुचवलं.

याला ताबडतोब नकार मिळाला. गोलमेज परिषदेतल्या प्रतिनिधींपैकी बहुतेकजण निवडून आलेले नव्हते. ब्रिटिशांच्या कृपादृष्टीवरचा त्यांना परिषदेचं निमंत्रण देण्यात आलं होतं हे लक्षात घेतलं की, या नकारामागची स्वाभाविकता कळते.

गांधी निराश झाले होते. तरीही त्यांनी भारतीय प्रतिनिधींना अखेरचा इशारा दिला.

त्याचाही उपयोग झाला नाही.

लंडनच्या वृत्तपत्रांनी सगळा दोष गांधींच्याच माथी मारला.

'ऑब्झर्व्हर'च्या जे. एल. गार्विननी आपल्या संपादकीयात म्हटलं, "गांधींचं स्वप्न निष्फळ आहे. ब्रिटिश सत्ता कमकुवत झाली तर भारतात चीनप्रमाणेच अराजकता माजेल !"

'सण्डे एक्सप्रेस' याही पुढे गेला. 'गांधींचं अपयश' हेच त्यांच्या अग्रलेखाचं शीर्षक होत. गोलमेज परिषद फिसकटल्यानं गांधींची सारी प्रतिष्ठा धुळीस मिळाली आहे असं मत या पत्राच्या संपादकांनी व्यक्त केलं.

सहा ऑक्टोबरला गांधींनी तडजोडीचा निर्वाणीचा प्रयत्न केला. हिंदू–मुस्लिम नेत्यांची ही बैठक चोवीस तास जवळजवळ अखंडपणे चालली. तरीही गांधींनी मला बोलावलं.

"मी हरलो – साफ हरलो ! जातीय तणावावरही तोडगा निघू शकला नाही आणि ब्रिटिशांकडूनही काही सवलत मिळाली नाही." ते म्हणाले.

गांधींना स्वातंत्र्य मिळवण्यात अपयश आलं होतं हे खरंच; पण गोलमेज परिषदेत स्वातंत्र्य मिळवू अशी त्यांची अपेक्षा तरी कुठं होती ?

---

**अशी रक्ताची भाषा गांधींनी यापूर्वी कधी केल्याचं मला आठवत नव्हतं. हा कडवटपणा, उग्रपणा आणि आवेशही गांधींच्याबाबत मी कधी अनुभवला नव्हता.**

**जमलेले गोरे हितचिंतकही अस्वस्थ झाले; पण गांधींना पर्वा नव्हती. ती वेळही निघून गेली होती.**

अजून वेळ आली नव्हती. थोडीफार मशागत बाकी होती.

– आणि हिंदू–मुस्लिम प्रश्न सुटला नाही यात गांधींचा दोष कितपत होता? मुस्लिमच ब्रिटिशांच्या भूलीला बळी पडले नव्हते का?

खूप वेळ मी यावर विचार केला; पण गांधींनी सगळा दोष स्वत:वर का ओढवून घ्यावा हे मला समजू शकलं नाही. यामुळं एकापरीनं ते ब्रिटिश सरकारच्या आरोपाचाच स्वीकार करत नव्हते का?

भारतीयांचा दोष होता हे निश्चित; पण परिषदेच्या अपयशाची त्याहीपेक्षा अधिक जबाबदारी ब्रिटिश सरकारची होती. गांधींनी अनेकदा विनंती करूनही स्वराज्याबद्दल काहीही आश्वासन त्यांनी दिलं नव्हतं.

'हा मुद्दा तुम्ही जाहीररीत्या जवळजवळ डझनभर वेळा मांडलाय.' मी त्यांना म्हणालो.

पण चर्चा करायला ते तयार नव्हते. तसा त्यांचा मूडही नव्हता. प्रचंड थकवा तर होताच; पण त्याहीपेक्षा होती घनघोर निराशा!

आठ ऑक्टोबरला परिषद अधिकृतपणे फिसकटली!

'माझ्या आयुष्यातला हा सगळ्यात अपमानकारक दिवस!' गांधी त्या दिवशी संध्याकाळी मला म्हणाले. ब्रिटिशांनी काहीही आश्वासन दिलं नाही म्हणून तसं त्यांना वाईट वाटत नव्हतं. भारतीयांतली दुफळी त्यांना बोचत होती. राज्यकारभार चालवायला भारतीय नालायक आहेत हे ब्रिटिशांचं म्हणणंच जणू या भांडणामुळं सिद्ध झालं होतं.

भांडणाचं गोलमेज परिषदेत पडलेलं प्रतिबिंब तर घृणास्पद होतं. हिंदू, मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, अस्पृश्य नेते जणू एकमेकांचे गळे पकडायलाच सिद्ध झाले होते. प्रत्येकजण दुसऱ्यावर टीका करत होता. गांधीही यातून सुटले नाहीत. डॉ. आंबेडकरांनी गांधींविरुद्ध असे काही कठोर शब्द वापरले की त्यामुळं केवळ भारतीय प्रतिनिधीच नाही तर ब्रिटिशही चिडले. गांधी आपल्या जागी शांतपणे बसले असले तरी आंबेडकरांच्या टीकेमुळं तेही भावनाविवश झाल्याचं दिसत होतं.

'मी तुमचा आभारी आहे.' ते आंबेडकरांकडे वळून म्हणाले.

त्यानंतर हिंदू–मुस्लिम नेत्यांच्या बोलण्यांचा अहवाल.

गांधी उठले.

'अतीव दु:खानं आणि त्याहीपेक्षा अपमान पचवून मी हे सांगत आहे.' ते म्हणाले, 'पण-हे अपयश म्हणजे अंतिम पराभव नव्हे. किंबहुना माझ्या शब्दकोशात पराभव हा शब्दच नाही!'

मग आणखी एकवार त्यांनी आपल्या देशबांधवांना आवाहन केलं. अर्थातच निरुपयोगी.

मला सगळ्यात मजा वाटली पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांची. एखाद्या शाळामास्तरप्रमाणे ते वागत होते.

'जोपर्यंत तुम्ही स्वत:ची भांडणं मिटवणार नाही तोपर्यंत सरकार तुम्हाला काहीही देऊ शकणार नाही!' ते म्हणाले.

मला चकित केलं ते पंतप्रधानाच्या ढोंगीपणानं. काही वर्षांपूर्वी त्यांनी जिनेव्हाला केलेलं भाषण मला आठवलं. ब्रिटिशांच्या शांतताप्रियतेबद्दल ते बोलले होते. सेन्ट जेम्स पॅलेसमधलं त्यांचं त्या दिवशीचं भाषण ऐकताना त्यांनी भारताला दिलेली भेटही माझ्या डोळ्यांसमोर आली. तेव्हा ते मजूरपक्षाचे तरुण नेते होते. स्वातंत्र्याच्या भारतीयांच्या आकांक्षेबद्दल त्यांना सहानुभूती होती.

आणि आज या भाषणाच्या वेळी...किती बदल झाला होता त्यांच्यात! हुजुरांच्या पाठिंब्यावर त्यांचं सरकार अवलंबून होतं आणि याच कमजोरीमुळं ते साम्राज्यवादी भाषा करत होते!

गांधींना याचं आश्चर्य वाटत नव्हतं; पण ते उदास दिसत होते. आता भारतात परतल्यावर ते नेहरू–पटेलांशी चर्चा करून परिस्थितीचा अंदाज घेणार होते.

पुन्हा संघर्षाशिवाय पर्याय नव्हता!

आणखी एका कायदेभंगाच्या चळवळीचा जन्म, हजारोंच्या अटका, मारहाण, दडपशाही...पुन्हा तेच चक्र!

आणखी एक ओझं आता गांधींच्या खांद्यावर होतं. मुस्लिम आणि विशेषत: अस्पृश्यांचा त्यांच्यावर असलेला अविश्वास गोलमेज परिषदेत स्पष्ट झाला होता. या अविश्वासामुळंच गांधी दुखावले गेले होते, डळमळीत झाले होते. ब्रिटिशांच्या टोमण्यांची त्यांना सवय होती; पण आपल्याच देशबांधवांच्या लाथा खाव्या लागतील हे सर्वस्वी अनपेक्षित होतं. आता भारतात परतल्यावर फक्त ब्रिटिशांना समजावून चालणार नव्हतं तर या अल्पसंख्याकांनाही स्वातंत्र्याचं मोल पटवण्याची कामगिरी त्यांच्यावर होती.

लंडन सोडण्यापूर्वी मी किंग्जले हॉलमध्ये गेलो–गांधींचा निरोप घेण्यासाठी. ते खुषीत होते. चेष्टामस्करीही झाली. मी भारतात परतणार का, म्हणून त्यांनी मला विचारलं.

'बहुदा नाही.' मी उत्तरलो. बेकारी आणि ढासळत्या अर्थव्यवस्थेने ग्रासलेल्या युरोपात एक घटनाचक्र वेग घेत होतं. अनागोंदी, फॅसिझम आणि युद्धग्रस्ततेकडे ही वाटचाल असल्याचा माझा होरा होता. मी तसं गांधींना सांगितलं.

'खरंच?' त्यांनी विचारलं. 'युरोपातल्या घटनांचा विचार करायला मला अजून वेळच मिळाला नाही.'

अर्थात युरोपातली ही परिस्थिती म्हणजे ब्रिटिश साम्राज्य कमजोर होणं हे ते जाणून होते. ही कमजोरी भारताच्या पथ्यावरच पडणार आहे असं त्यांनी जाहीररीत्या सांगितलं होतं.

मी भारतात परतणार नाही म्हणून गांधींना थोडंसं आश्चर्य वाटलं. खरं तर त्यांनी त्याला एवढं महत्त्व द्यायचंही कारण नव्हतं; पण त्यांना माझा सहवास आवडत होता किंवा माझ्या सहवासाची सवय झाली होती इतकंच.

'तुम्ही मला सांगितल्याप्रमाणे तुमच्या हयातीत जर भारताला स्वातंत्र्य मिळालं तर मात्र मी त्याबद्दल लिहायला नक्की येईन!' मी काहीशा विनोदानं म्हटलं.

'मग कदाचित आपण लौकरच भेटू.' तेही त्याच सुरात म्हणाले! पुढं काहीशा गंभीरपणे त्यांनी म्हटलं, 'पाश्चिमात्य लोकांनी आम्हाला जास्त समजून घ्यायला हवं. लंडनमध्ये मला हे पुन्हा एकदा जाणवलं. अर्थात याबाबत तुम्ही मला खूपच मदत केली आहे.'

'तुमच्या एखाद्या कृत्याचा अर्थ मला लागला नाही तर पत्र किंवा तार पाठवून त्याबद्दल विचारलं तर चालेल का?' मी विचारलं.

'चालेल म्हणजे? चालेलच. किंबहुना तुम्ही तसं कराच. मी तुरुंगात असलो तरी तुम्हाला उत्तर पाठवीन!' ते हसले.

त्यांनी आपला शब्द तंतोतंत पाळला. अगदी तुरुंगात असताना सुद्धा !

माझी आणि गांधींची ती अखेरची भेट !

नंतर मी त्यांच्याशी पत्र किंवा तारेद्वारे संपर्क ठेवला होता. भारतीय आणि लंडनची वृत्तपत्रंही माझ्या वाचनात होती.

भारतात घडणाऱ्या त्या लोकविलक्षण कहाणीनं जणू मला बांधूनच ठेवलं होतं. माझ्या आयुष्यातला, पत्रकारितेतला तो महत्त्वाचा टप्पा होता...

गांधींच्या आयुष्याचा अखेरचा काळ मात्र फारसा सुखाचा म्हणता येणार नाही. ती एक शोकांतिका म्हणावयाची का ? सांगता येणार नाही !

गांधी उपोषणापाठोपाठ उपोषणं करत होते. १९४३ च्या फेब्रुवारीतलं त्यांचं एकवीस दिवसांचं उपोषण तर चिंताग्रस्तच होतं !

एकीकडे 'चले जाव'च्या चळवळीनं जोर धरला होता. गांधींचे शब्द तमाम भारतीयांच्या मनाचा ठाव घेऊन होते--

'करेंगे या मरेंगे ! लेकिन स्वराज्य लेके रहेंगे !'

'आता गुलामीचं जिणं जगणं नाही !'

जनता पेटली होती. अनेक ठिकाणी पोलिसठाणी, सरकारी कचेऱ्या जाळण्यात आल्या. रेल्वेमार्ग उखडले गेले. ब्रिटिश अधिकाऱ्यांवरही हल्ले झाले.

व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथ्गोनं या सगळ्याचा दोष गांधींच्या माथी मारला. त्यांनी हिंसेला चिथावणी दिल्याचा आरोप त्यानं केला.

गांधींच्या दृष्टीनं हा धक्काच होता. जन्मभर अहिंसेचा वसा घेतलेल्या माणसावर चक्क हिंसेचा आरोप ?

त्यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला. व्हाइसरॉयचा गैरसमज दूर करायची प्रार्थना त्यांनी देवाजवळ केली.

याचा ब्रिटिशांवर मात्र परिणाम शून्य ! विन्स्टन चर्चिल त्या वेळी पंतप्रधान होते. 'गांधी मेले तरी बेहत्तर; पण तडजोड करू नका !' चर्चिलनी निरोप पाठवला. त्यांच्या दृष्टीनं कटकट संपणार होती. गांधींना सरणावर चढवायच्या तयारीलाच ते लागले. अंत्यसंस्कारांसाठी पुण्यात (जिथे गांधी नजरकैदेत होते) पुरोहितांना बोलावण्यात आलं. सरणासाठी चंदनी लाकडाची जमवाजमव गुप्तपणे होत होती.

पण गांधी वृद्ध असले तरी मृत्यूला सहजासहजी शरण जाणाऱ्यातले नव्हते. त्यांची प्रकृती ढासळली होती. मलेरिया, हुगवण, अॅनिमियासारख्या रोगांनी त्यांच्यावर कब्जा मिळवला होता.

तग धरण्यात, चिवटपणे जिवंत रहाण्यात त्यांना यशही मिळालं !

¤

गांधींवर दुसरा आघात झाला बावीस फेब्रुवारी १९४४ ला. आयुष्यभर साथ देणाऱ्या कस्तुरबांचं निधन झालं. भरीस भर म्हणून एक कायमची टोचणी त्यांना लागून राहिली. कस्तुरबांना ब्रॉन्कायटिसचा त्रास होता. पेनिसिलिनशिवाय पर्याय नाही असं डॉक्टर्सनी सांगितलं; पण गांधींचा पेनिसिलिनला विरोध होता. त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वाच्या ते विरुद्ध होतं. त्यांनी डॉक्टरांना अडवलं. कस्तुरबा जगू शकल्या नाहीत !...

त्यातच त्यांचा मुलगा हिरालाल दिवसेंदिवस हाताबाहेर जात होता. कस्तुरबा मृत्युशय्येवर असतानाही तो दारूच्या नशेत तिथे आला. कस्तुरबांनी आधीच नवऱ्याकडून मुलाला सांभाळण्याचं वचन घेतलं होतं. हिरालालची ही अवस्था पाहून त्या पार कोलमडल्या. दुसऱ्या दिवशीच मृत्यूनं त्यांना कवटाळलं !

¤

गांधींच्या अपेक्षेपेक्षा खूपच लवकर भारत स्वतंत्र झाला; पण पंधरा ऑगस्टची ती रोषणाई, तो मुक्ततेचा आनंद, त्यांच्या नशिबी होता कुठे ? फाळणीची वेदना आणि द्वेष-हिंसाचाराची छाया सगळ्या वातावरणात होती.

गांधी दूर कलकत्त्यात-नौखालीत होते.

हिंदू-मुस्लिमांच्या तणातणीवर अपेशी फुंकर घालत होते. इथेही त्यांना आपलं आयुष्य पणाला लावावं लागलं. उपोषणाचा मार्ग अनुसरला तेव्हाच हिंदू-मुस्लिम नेते तडजोडीला तयार !

कलकत्ता संपला तोच दिल्ली.

रक्तपात आणि प्रेतांचा खच !

दुभंग देशाचं माणूसपण ठेचणारं हे वर्तन पाहून काय वाटलं असेल गांधींना ? कशासाठी केला हा अट्टाहास ? असलं स्वातंत्र्य मला नको असं तर ते म्हणाले नसतील ?

गांधी फाळणी स्वीकारायला तयार नव्हते. याबाबतीत त्यांचं नेहरू-पटेलांशीही फाटलं. ते दोघे व्यवहारी होते. हाता-तोंडाशी आलेला घास गमवायला तयार नव्हते. फाळणी ही त्यांच्या दृष्टीनं आता अपरिहार्यता होती.

'मी आता एकटा पडलोय.' गांधी त्या वेळी आपल्या एका नोकराजवळ म्हणाले, 'नेहरू आणि पटेलांनाही मी चुकतोय, माझ्या उतारवयाचा हा परिणाम आहे, असं वाटतंय. कदाचित त्यांचं बरोबरही असेल. मी मात्र अंधारात चाचपडतोय !'

दिल्लीतही गांधींना उपोषण करावं लागलं. तेरा जानेवारी १९४८ ची ही गोष्ट. त्यांच्या आयुष्यातलं हे अखेरचं उपोषण; पण त्यामुळे दंगा मात्र शमला.

¤

गांधी जगले पाहिजेत, मोठ्या प्रयासानं मिळालेल्या स्वातंत्र्याला वळण द्यायला तरी त्यांनी राहिलं पाहिजे असं बहुसंख्य भारतीयांना वाटत होतं.

**गांधी उपोषणापाठोपाठ उपोषणं करत होते. १९४३ च्या फेब्रुवारीतलं त्यांचं एकवीस दिवसांचं उपोषण तर चिंताग्रस्तच होतं ! एकीकडे 'चले जाव' च्या चळवळीने जोर धरला होता. गांधींचे शब्द तमाम भारतीयांच्या मनाचा ठाव घेऊन होते–**
**'करेंगे या मरेंगे !**
**लेकिन स्वराज्य लेके रहेंगे !'**

पण नियमाला अपवाद हा असतोच. चांगल्या भावनेला कुठे तरी डाग नाही लागला तर डागाचं डागपण ते कसलं ?

उजव्या विचारसरणीच्या हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अतिरेक्यांना मात्र गांधी मरावेत असं मनोमन वाटत होतं. फाळणीला गांधीच जबाबदार आहेत, त्यांनी हिंदुस्थाशी द्रोह केला आहे, असं या मंडळीचं म्हणणं होतं.

उपोषणांमुळं गांधी न मेल्याचं पाहून त्यांनी त्यांना मारण्याचा कट केला. पुण्याहून दोघे ब्राह्मण या कामगिरीवर निघाले !

जानेवारी वीस १९४८ !

लागोपाठच्या उपोषणांमुळं थकलेला हा महात्मा खुर्चीत बसूनच प्रार्थनेसाठी आला होता त्यांचा आवाज क्षीण झाला होता. शरिरावर एक विलक्षण कृशता जाणवत होती. डॉ. सुशीला नायर ते काय म्हणताहेत हे ऐकत होत्या आणि मोठ्यानं म्हणून दाखवत होत्या.

इतक्यात प्रचंड आवाज झाला !

कुणी तरी बॉंब फेकला होता.

सुदैवानं कुणालाही इजा झाली नाही.

गांधींनी जमावाला शांत केलं आणि प्रार्थना पुढं चालू ठेवली.

बॉम्ब फेकणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली.

पण या घटनेनंतर दहा दिवसांनी मारेकऱ्यानी पुन्हा डोकं वर काढलंच.

जानेवारी तीस, १९४८ !

शुक्रवार ! याच दिवशी ख्रिस्ताला क्रूसावर लटकवण्यात आलं होतं...

गांधींनी आपलं संध्याकाळचं जेवण घेतलं आणि ते प्रार्थनेला गेले.

आता ते चालू शकत होते. अंगात थोडीफार शक्तीही आली होती.

पाचेकशेचा जमाव बिर्ला हाउसच्या आवारात जमला होता. गांधी जमावातून वाट काढत व्यासपीठापर्यंत गेले. लोक आपसूक बाजूला होत होते. प्रत्येकजण नम्रपणे वाकत होता, त्यांच्या पायाला स्पर्श करत होता.

यापैकीच एक नथूराम गोडसे.

वय वर्षे तेहतीस

मुक्काम पुणे.

जातिवंत ब्राह्मण

तोही वाकला. भाव नम्रपणाचाच !

उठला तो मात्र हातातलं पिस्तुल रोखून आणि क्षणार्धात त्याने तीन गोळ्या झाडल्या.

लक्ष्य नेमकं. गांधींची छाती !

'हे राम !' गांधी म्हणाले

आणि कोसळले.

या वेळी मृत्यूनं त्यांचा पराभव केला होता.

¤

गांधींनी मला खूप काही दिलं.

आयुष्याकडे बघण्याची नवी दृष्टी, अहिंसेचा अद्भुत विचार आणि वर्णन न करता येण्याजोगा अनुभव.

धर्माकडे बघण्याची नवी नजरही त्यांच्याकडूनच मला मिळाली. 'सत्य हाच देव' ते नेहमी म्हणत...

गांधींना भेटण्यापूर्वी मी कोण होतो मला माहीत नाही. ख्रिश्चन धर्मात जन्मलो होतो; पण त्या धर्मावर माझा विश्वास होता का ?

गांधी मला ख्रिश्चनपणाच्याही पलीकडे घेऊन गेले. बायबल, गीता, कुराणाचं त्यांचं वाचन होतं. धर्म ते सांगत, पण लौकिकार्थानं ज्याला धर्म म्हणता येईल त्या चौकटीत अडकून पडत नसत. त्यांच्या धर्मचिंतनापाठीही माणूसपणाचा, समतेचा विचार होता. कोणताही धर्म श्रेष्ठ नाही, सारे समान ही त्यांची शिकवण माझ्या मनात पुरती भिनली.

गांधींना भेटल्यावर मी फक्त ख्रिश्चन राहिलो नाही.

मला कोड्यात पाडलं त्यांच्या ब्रह्मचर्याविषयीच्या प्रयोगांनी. शेवटच्या दिवसात नौखालीत असताना ते तरुण नग्न स्त्रिया अंथरुणात घेऊन झोपत. 'माझ्या ब्रह्मचर्याची मी कसोटी पहातोय' ते म्हणत; पण त्याची खरोखरच गरज होती का ?

थंडीपासून बचाव करण्यासाठीही म्हणे त्यांना ते आवश्यक वाटत असे.

पण मग बायकाच का ?

एखादं जाड पांघरूण का घेत नव्हते ते ?

गांधींच्या व्यक्तिमत्त्वात एक लैंगिकतेची ओढ होती. आपल्या आत्मकथनात त्यांनी याविषयी दाखले दिले आहेत. त्यांच्याशी गप्पा मारतानाही हेच जाणवत असे. खोलीत ही ओढ भरून राहिल्यासारखी वाटे. विशेषत : मेडलिन स्लेडबरोबरचं त्याचं वर्तन. कस्तुरबानाही ते पसंत नसावं. 'काय पाहलं त्यांनी या गोऱ्या कातडीत?' असाच भाव त्यांच्या डोळ्यात तरळत असे.

गांधींना आपल्या ब्रह्मचर्याची वेळोवेळी कसोटी पहावी लागे हाच त्यांनी स्वीकारलेल्या त्या अनैसर्गिक व्रताचा पराभव नव्हता का ?

मी आजही यावर विचार करतो आहे.

¤

गांधींच्या निधनाची बातमी मला अमेरिकेत असताना कळली. न्यूयॉर्कमध्ये मी बी. बी. सी. वरच नेहरूंचं भाषण ऐकलं. गदगदलेल्या आवाजात ते म्हणत होते—

'आमच्या आयुष्यातला प्रकाश हरवला. सगळीकडे अंधारच अंधार दिसतोय. आमचा प्रिय नेता, राष्ट्रपिता आता आमच्यात नाही.'

माझ्याही डोळ्यांतून अश्रू ओघळले. समोर गोठल्यागत प्रश्नक पात्र पसरलं होतं. मी खिडकीतून बाहेर पाहिलं. आयुष्यातला नंदीच हरवल्याचा अनुभव मीही घेत होतो.

अंधार.

निःशब्द अंधार!

अंधारानंच सारं भरून गेलं होतं जणू.

पण फार काळ ही अंधारली भावना टिकली नाही.

पृथ्वीतलावर महात्मा गांधींनी पेरलेला प्रकाश या अंधारलेपणावर मात करण्याइतका समर्थ होता.

गांधी गेले, पण हा प्रकाश दिवसेंदिवस पसरणारच आहे...

शतकानुशतकं या दिव्यत्वाच्या साक्षात्कारानं प्रकाशमान होणार आहेत.

—आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत हा प्रकाश मलाही साथ देणार आहे.

गांधींची भेट झाली हे माझं केवढं भाग्य !

मी नियतीचा खरोखरच आभारी आहे...

## सुदैव : शिररचं आणि आपलं !

विल्यम शिरर भारतात दोन वर्षं राहिले. ज्या वेगाने ते भारतभर हिंडले, इथल्या लोकभावनेशी एकरूप झाले त्याची तसं पाहिलं तर काही गरज नव्हती. 'शिकागो ट्रिब्यून'नं त्याला इथे पाठवलं. त्यांची अपेक्षा स्वातंत्र्यलढ्याविषयी काही 'खास बातम्या' मिळाव्यात अशी होती.

साधारणपणे अशा संघर्षाच्या वेळी घडणारी प्रत्येक घटना ही बातमी असते. वार्ताहरानं थोडं—फार डोकं चालवलं, घटनांशी संबंधित चार-दोन व्यक्तींशी व्यवस्थित संधान बांधलं की या बातम्यांच्या 'खास बातम्या' व्हायलाही वेळ लागत नाही. वाचकांना वाटतं काय बातमी मिळवलीय या पठ्ठयानं ! ही छाप असते वार्ताहराच्या तरबेजपणाची, चलाखीची आणि शैलीबाजीची. त्यानं केलेल्या मेहनतीला फार तर ढोरमेहनत म्हणता येईल. इंग्रजीत याला अधिक सुबक शब्द आहे —हार्ड वर्क.

शिररना अशा बातमीदारीत रस नव्हता. किंबहुना ही मेहनत हे प्रत्येक विशेष प्रतिनिधीचं कर्तव्य आहे, कर्तृत्व नव्हे ही जाण त्यांच्या लिखाणात जाणवते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातली सृजनशीलता त्याना तेवढ्यावर समाधान मानू देत नाही. घटनेपाठी असलेली माणसं ते निरखतात, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात घुसण्याचा प्रयत्न करतात.

शिररचं वेगळेपण नेमकं इथे आहे.

ते भारतात आले, राहिले त्या काळातले इतर परदेशी वार्ताहर सामान्य होते अशातला प्रकार नाही. त्यांनीच या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे त्या वेळी युनायटेड प्रेसचं प्रतिनिधित्व करणारे वेब मिलर, व्हिन्सेन्ट शिहान ही तर पत्रकारितेतली दादामंडळी होती. आपल्या चीनवरच्या पुस्तकांसाठी जगभर प्रसिद्धी मिळवलेले एडगर स्नोही शिरर सिमल्यात असताना तिथे आले होते; पण शिरर इतका गांधींच्याजवळ कुणीच जाऊ शकला नाही. त्यांच्यात ती क्षमता नव्हती असं म्हणण्याचं धाडस कुणीच करणार नाही, पण यापैकी प्रत्येकाच्या मनात काही पूर्वग्रह होते; तेही खास पाश्चिमात्य गांधींच्या अहिंसेच्या कल्पनेची टवाळी करण्यात ही मंडळी आघाडीवर होती.

शिरर स्वच्छ मनानं भारतात उतरले. गांधींचं अहिंसेचं तत्त्व म्हणजे नेमकं काय हे त्या वेळी त्यानाही माहीत नव्हतं. टवाळीचा सूर त्यांच्याही परिचयाचा होता; पण गांधींच्या पाठी कोट्यवधी जनता धावते आहे हेही ते पहात होते. ही जनता अडाणी असली तरी आंधळेपणाने धावायला ती काही जंगली जनावरं नाहीत, गांधींच्या संदेशात त्यांना काही तरी नवं गवसलंय हे त्याला जाणवलं होतं.

आणि अडाण्यांचं माणूसपण त्यानी हेरलं. चेष्टेवारी नेण्यासारखा हा विषय नाही या भावनेनं ते गांधींशी बोलले. चर्चेत अनेक मुद्दे आले. प्रत्येक शिररना समजलाच असं नाही; पण शिकण्याची त्यांची धडपड होती.

अर्थात सावधपणा त्यानी गमावला नाही. गांधी मोठे आहेत म्हणून त्यांची प्रत्येक गोष्ट खरी असं मानायला ते काही त्यांचे अनुयायी नव्हते ! सावधपणाच्या बाबतीत त्यांच्यातला वार्ताहर त्यांच्या कामी आला. म्हणूनच गांधी संत असले तरी धोरणी राजकारणी आहेत, राजकारण आणि धर्माची ते गफलत करतात ती योग्य नाही हे ते बजावतात. गांधींच्या धर्मविषयक चिंतनाचा विचार वेगळेपणाने करायला हवा हेही ते या वेळी विसरत नाहीत. म्हणूनच सकाळी पाच वाजता ते त्यांच्याबरोबर फिरायला जातात आणि या विषयावरची त्यांची मत जाणून घेतात.

ब्लॉटिंग पेपरच्या सराईतपणे शिरर गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा एकेक पैलू शोषून घेतो. मग हा सराईतपणा, ओघ—उस्फूर्तता त्यांच्या शैलीत उतरते आणि समोर येतं, एक निखळ माणूसपण.

गांधींचा मोठेपणा निर्विवाद. त्यांच्या सर्व चरित्रातून तो मांडला गेलाय; पण या चरित्राचा आधार आहे गांधींच्या आयुष्यात घडलेल्या आणि त्यांनीं घडवलेल्या घटनाची जंत्री. लुई फिशरनी लिहिलेलं किंवा डी. जी. तेंडुलकरांनी रेखाटलेलं गांधीचं चरित्र या अर्थानं 'समग्र' आहे. तरीसुद्धा त्यात सतत कुठं तरी उणेपण जाणवतं. गांधींचं व्यक्तिमत्त्व फट्कन डोळ्यांसमोर आलंय असं वाटत नाही.

शिररच्या पुस्तकात घटनांची जंत्री अजिबात नाही. स्वानुभवाच्या त्या नोंदी आहेत. एखाद्या डायरीतून लेखकाचं व्यक्तिमत्त्व पारदर्शकपणे उभं रहावं तसं शिररच्या पुस्तकातून गांधीचं माणूसपण पुढं येतं, कसलाही आव न आणता.

आणि या माणूसपणाची ओळख होणं जास्त महत्त्वाचं. एखाद्याला महात्मा ठरवलं की, तो माणसातून दूर जायला वेळ नाही लागत. गांधींच्या इतर चरित्रातून हा दुरावा सतत जाणवतो. शिरर गांधींना माणसात ठेवतो, माणूस म्हणून रेखाटतो. मग वाटतं, देव आणि माणूस हा गांधी आणि आपल्यातला फरक नाही, तर माणूस आणि खुरटी झुडपं हा फरक आहे.

गांधींचे एक जुने सहकारी विठ्ठलभाई झवेरी यांनी गांधीवर 'महात्मा' ही डॉक्युमेंटरी बनवली आहे. साडेपाच तासांची ही फिल्म फारशी कुठे प्रदर्शित झालेली नाही. गांधीविषयीची जुनी कागदपत्रं, छायाचित्रं, त्यांच्या युरोपवारीच्या फिल्म्स यांचं संकलन 'महात्मा'त आहे. ज्यांना गांधी कसे होते जाणून घ्यायचंय त्यानी ही फिल्म पहावी. शिररचं पुस्तक हाती येण्याआधी ती फिल्म बघण्याची संधी मला मिळाली. एका दृष्टीनं ते फायदेशीरच ठरलं. शिररचं रेखाटन आणि गांधीचं फिल्ममधलं प्रत्यक्ष रूप मी ताडून पहात होतो शिररच्या शैलीच अदृश्य सामर्थ्य नेमकं इथं जाणवलं. वाटलं, एक अदृश्य दृक्-परिणाम (visual impact) या पुस्तकाला लाभला आहे.

शिररचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या काळात (१९२९–

३१) गांधींचा मोठेपणा जाणवलेल्या फार थोड्या व्यक्तींपैकी तो होता. रोमाँ रोलाँ, बर्नार्ड शॉ अशी मोजकी मोठी माणसं त्या काळी गांधींचं कौतुक करत होती. शिररची त्यांच्याशी तुलना करण्याचा इथं तिळमात्र हेतू नाही; पण पहिलेपणाचं योग्य श्रेय त्याला दिलंच पाहिजे ! त्यानंतर अनेकांना गांधींचं मोठेपण जाणवलं हेही लक्षात घेतलं पाहिजे.

या संदर्भात शिररनंच सांगितलेला एक किस्सा नमूद करायला हवा.

किस्सा शिररच्या परमप्रिय मित्रांचा – एडगर स्नो आणि व्हिन्सेन्ट शिहान यांचा आहे.

एकतीस साली पहिल्यांदा एडगर स्नो चीनमधून भारतात आले. त्या वेळी गांधी सिमल्यात होते. तिथेच त्या दोघांची भेट झाली.

स्नो त्या वेळी चीनच्या एवढे प्रेमात होते की, त्यांना भारतात फारसा रस वाटला नाही. गांधींचा प्रभावही त्यांच्यावर पडला नव्हता.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी शिरर आणि स्नोंची भेट झाली तेव्हाही ही तटस्थता कायम होती. स्नो त्या वेळी गांधींवर ब्रिटिशांना युद्धात पाठिंबा दिल्याबद्दल टीका करत होते. या पाठिंब्याचा उपयोग झाला नाही, ब्रिटिशांनी स्वातंत्र्याची मागणी नाकारली तेव्हा स्नोंना गांधींबद्दल सहानुभूती वाटली इतकंच. शिररबरोबर त्यांनी अनेकदा चर्चा केली; पण गांधींचं मोठेपण काही त्यांना पटू शकलं नाही.

स्नोंचं हे मत बदललं गांधींच्या आयुष्याच्या अखेरीला. अठ्ठेचाळीस सालच्या सुरुवातीला ते गांधींना पुन्हा भेटले. 'सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट'चे ते वार्ताहर होते.

या वेळी मात्र गांधींच्या दिव्यत्वाची प्रचीती त्यांना आली. गांधींनी त्यांचं मन जिंकलं होतं.

"ते खरोखरच महान आहेत!" स्नोंनी नंतर या भेटीबद्दल लिहिताना म्हटलं.

जे स्नोंचं तेच व्हिन्सेन्ट शिहानचं.

का कुणास ठाऊक शिहानना गांधींच्या मृत्यूची पूर्वकल्पना आली होती. सत्तेचाळीस सालच्या नोव्हेंबरातली ही गोष्ट. एक दिवस सकाळी शिहाननी शिररना फोन केला आणि ताबडतोब बोलावलं.

"गांधी लवकरच जाणार आहेत!" शिहान म्हणाले. "मला भारतात जायलाच हवं. आयुष्याबद्दल बरंच काही ते मला शिकवू शकतील."

"त्यांच्याकडून मला बरंच काही शिकता आलं." शिरर म्हणाले.

"हो. मला माहितीय. गेली पंधरा वर्षं तू मला तेच सांगतो आहेस!" शिहानचं उत्तर.

"पण ते तर तुला कंटाळवाणं वाटायचं." शिररनी टोला हाणला.

"नाही, नाही! मला ते समजत नव्हतं असं म्हण हवं तर. ते कळण्याइतका मी परिपक्व झालो नव्हतो. आता मात्र मला ते गांधींकडूनच शिकायचंय!" शिहाननी सारवासारव केली.

"मला ते आधीच शिकता आलं हे केवढं मोठं सुदैव!" शिरर अभिमानानं म्हणाले.

शिररचं सुदैव तर खरंच; पण त्याहीपेक्षा आपलं सुदैव!'

शिरर भारतात आले, राहिले, नंतरही त्यांनी संपर्क ठेवला यामुळं आज आपल्याला गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा उलगडा झाला; नाही का?

– निखिल वागळे

**स मा प्त**

---


# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : २० रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

# बहुतेकजण अतिशय थोडक्यात बोलले, त्यामुळे चर्चा कंटाळवाणी झाली नाही.

विनया खडपेकर

संजीव खांडेकर, आनंद नाडकर्णी, निखिल वागळे वगैरेंच्या पुढाकाराने दिनांक १९ ऑगस्टला झालेल्या 'ग्रंथाली'च्या बैठकीत संवाद या चर्चा-व्यासपीठाची स्थापना झाली. शनिवार दि. १८ सप्टेंबर १९८२ सायंकाळी ६ वाजता मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय सभागृह नायगाव दादर येथे 'संवाद' व्यासपीठातर्फे 'सत्यकथेचा अस्त' या विषयावर पहिली खुली चर्चा झाली. चर्चेचे संचालन वासंती मुझुमदार यांनी केले.

चर्चेचे प्रास्ताविक वासंती मुझुमदार यांनी निश्चित असे मुद्दे मांडून अतिशय योग्य प्रकारे केले. वासंती मुझुमदार आपल्या प्रास्ताविकात म्हणाल्या, 'ही शोकसभा नाही. वाङ्मयीन नियतकालिक बंद पडावं यात फारसं आश्चर्य नाही. यापूर्वीही काही नियतकालिकं बंद पडली आहेत. राजस, शब्दश्री या नियतकालिकांचा आरंभ जाणवला; पण अस्त जाणवला नाही. सत्यकथेचा अस्त जाणवतो आहे. आतापर्यंत जाणत्यांच्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत; पण वाचकाच्या अशा प्रतिक्रिया आल्या नाहीत. सत्यकथेच्या बंद होण्याच्या संदर्भात अजिता काळे, ग्रेस वगैरेसारख्यांचा म्हणजे सत्यकथेच्या लेखक-कवींचा सूर हळवा आहे. दुसरा विरोधी सूर म्हणतो- सत्यकथा बंद झाल, बरंच झालं. यात प्रामुख्यानं ज्यांना सत्यकथेत लिहायचं होतं; पण स्वीकारलं गेलं नाही असे लोक होते. आनंद यादव किंवा चि. त्र्यं. खानोलकर म्हणतात, आम्हाला भागवतांनी घडवलं. सगळ्याच मासिकाना संपादक असतात; पण भागवत लेखकाची ताकद ओळखून त्यांना लिहायला लावत. इरावती कर्व्यांच्या 'आजोबा' या लेखासाठी भागवत सहा वर्षं त्यांच्या मागे होते. वास्तविक 'सत्यकथा'सारखीच केंद्रे महाराष्ट्रात ठिकठिकाणी हवी होती. 'सत्यकथा'ला पर्याय नाही. एकदा स. शि. भावे म्हणाले होते, *'सत्यकथा' १९६५ मध्येच बंद पडली.* १९६५ पासून 'सत्यकथे'चा कलावाद सुटला. व्यवहारवाद्यांनी 'सत्यकथा' जवळ केली नाही. श्री. पटवर्धनांनी असा दृष्टिकोन स्वीकारला की आम्ही लेखकांकडे जाणार नाही. नव्या लेखकांनी आमच्याकडे यावं. त्यातलं चांगलं असेल ते आम्ही घेऊ. हा दृष्टिकोन 'सत्यकथे'ला *नडला का ? 'सत्यकथे'ला एक प्रश्न* बऱ्याच वेळा विचारण्यात येतो– आणीबाणीत 'सत्यकथे'नं काय केलं ? वास्तविक हे विचारण्याचा फक्त दुर्गा भागवतांना अधिकार आहे; पण इतरजणही विचारतात. र.कृ.जोशी, वसंत आबाजी डहाके, दिलीप चित्रे यांच्या आणीबाणीविरुद्धच्या कविता 'सत्यकथा'मध्ये प्रसिद्ध *झाल्या होत्या.*

सत्यकथेसाठी जाहिराती मिळविण्याला व्यवस्थापन कमी पडले. त्यासाठी जे लागते तो पिंडच नाही. मग तडजोड की माघार ? 'सत्यकथे'नं माघार घेतली. 'सत्यकथे'चे अंक चांगले निघत नाहीत हे नेमके केव्हा लक्षात आले ?

सत्यकथेच्या निमित्ताने एक प्रश्न येतो वाङ्मयीन नियतकालिकेच या गतीला येतात का ?

वासंती मुझुमदार यांच्या प्रास्ताविकानंतर अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. कोणतेही पाल्हाळ न लावता बहुतेकजण अतिशय थोडक्यात बोलले. त्यामुळे चर्चा कंटाळवाणी झाली नाही.

**अनिल डांगे :** माझ्या आयुष्यातला एक नंबरचा शत्रू म्हणजे राम पटवर्धन! १९६६ मध्ये मी कथा लिहिली. पटवर्धनांनी ती फारच गंभीरपणे वाचली. माझ्याशी चर्चा केली आणि मी 'सत्यकथे'साठी लिहायला लागलो. नाही तर मी व. पु काळेंसारखा लेखक झालो असतो. माझ्या कॅसेट्स निघाल्या असत्या; पण हे पटवर्धन कशाला भेटले ? सत्यकथेच्या बंद होण्यात दोन प्रकारचा पराभव आहे. एक म्हणजे मॅनेजमेंट आणि दुसरा कल्चरल. दुसरा पराभव महाराष्ट्राचा आहे. पुस्तक कोणी विकत घेत नाही हा त्या माध्यमाचा पराभव आहे; संपादकाचा पराभव नाही. एक आशावादी सूर काढायचा तर सांगतो, अशोक शहाणे म्हणाले सत्यकथा बंद पडली बरेच झाले! आता सत्यकथेत लिहिणारी पोरे इतरत्र काही चांगलं लिहितील !

**मंदाकिनी गोगटे :** सत्यकथा बंद पडली. कारण काळाची गरज संपली. काळाची गरज संपली म्हणून माणसाचं शेपूट गेलं तसं हे म्हणायचं का ? काळाची गरज म्हणजे तरी काय ? दारू पूर्वी वाईट समजली जायची. आता चांगली समजली जाते. सत्यकथा बंद पडलं म्हणजे आता चांगल्या कथा नकोशा झाल्या का ? चांगल्या कथा देणारं 'हंस' चालत आहे; पण 'वीणा' बंद पडलं. याला कारण मुंबईला प्रिंट पुण्यापेक्षा महाग आहे. मुंबईच्या धावपळीच्या जीवनात जाहिराती मिळविणं कठीण जातं. पुण्यात हसला जाहिराती मिळवण सोपं जातं. आपली खाण्याची, वागण्याची प्रवृत्ती बदलते. त्यामुळं सत्यकथा बंद पडते.

**सुधा जोशी :** व्यावहारिक कारणांचा मी विचार करीत नाही. मला जे इतर वाटतं ते बोलते. जे करायचं ते जमत नाही तर मासिक कशासाठी चालवायचं अशा आशयाचे उद्गार संचालकांनी काढले. याचा अर्थ वाचकांचा प्रतिसाद नाही का ? अंक विकत घेणे हा प्रतिसाद होऊ शकत नाही. लेखक–वाचक यांच्यात सतत जिवंत संवाद उरला नाही. साहित्यात उत्साह आहे; पण तो popular पातळीवर आहे. कोणी तरी *म्हटलं, मी व.* पु. काळ्यांसारखं लिहिलं असतं. वाटतं तितक ते सोप नाही. त्याची वेगळी कोष्टकं

असतात. १९६० च्या आधीची सत्यकथा आणि नंतरची सत्यकथा यात दुरावा आहे. त्याची कारणं कोणती होती हे शोधणं मला आवश्यक वाटतं.

प्रकाश बुरटे जग याचे प्रयोजन साधत नाही असं भागवत म्हणाले. केवळ नवीन आणि गंभीर तेवढच सत्यकथाकार कायम देत राहिले. आधीचा वाचक या रूपाशी, नंतरच्या नाविन्याशी एकतान होऊ शकला नाही. म्हणून प्रयोजन संपलं असा मी अर्थ करतो.

रवींद्र पिंगे : दैनिकांची रूपं बाळसेदार झाली आहेत. आमची भूक दैनिक भागवते. दैनिकाचे रविवार पेज नाटक–चित्रपट पुरवण्या हे सगळे आम्हाला पोटभर होते. दैनिकं बहरली म्हणून मासिकाना भवितव्य नाही. सत्यकथेचे लेखक कुठे जातील ? किर्लोस्कर-कडे जातील. ज्याना कुठेच काही मिळणार नाही ते रेडिओवर जातील.

वसंत आबाजी डहाके : इतकी नियतकालिकं साप्ताहिकं, दैनिकं चालतात, तर सत्यकथाच का बंद पडलं ? बंद पडलं हे फार वाईट झालं. चागलं नाही झालं. हिंमत नाही याचं वाईट वाटतं. सातत्यानं काही करायचं ही निष्ठाच कोलमडली असं सत्यकथेच्या अस्तामुळं वाटतं.

## नकोशी कविता

जनार्दन मुळेकर : मी वाचक आहे. १९६५ नंतरचेच अंक माझ्या पहाण्यात आहेत, त्याला धरूनच बोलतो. सत्यकथा नवीन लेखकाना दिलासा होता. मी विदर्भातला आहे. आमच्याकडे एक कल्पना आहे की, पुण्या–मुंबईतले लोक विदर्भातल्या लोकाना विचारीत नाहीत. माझा तसा अनुभव नाही. माझ्या कवितेची पटवर्धनानी गंभीर दखल घेतली; पण मला वाटतं चित्र आणि कविता या बाबतीत सत्यकथेचं नाविन्य अगदी टोकाला गेलं, उदाहरणार्थ : शुभदा रेगे यांची 'स्त्री' च्या मासिक पाळीवरची कविता, असली कविता अगदी नकोशी वाटते. र. कृ. जोशी यांची कविता डोक्यावरून जाते. नुसत्या विरामचिन्हांची ही कविता कशी समजवून घ्यायची ? डोकं कितीही खाजवलं तरी शेवटी नुसतं रक्त येतं; पण कविता कळत नाही, पाच रुपये टाकून हे असं वाचण्यासाठी मासिक विकत घ्यायचं ? किंमतीचाही विचार व्हायला हवा. माझ्या एका बंगाली मित्रांनी एकदा सत्यकथेचा अंक पाहिला. त्याला फक्त किंमत वाचता आली. त्याने सत्यकथेच्या दुप्पट आकाराची 'अदेश' आणि 'मृत' ही बंगाली मासिकं दाखवून सागितलं–त्याचं मूल्य फक्त एक रुपया आहे. दुर्बोधतेला प्रतिष्ठा द्यायला सत्यकथा मासिकानं सुरुवात केली. केवळ नवीन म्हणून छापायचे तेथे असे होऊ लागले. सत्यकथेच्या बंद पडण्यात याचा विचार व्हायला हवा.

सुभाष डेंभे : श्रीः मुळेकराची प्रतिक्रिया अगदी प्रामाणिक आणि बरोबर वाटली. 'एक कोंबडी क्वॅक क्वॅक करते...' या असल्या सत्यकथेतल्या कवितेचा अर्थ काय ? या कविता कळण्यासाठी सत्यकथेने काय प्रयत्न केले ? जातेगावकर, डागे यांनी जोमाने लिहिले नाही. जातेगावकर लिहायचे थाबले यावरच सत्यकथेत खूप चर्चा झाली. मला आता सत्यकथेच्या कवीची काळजी वाटते. शंकर रामाजी, वसंत आबाजी डहाके या कवींचं आता कसं होईल ? पिंगे म्हणाले, 'येथले लोक दुसरीकडे जातील; पण बऱ्याच मासिकाची प्रथम पानावर सूचना असते– 'आम्हाला कविता नकोत !' सत्यकथेला विनोद हे इंद्रिय पहिल्यापासून नाहीच. काळाबरोबर जायचं असेल तर विनोद पाहिजे. रामदासांनी 'टवाळा आवडे विनोद' म्हटलं त्याच विधानाला सत्यकथाकार चिकटून राहिले. परिक्रमा हे सदर आवश्यक आहे; पण त्याचा एवढा विस्तार आवश्यक नाही. तुम्ही काही करा, आम्ही तुमच्यामागे येणार नाही या सत्यकथेच्या वागण्याची तिला शिक्षा मिळाली. सत्यकथाकारांना व्यवहार कळला नाही. लोकमत कळलं नाही.

रमेश तेंडुलकर : आपले कार्य करून अवतार संपला म्हणून एखाद्या मासिकानं समाधी घेतली तर ठीक आहे; पण सत्यकथेचे तसे झाले नाही. गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगुळकर, अरविंद गोखले यांच्या कथा सत्यकथेत यायच्या. वास्तव आणि कला याच्या सीमारेषेवरचं जग सत्यकथेनं पकडलं होतं. तसं पुढं झालं नाही. सत्यकथा बंद होताना कोठे तरी एखादे नवीन वाङ्मयकेंद्र निर्माण झालं असतं तर काही वाटलं नसतं.'

राजा पगारवाकर : १९६० च्या आधीचे लेखक समाजाच्या पुढे होते. आताचे लेखक वाचकांच्या मागे वाटतात. वाचक प्रगल्भ झाला आहे. तो कोठे कोठे फिरून आला आहे. त्याच्या जाणिवांच्या कक्षा रुंदावल्या आहेत' त्याला लेखक पुरा पडू शकत नाही, हा काही सत्यकथेचा दोष नाही. दुसरे म्हणजे आजच्या गतिमान काळात वाचकांशी एक महिना संबंध तुटणे बरोबर नाही. पूर्वीच्या 'मौज . सारखे पुन्हा साप्ताहिक सुरू करावे. चांगल्या कार्यासाठी पैसे कमी पडत नाहीत. मी लेखक म्हणून जगतोय् म्हणून अधिकारानं सांगतो.-

दया पवार : पटवर्धनाची आणि माझी नेहमीच खडाजंगी होते. मी विंदा करंदीकरांवर टिपण लिहून दिलं होतं. तेव्हा विंदांचा दबदबा मोठा होता. विंदांना आव्हान करणारा हा कोण म्हणून पटवर्धनांनी मला चर्चेला बोलावल. पटवर्धनांनी माझं टिपण छापलं. जेव्हा मी जिल्ह्याच्या ठिकाणी जातो तेव्हा लक्षात येतं कॉलेजचे प्राध्यापक, कॉलेज मॅगझिन्स या सगळ्यावर सत्यकथेचा विलक्षण दबदबा आहे. एक नवब्राह्मण्य सत्यकथेकडून निर्माण होत आहे असं वाटलं. जसं हिंदीतली कविता वाचताना मी हादरतो तसं सत्यकथा वाचताना मी हादरत नाही. कारण त्यांची समाजाची नाळ तुटली आहे. कोष निर्माण झाला आहे, मला जाणवतं. आनंद यादव कलामूल्यांचं, प्रतिमेचं ओझं उगीच वागवतात. त्यानी असं ओझं वागवण्याचं कारण सत्यकथा. सत्यकथेतल्या कवताज्या असतात; पण कथा–कविता तशा वाटत नाहीत. माझी कथा पटवर्धनांना आवडली नाही; पण इतर किती तरी भाषेत त्याच कथेचे अनुवाद झाले. याचं कारण सत्यकथेचा सांस्कृतिक दुरावा असं मला वाटतं; पण पटवर्धनांनी मला घडवलं.

प्रभुराम जोशी : सत्यकथेच्या संदर्भात स. शि. भावे यांनी केलेला १९६५ या वर्षाचा उल्लेख पुन:पुन्हा झाला. १९६५ हे वर्ष भारतात विभाजन करणारं, शेवट करणारं असं होतं. १९६५ नंतर मूल्यात्मक हानी विलक्षण झाली. मी अर्थशास्त्राचा विद्यार्थी. त्याचा आणि साहित्याचा संबंध लागतो काय पहातो; या वर्षानंतर वैचारिक आव्हाने कोणती ? समष्टीने व्यक्तीला खाऊन टाकले. व्यक्ती केविलवाणी धडपडते, याचं प्रतिबिंब साहित्यावर पडलं आहे का ? परत व्यक्ति-

त्ववादाची प्रतिष्ठापना केली पाहिजे ते चुकीचे वाटते. अकाळविकळ समष्टीचे काय? तिचे micro स्वरूप पाहिले पाहिजे.

संजीव खांडेकर : संपूर्ण चर्चा सात-आठ वर्षांपूर्वी झाली असती तर बरे झाले असते. त्याचा उपयोग झाला असता. रा. भी. संस्कृती तेवढीच संस्कृती, असं सत्यकथेनं मानलं. तीच संस्कृती जोपासली. ग्रामीण जीवनाकडे लक्ष दिलं नाही. स्वत:च्या दुःखाचा डोंगर करायची सत्यकथेला सवय आहे. मत्स्यालयात आपण पाण्यातले मासे बघतो. त्या पाण्यालाच समुद्र म्हणायचं असं सत्यकथेचं झालं आहे. पन्नास वर्षं चाललेलं मासिक बंद पडलं. वाईट झालं; पण शोक करण्याचं मुळीच कारण नाही.

कल्पना कोठारे : मी वाचकाची प्रतिनिधी. माझ्या चौकोनी कुटुंबातली मी एकटीच या चर्चेला आले. यावरून 'सत्यकथा' मासिकाबद्दलची आस्था समजून घ्या. सत्यकथेने वास्तवतेचे दरवाजे माजवले आहेत.

विनया खडपेकर : फक्त एकच गोष्ट नजरेला आणून द्यायची आहे. सत्यकथेनं ग्रामीण जीवनाकडे लक्षच दिलं नाही असं विधान आता केलं गेलं, ते चुकीचं आहे. ग्रामीण जीवनावरच्या किती तरी कथा सत्यकथेत प्रसिद्ध झाल्या आहेत. उदाहरणार्थ — आनंद पाटील यांच्या कथा. सत्यकथा केवळ रा. भी. संस्कृतीत अडकली असं म्हणणं अज्ञानाचंच आहे.

## सांगता—समारंभ

शेवटी 'सत्यकथा' मासिकाचे संपादक श्री. राम पटवर्धन बोलले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "चर्चा ऐकून माझ्या मनातला गोंधळ वाढला आहे. बहुतेक चर्चेतून हेच निष्पन्न होते. श्री. खांडेकर म्हणाले शोक वगैरे काही करायचं कारण नाही. हे भरतवाक्य म्हणून मला आवडलं. मी म्हणतो हा सांगता-समारंभ आहे. छाती पिटण्याची गरज नाही. ही नेहमीच्या व्यवहारात घडणारी गोष्ट आहे. अनेक संस्था बंद पडतात. त्यांची कामं तशीच असतात तशीच 'सत्यकथा' बंद पडली साहित्यप्रेम चालू राहील सत्यकथा बंद झाली म्हणून मी काही व्याकूळ झालो नाही. श्री. पु. भागवतांकडे मी सगळं शिकलो. अरे, एका कुटुंबाने स्वतःच्या आनंदासाठी ४९ वर्षे साहित्यउत्सव चालवला. आता पुरे झाले. १९३३ मध्ये श्री. मो. ग. रांगणेकरांनी सत्यकथा सुरू केले. रांगणेकरच संपादक होते. त्यानंतर द. शं. कुलकर्णी—अंतरकर — भागवत असा प्रवास सत्यकथेने केला. सत्यकथेला २५ वर्षे झाली, तेव्हा मो. ग. रांगणेकरांना बोलाविले होते. सत्यकथेचे त्या वेळचे स्वरूप त्यांना रुचले नाही, पचले नाही. सत्यकथेच्या एवढ्या मोठ्या प्रवासावर एकेका वाक्यात बोलणं बरोबर नाही. सत्यकथेने महात्मा गांधी विशेषांक काढला होता. ते आठवलं असतं तर सत्यकथा काळाबरोबर नाही असं एकाच वाक्यात विधान करताना जीभ चाचरली असती. नवकविता, नवकथा यांच्या प्रेरणा सत्यकथेतून मिळाल्या— त्यातून दुराग्रह, अतिरेक सुरू झाला. तो अगदी साचला. तेथे सावरायला हवं होतं. सावरता आलं नाही. त्या प्रेरणा समाजात पसरल्यावर थांबायला हवं होतं; पण थांबता आलं नाही. १९६४ च्या सुमाराला सत्यकथेचे संपादकत्व माझ्याकडं आलं. माझी भूमिका श्री. पुं. ची चौकट सांभाळणे. रामाच्या पादुका भरताने सांभाळल्या तशी माझी भूमिका होती. त्यामुळे मी गुरूचे अनुकरण केले. त्यात माझ्या हातून प्रमाद झाले. सत्तरपर्यंत नव्याने शोध करावा लागला. हा कालखंड जाचक होता. अनेकांनी सांगितलं सत्यकथा युगधर्म विसरली. सत्यकथा वाचकांपर्यंत जात होती; पण आवडत नव्हती. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मूडशी मी समरस नव्हतो. मी न पेलणारी पगडी डोक्यावर घेतली; पण संचालकांनी नको म्हटलं नाही. म्हणून मी काम करीत राहिलो. आणीबाणीच्या संबंधात मी न्यूट्रल होतो. लोक जयप्रकाशांना विसरणार अशी माझी खात्री होती. त्या वेळी न्यूट्रल म्हणजे सरकारच्या बाजूला असणे असं समीकरण होतं. दुर्गा भागवतांनी 'मुक्ता' या पुस्तकात सत्यकथेच्या संपादकांना दूषणे दिली. आणीबाणीत इंदिरा गांधीवरची एक कथा सत्यकथेत छापली होती; पण नंतर ती पाने सरकारी धोरणामुळे काढून टाकावी लागली. दलितांबद्दल सामाजिकदृष्ट्या माझ्या मनात सहानुभूती आहे म्हणून कोणतीही ढिमाळ कथा दलित कथा म्हणून मी छापणार नाही. नामदेव ढसाळांच्या अनेक कविता मी प्रसिद्ध केल्या. पुढे आमचे मतभेद झाले. अजूनही ते सामाजिकदृष्ट्या चांगले लिहितात. पण सत्यकथा ते घेणार नाही. टीका मार्क्सवादी आहे म्हणून मी ती छापणार नाही. राजा ढाले यांनी सत्यकथेचा अंक जाहीरपणे जाळला तेव्हा माझा भरताचा अवतार संपला! तेव्हा गंगाधर गाडगीळांचे अनुकरण केले तरी कुणी गाडगिळांसारखे लिहू शकत नाही. पुंडलिक हेही दुय्यम आहेत. मीही दुय्यम आहे. सध्या भारतातली पहिल्या दर्जाची बुद्धीची माणसे अमेरिकेत आहेत. दुसऱ्या दर्जाची कार्पोरेशनमध्ये आहेत आणि अगदी चौथ्या दर्जाची माणसे पत्रकारितेत आहेत. शवाकिच्या आत्मीयतेने काम करणारे संपादकच नाहीत! इंग्लिश माध्यमाच्या शाळांमुळे मराठीचे वाचक कमी होत आहेत अशी एकंदर परिस्थिती आहे. दलित साहित्य, आणीबाणी याविषयीची माझी भूमिका मी सांगितली, आता आणखी एक सांगतो. सत्यकथेचे सगळे लेखक मिल, स्पेन्सर, आगरकर यांच्या चौकटीतून विचार करतात. विलास सारंग, अनिल डांगेसुद्धा याच मालिकेतले आहेत. माझं या विचारांशी जुळत नाही. भारतीय परंपरा या materialism च्या विरुद्ध आहे. माझा कल तिकडे आहे. मी मराठी मासिकाचा संपादक असून माझं मराठीचं फारसं वाचन नाही.

सत्यकथा बंद झाली. माझ्यातल्या विसंगतीचं विसर्जन झालं.

## यशवंतांची कविता

श्री. राम पटवर्धन यांच्या भाषणानंतर सभा संपली. श्री. पटवर्धन आवर्जून म्हणाले, हा सांगता समारंभ आहे; पण सत्यकथे—विषयी सगळीकडे मृत्यू, आत्महत्या, आत्मसमर्पण हेच शब्द ऐकू येत आहेत. असे का व्हावे? 'प्रभात' सारखी चांगली चित्रपट कंपनी संपली. अगदी आता आता 'रंगायन' ही अशीच चांगली संस्था बंद पडली. त्या वेळी अंतर्गत कलह प्रत्यक्ष—अप्रत्यक्षपणे चव्हाट्यावर आले होते. त्यामुळे या संस्था फुटल्या असे बोलले गेले. त्या संस्थातील माणसे इतरत्र पांगली, काम करू लागली. जगण्याचं प्रयोजन साध्य होत नाही तर जगून काय करायचे? अशा आशयाचे उद्गार सत्यकथाकारांनी जाहीरपणे काढले. या उद्गाराचे नाते आत्महत्येशीच आहे असे वाटते.

मी घरी येताना मैत्रीण भेटली. साहित्याची *आवड असलेली मैत्रीण. ती म्हणाली,* 'का ग, सत्यकथेला तिलांजली द्यायला गेली होतीस ना ?' 'नाही. मी सत्यकथेच्या सांगता-समारंभाला गेले होते.' मी उत्तर दिले. 'इश्श. तुम्ही काही म्हणा; पण संपादक-संचालकांनी निवेदने केली त्याला आम्ही मृत्यू-दिवस म्हणणार ! आता काही दिवसात तुमच्यासारख्या आप्तेष्टांनी जमून केलेल्या कार्यक्रमाला आम्ही तिलांजलीच म्हणणार! केवढा गाजावाजा चालला आहे या सत्यकथा बंद पडण्याचा. मला आपली गंमत वाटते, सत्यकथा जगत होती तेव्हा खूप जणांना माहितीही नव्हती. आपल्या ऑफिसमधल्या बऱ्याचजणांना आताच्या गाजावाजामुळे या नावाचं मासिक मराठीत होतं हे कळलं; पण आता एवढा आरडाओरडा सुरू झाला, ते सगळे हितचिंतक आधी काय करत होते ? निदान सत्यकथेची मृत्युघंटा दीड-दोन वर्षांपूर्वी वाजल्यानंतर ? मला एक कविता आठवते यशवंताचीच बहुतेक. माणूस जिवंत होता तोपर्यंत कोणी त्याला घोटभर पाणी द्यायला तयार नव्हतं; पण 'तिलांजलीसाठी होती कुंभ मात्र उपडे' मैत्रीण टवाळखोरपणे बोलली. मी तिला म्हटले, 'तुझ्यासारखी साहित्यप्रेमी माणसंही केवळ टवाळी करतात आणि मोकळी होतात. मराठी माणसांचे हे औदासीन्यच सत्यकथेसारख्या मासिकाचा अंत ओढवून आणत असावे. सत्यकथेची स्थिती मागे वर्तमानपत्रांतून जाहीर झाल्यावर तू त्यांची वर्गणीदार का झाली नाहीस ?' तिने उत्तर दिले, 'झाले असते; पण सत्यकथेतल्या कविता वैताग आणतात. मला तर वाटतं अर्थहीन कवितांची यांनी मोठ्या प्रमाणावर निर्मिती केली. ते लोण मराठीत सगळीकडे पसरलं. इतकं की, साध्या यमकातील असलेल्या कविता म्हणजे फालतू कविता असंच कॉलेजच्या मुलांना वाटतं की काय अशी मला शंका येते. 'कविता नकोत' अशा सूचना करण्याची बऱ्याच मासिकावर सत्यकथेनं वेळ आणली असावी. म्हणजे सत्यकथेच्या आचरटपणाचा मराठी साहित्यावर जो पगडा आहे त्यामुळं. मुबईतल्या आचरटपणाची केंद्रं तीन. जहांगीर आर्ट गॅलरी, तेथून जरा खाली सरकले की, सत्यकथा-मौज प्रकाशन, खटाववाडी, तेथून आणखी बरेच खाली गेले की, छबिलदास रंगमंच. दादर ! *अग, या सत्यकथेच्या दिवाळी* अंकाच्या मुखपृष्ठावर एकदा रेशनकार्ड छापलं होतं. त्यामुळं मासिक म्हणून कोणी ते विकत घेईना आणि रेशनकार्ड म्हणून दुकानात नेलं तर वाणी साखर, रॉकेल काहीच देईना, अशी त्याची म्हणे स्थिती झाली !

मी मध्ये काहीच न बोलता ती बोलत होती ते ऐकत राहिले.कारण साहित्याच्या वर्तुळाशी कोणत्याच प्रकारे संबद्ध नसलेल्या सुजाण साहित्यप्रेमी माणसाचे मन मला ऐकायचे होते. ती पुढे बोलली, 'काय ग, तू म्हणतेस, सत्यकथेचा सांगता-समारंभ-असा ४९ व्या वर्षी ? बाकीच्या संस्था आपले समारंभ २५ किंवा ५०, ७५ अशा वर्षी साजरे करतात. सत्यकथेला आपले काही तरी वैशिष्टय दाखवावं म्हणून ४९ वं वर्ष भावलं का ? इतरांना 'कळतं' पण सत्यकथेला नेहमी काही तरी 'भावतं' म्हणून आपलं विचारते. कसची ग काही तरी कारणं देतात ! महागाईमुळं आपण सगळेच कावले आहो. एखादा जर सांगायला लागला, महागाईमुळं मी माझं जीवन संपवतो आहे तर लोक त्याच्याकडे दुर्लक्षच करतील; तसच यांचं आहे-आता इतकी मासिकं आहेत. सगळीच काही yellow magazins नाहीत. यांनाच बंद पडायला काय झालं ?

## एक मठ

या बोलण्यातला प्रत्येक मुद्दा बरोबर होता असे नाही. त्याला अनेक फाटे फुटू शकतात; परंतु त्यातून 'सत्यकथे'ची जनमानसातील आजची प्रतिमा कळण्यास मदत होते. सत्यकथेबद्दल जे जे ऐकले त्यावरून असे मत झाले : १९३३ मध्ये सत्यकथा सुरू झाले तेव्हा त्यात सत्यावर आधारित अशा कथा होत्या. म्हणजे त्याची प्रकृती इतर मासिकापेक्षा जन्मतःच वेगळी होती. वैचारिक मतभेद आणि आर्थिक परिस्थिती यामुळे सत्यकथेचे मालक-संपादक बदलत गेले, तसतसे त्याचे रूपही बदलत गेले. सत्यावर आधारित कथा लवकरच बंद झाल्या ते इतरांसारखे साधेसुधे मासिक झाले. नंतर हळूहळू विशेषतः भागवतांच्या काळी ते विद्यापीठ झाले असे म्हणायला हरकत नाही. गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर *या आणि अशा मातब्बर* लेखकांना सत्यकथेने घडवले. या विद्यापीठाचा नंतर मठ किंवा संप्रदाय झाला असे वाटू लागते. कारण मठाची अनेक लक्षणे दिसू लागली. मठाला अनुयायी असतात. मठ इतर समाजापासून फटकून वागतो. सत्यकथेला अनुयायीवर्ग मिळाला. सत्यकथेचे बरेचसे लेखक, कवी इतर कोठे लिहितात. सानियाच्या कथा, र. कृ. जोशीच्या कविता यानी घालून दिलेल्या दुर्बोध शैलीचे abstract वातावरणाचे अनुकरण सत्यकथेचे इतरही लेखक करू लागले. चि. त्र्यं. खानोलकराच्या साहित्याची पोथी झाली. खानोलकरांच्या गावाचा नकाशा मुखपृष्ठावर छापून आणि खानोलकर लिहीत त्या जागेची आत छायाचित्रे छापून सत्यकथेने त्यांना राष्ट्रपुरुषाच्या पातळीवर नेऊन बसविले ! त्याच वेळी ग. दि. माडगूळकरांसारख्या लोकप्रिय कवीची सत्यकथेने दखलही घेतली नाही. यातून अभिनिवेश निर्माण झाला. सत्यकथा सामान्य जनांपासून दूर गेली. तिला मठाचा तोरा आला. दीपा गोवारीकर, उर्मिला शिरूर यांच्या जिवंत कथांचा प्रवाह झाला होता. मठापासून जनता दूर असली तरी मठाबद्दल तिच्या मनात एक आदर, दरारा असतो. साहित्याच्या वर्तुळात सत्यकथेबद्दल असाच आदर आणि दरारा दिसतो; पण विद्यापीठाप्रमाणे मठ नवी पिढी घडवू शकत नाही. कारण मठाचे क्षेत्र स्वभावतःच मर्यादित असते. त्यात सर्वसमावेशकता नसते. त्यामुळे मठाचा लय केव्हा तरी होणारच हे उघड असते.

तसेच बहुधा सत्यकथेचे झाले. श्री. राम पटवर्धन आपल्या बोलण्यात म्हणाले, 'नवकथा; नवकवितेच्या प्रेरणा साहित्यात रुजल्यावर थांबायला हवे होते; पण थांबता आले नाही. म्हणजे त्याच त्याच ठिकाणी सत्यकथा घुटमळली. आणखी नवे काही शोधता आले नाही. प्रवाह साकळला. जमलेल्या अनुयायांनी आपल्या दुय्यम दर्जाच्या प्रतिभेने तिचा मठ केला. यातून काही साधत नाही हे मठचालकाना वाटले असावे. म्हणून 'सत्यकथा' बंद करणे त्यांनी पसत केले असावे.

□

## आम्ही असा निष्कर्ष काढला की, सोव्हिएत युनियन यात ढवळाढवळ करणार नाही....

ओरियाना-शेरॉन मुलाखत : पृष्ठ ८ वरून

रिकेला अतिशय चिंतेचा वाटत आहे; पण त्याना हे समजून घेण्याची इच्छा नाही की, ते लांबलं याचं कारण मी बेरूतमध्ये प्रवेश टाळला. हे पाहा, लेबानन हा गुंतागुंतीचा प्रश्न आहे. त्या देशात फक्त लेबानीज आणि पॅलेस्टिनी दहशतवादी राहात नाहीत. सीरियन्स आहेत, सोव्हिएट्स आहेत आणि...आणि तुम्ही वृत्त–माध्यमाची माणसं. घटनाचं मोजमाप होण्यात तुम्हा लोकाची निर्णायक शक्ती महत्त्वाची ठरते. अमेरिकेच्या अध्यक्षाना लोकमत विचारात घ्यावंच लागतं आणि नोव्हेंबरमधल्या निवडणुकाना त्यांना तोंड द्यायचं आहे हे तुम्हाला ठाऊक आहे...तथापि अमेरिकेच्या रागाचा फार मोठा बाऊ मला वाटत नाही. आमची आणि त्याची मैत्री परस्पर हितसंबंधावर आधारलेली आहे आणि अमेरिका ते जाणून आहे. इस्राएलच्या संरक्षणात अमेरिकेचा जेवढा हातभार आहे, तेवढाच अमेरिकेच्या या भागातील हितसंबंधांच्या संरक्षणात इस्राएलचाही आहे. म्हणून एखाद्या भांडणाचं काहीएक गांभीर्य नाही.

ओरियाना : दुसऱ्या शब्दांत, तुम्हाला त्याची गरज आहे तेवढीच त्यांनाही तुमची आहे; पण लेबाननवर आक्रमणाचा तुमचा निर्णय तुम्ही नेमका केव्हा त्याच्या कानावर घातलात ?

शेरॉन : आक्रमण हा शब्द मला आवडत नाही. कारवाई हा शब्द अधिक योग्य आहे. ते असो. मी अमेरिकेच्या कानावर या कारवाईसंबंधी काहीच घातलेलं नाही. योजना, वेळापत्रक, कार्यक्रम इ. बद्दल मी काहीच बोललेलो नाही; पण जवळजवळ वर्षभर म्हणजे गेल्या सप्टेंबरपासून त्यांच्याशी चर्चा चालू होती की, कारवाई करण्याची शक्यता निर्माण होईल. अलेक्झांडर हेग मध्यपूर्वेत आले असताना मी त्यांच्याशी बऱ्याच वेळा बोललो. गेल्या नोव्हेंबरमध्ये वॉशिंग्टनला गेलो असताना मी वेनबर्गर यांच्याशी बोललो होतो. राजदूत हबीब याच्याशी तर असंख्य वेळा त्यावर चर्चा केली आहे. हे. बघा, प्रामाणिकपणे सांगायचं तर या सर्वांना मी जे भेटलो ते खास करून दहशतवाद आणि पॅलेस्टिनी मुक्तिसंघटनेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी. त्याच्यापासून मी काहीही लपवलेलं नाही किंवा रहस्य निर्माण केलं नाही.

ओरियाना : मग त्यानी काय उत्तरं दिली ? तुमच्या ' मोहिमे '-बद्दल त्यांचं परीक्षण काय होतं ? ते तुम्हाला कधी म्हणाले नाही का की, ' अशा मोहिमेतून तिसरं महायुद्ध पेटू शकेल ?' आणि तुम्ही तरी स्वतःला असा प्रश्न केला नाही का ?

शेरॉन : आम्ही अर्थातच सोव्हिएट हस्तक्षेपाच्या शक्यतेवर विचार केला. अमेरिकेसह आम्ही त्यांचा अभ्यास केला. आमचंही गुप्तहेरखातं आहेच की आणि ते चांगलंही आहे. आम्ही असा निष्कर्ष काढला की, सोव्हिएत युनियन यात ढवळाढवळ करणार नाही.

ओरियाना : तरीही अलेक्झांडर हेग यांनी या सर्व प्रकाराला ' अमानुष ' असं म्हटलं आहे. त्यांच्या एका प्रवक्त्यानं ते सांगितलं.

शेरॉन : अमानुष ? हा शब्द कोणी उच्चारल्याचं मला स्मरत नाही. ते याच्या विरुद्ध होते का ? नक्कीच होते. अगदी पूर्णपणे हे मान्य केलंच पाहिजे. त्यांना जरी सगळी परिस्थिती ठाऊक होती, ती बिघडत चालल्याचं समजत होतं, तरीही ते आमच्याशी सहमत होत नव्हते. ते पुनःपुन्हा हेच वाक्य उच्चारत होते, ' तुम्हाला हे युद्ध करण्याची गरज काय ?' नंतर ते म्हणाले की, जर काही तरी करणं भागच असेल तर ते दहशतवाद्याच्या कारवायांच्या प्रमाणातच झालं पाहिजे, अधिक नाही.

ओरियाना : जनरल शेरॉन, मीही तुम्हाला तोच प्रश्न करते. तुम्हाला हे युद्ध कशासाठी हवं होतं ? तुम्हाला अशी कोणती धास्ती वाटत होती, अशी काय नवीन धोक्याची परिस्थिती निर्माण झाली होती की, त्यामुळं तुमच्या अस्तित्वावर गदा यावी ? मला समजलेलं नाही. कोणालाच कळलेलं नाही.

शेरॉन : तुम्ही त्याच्यासारखंच बोलताय्. अलेक्झांडर हेग असच म्हणाले होते की, ' संयम राखा. चिथावणीला उत्तर देऊ नका !' एक दिवस माझी शांतता ढासळली आणि मी आधी हबीबना जे विचारलं होतं तेच हेग याना विचारलं आणि आता तेच तुम्हाला विचारतो. ' ज्यू लोकानी नेमका कुठपर्यंत संयम राखायचा ? त्याचं नेमकं गणित काय ? शेतात किंवा रस्त्यावर एखाद्या ज्यूचा खून झाला तर आम्ही भडकायचं का नाही ? का दोन जणाचा खून व्हायला पाहिजे ? तुम्हाला दोन पुरेसे नाही वाटत ? नाही ? मग किती ? तीन, दहा, पंधरा ? आणि एका ज्यूचा फक्त पाय गेला किंवा दोन्ही डोळे गेले तर पुरेसं आहे ? संयम कुठपर्यंत राखायला हवा ते तरी सांगा !

ओरियाना : जनरल शेरॉन, मी बेरूत सोडल्यानंतर इथे इस्राएलमध्ये कित्येक जणांशी चर्चा केली आहे. तसंच युद्धावरून परतलेल्या तरुण सैनिकांशीदेखील बोललेली आहे. त्यातल्या काही जणांनी मला सांगितलं की, हे युद्ध अन्याय्य आहे. ते म्हणाले, अन्याय्य नसलं तरीही असमर्थनीय नक्कीच आहे. तुम्ही इतके युद्धपिपासू बनला आहात की, युद्धाशिवाय दुसरा कुठलाही विषय तुम्ही बोलत नाही. सदोदित युद्धाला तयार आणि विस्ताराला सज्ज ! त्या लोकांचं आपल्या देशाविषयी जे एक स्वप्न होतं ते विरून गेलं आहे. ज्या राष्ट्रासाठी त्यानी एवढा आक्रोश केला. जनरल, तुम्ही बदलला आहात. त्यातला एक तरुण मला म्हणाला : ' आमचं आता मध्यपूर्वेतल्या प्रशियामध्ये रूपांतर होत आहे. '

शेरॉन : हे बिलकुल खरं नाही. युद्धाखेरीज अन्य कित्येक गोष्टी आम्हाला करायच्या आहेत आम्हाला आमचं शिक्षण, आमची संस्कृती, आमची शेती, आमचे उद्योगधंदे, आमचं शास्त्र विकसित करायचं आहे. ७० हून अधिक देशांहून इथे येणाऱ्या ज्यूंना आमच्यात सामावून घ्यायचं आहे. त्याच्यासह राष्ट्र उभारायचं आहे. शिवाय आम्ही शस्त्रास्त्रांच्या कुठल्याच स्पर्धेत भाग घेत नाही. आम्ही फक्त आमची संरक्षणक्षमता सुधारण्याचा प्रयत्न करत आहोत. कुठल्याही प्रसंगाला सज्ज राहणं आम्हाला भाग आहे.

ओरियाना : त्या तरुणाला या उद्दिष्टाबद्दल शंका आहे. त्याचा



शेरॉन

इस्त्राएलमध्ये सगळे बहिरे ससाणेच आहेत.

आदर्श आहे कर्नल गेव्हा. बेरूतच्या आक्रमणात ज्यानं आपल्या लोकांना (लढाईची) आज्ञा करणं नाकारलं.

शेरॉन : बिचारा एली ! मी त्याला चांगलं ओळखतो तो अगदी लहान असल्यापासून. मला त्याच्याबद्दल वाईट वाटतं. त्याला बेरूतमध्ये प्रवेश करायचा नव्हता. आपल्या तुकडीवरील त्याचं नियंत्रण नष्ट झालं. त्याची लष्करातील दैदीप्यमान सुसंधी नष्ट झाली आणि आम्ही बेरूतमध्ये प्रवेश केलाच नाही. त्याचा आदर्श ? मला नाही तसं वाटत. त्याच्यामुळं युद्धकाल लांबला आणि आमचे अधिक लोक दगावले. होय, केवळ त्याच्यामुळंच ! त्याच्या बडबडीमुळं, त्याच्यामुळं विरोधकांनी केलेल्या निदर्शनांचा परिणाम होऊन...काही काळ दहशतवाद्यांना ताकद प्राप्त झाली आणि त्याला हे सांगणं व्यर्थ होतं की, 'एली, एली, हा मनोधैर्याचा प्रश्न आहे तुझे सैनिक युद्धभूमीवर आहेत. हजारोजणांचा तुझ्यावर भरवसा आहे. तू काय करतोयस याची तुला जाणीव आहे का ? एली, अरे तू शत्रूला मदत करत आहेस !' पंतप्रधान आणि सैन्यप्रमुखानं त्याला हेच सांगितलं.

आम्ही त्याचाही स्वीकार केला. कारण आमची खरोखर लोकशाही आहे. मला सांगा, युद्धात एखाद्या अधिकाऱ्यानं असं आज्ञा पाळायचं नाकारलं तर अन्य देशात काय घडलं असतं ? इंग्लंडचं उदाहरण घ्या. तो देश स्वतःला लोकशाहीची जननी म्हणवतो फॉकलंड-युद्धाच्या वेळी इंग्लंडनं केलेले कडक नियम आणि सेन्सॉरशिप आठवा. त्यांच्या लष्करानं इंग्लंडमध्ये कर्नल गेव्हावर कोणती कारवाई केली असती ? पण त्याचं मन पालटलं नाही. बेरूतमध्ये शिरायचं नाही हा आपला हट्ट त्यानं चालूच ठेवला. त्यामुळं दोन्ही देशांचे खूपच लोक मरतील असं त्याचं म्हणणं होतं. सांगण्यासारखी विशेष गोष्ट म्हणजे युद्धाच्या सुरुवातीला त्याचीच तक्रार होती की, आपण पुरेशी बॉबफेक करीत नाही. त्याला अधिक बॉंब, अधिक धुमश्चक्री हवी होती.

ओरियाना : माय गॉड ! म्हणजे सादात म्हणाले होते की, इस्राएलमध्ये कबुतरं आणि ससाणे नसून फक्त ससाणे आणि बहिरीससाणे आहेत—हेच तुमचंही म्हणणं आहे का ?

शेरॉन : जेव्हा आमच्या संरक्षणाचा, आमच्या अस्तित्वाचा प्रश्न उद्भवतो तेव्हा कबुतरं नसतात किंवा ससाणेही नसतात—फक्त ज्यू असतात !

ओरियाना : जनरल, काही वेळा असा संशय येतो की, बचाव किंवा सुरक्षा यापलीकडे तुम्हाला जबरदस्त महत्त्वाकांक्षेनं पछाडलेलं आहे. तेल-अविवमध्ये गेल्या डिसेंबरात झालेल्या एका परिषदेसाठी तुम्ही जे भाषण लिहिलं होतं त्यावरून मी असं म्हणतेय. त्यात सोविएत युनियनच्या सीमाविस्तार-प्रश्नापासून सुरुवात करून तुम्ही पुढं म्हटलं होतं की, 'इस्राएलचे लष्करी हितसंबंध आणि डावपेच फक्त मध्यपूर्वेतल्या अरब राष्ट्रांपुरते मर्यादित नाहीत. तसंच मेडिटरेनियन, रेड सी इत्यादी चालू काळाच्या गरजेनुसार सुरक्षेसाठी तुर्कस्तान, इराण, पाकिस्तान, पर्शियन गल्फसारखे विभाग आणि उत्तर तसंच मध्य आफ्रिकेचाही त्यात समावेश होईल.' माय गॉड ! अंगावर काटाच येतो.

शेरॉन : अच्छा, तुम्ही पूर्वतयारी चांगलीच केलेली दिसते. मी त्याचं उत्तर देतो. इस्राएल देशाचं स्थान असं विशिष्ट आहे की, त्याला कायम छळ सहन करावा लागला आहे. तीन स्तरांवर आम्हाला विविध प्रश्नांना तोंड द्यायचं आहे. पहिला आहे पॅलिस्टिनी दहशतवाद. दुसरं संकट म्हणजे अरब राष्ट्रांना तोंड देणं. आज मितीला १३,००० रणगाड्यांसह ते देश धमकावत आहेत ! रशियाचा विस्तारवाद हा झाला तिसरा चिंतेचा विषय. आफ्रिका आणि मध्यपूर्वेत गेली कित्येक वर्षं ते हातपाय पसरत आहेत. मुद्दा असा की, या तीन संकटांच्या छायेत राहून आम्ही आमच्या अस्तित्वाचा हक्क कसा टिकवायचा ? तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे मध्यपूर्वेतील प्रशियान बनता !

ओरियाना : पण आफ्रिका, तुर्कस्तान, इराण किंवा पाकिस्तानकडून तुम्हाला काय धोका आहे ? आणि तुमचा प्रत्यक्षात काय करायचा विचार आहे ? लेबाननवरील आक्रमण ही एखाद्या मोठ्या कारवाईची नुसती सुरुवातच आहे, असं काही ऐकण्याची माझी इच्छा नाही.

शेरॉन : त्याचं उत्तर आहे, तसला काही हेतू नाही; निश्चितच नाही लष्करी डावपेचांच्या दृष्टीनं ज्या विभागांना महत्त्व आहे असे प्रदेश व्याप्त करायचा आमचा हेतू आहे, असं तुम्ही सुचवताय ती सर्वस्वी वेगळी बाब आहे. एका प्रश्नानं मी त्याचं स्पष्टीकरण देतो. समजा सोविएत सैनिक पर्शियन गल्फच्या किनाऱ्यावर पोचले तर इस्राएलच्या स्थानाला धक्का पोचेल की नाही ? समजा तिथल्या तेलविहिरींचा ताबा त्या सैन्यानं घेतला तर आमच्या लष्करी डावपेचावर त्याचा विपरीत परिणाम होईल की नाही ? तुर्कस्तानवर त्यांचा अंमल चालला तर आम्हाला धोका निर्माण होईल की नाही ?

म्हणून त्या देशांचा विचार आम्ही आधीच करायला हवा की नाही ? तसा आम्हाला आहे की नाही ? आणि त्याचा अर्थ आम्हाला ते सगळे देश जिंकायचे आहेत असा होतो का ?

ओरियाना : जनरल शेरॉन, तुमचा खरा शत्रू कोण आहे ? —अराफत की सोवियत युनियन ?

शेरॉन : मिस् फलासी, हे पक्कं ध्यानात ठेवा की १९४८ मध्ये आमच्याविरुद्ध झालेल्या युद्धात सोविएत युनियनचा त्यांना राजकीय आणि लष्करी पाठिंबा नसता तर अरब राष्ट्रं उभीच राहू शकली नसती. त्यांनी आमच्यावर हल्ले केले. कारण सोविएतनं पूर्ण मदत करून त्यांना अगदी ढकललं म्हणूनच आता सोविएत युनियन आणि पीएलओ यांचं काय नातं आहे ? अगदीच सोपं ! सोविएतचं त्यांना राजकीय, लष्करी आणि आर्थिक पाठबळ आहे. कारण उघड



अराफत

**दहशतवादाचा नवा उपयोग**

आहे. सोवित युनियनला कळून चुकलं आहे की, सध्याच्या आण्विक युगात महायुद्धाचा धोका टाळायचा तर दहशतवाद हेच एक उत्तर आहे. विस्तारासाठी त्यांना अराफतची, पीएलओची गरज आहे. आता तुम्ही म्हणाल की, अराफत कम्युनिस्ट नाही; पण सोविएतला त्याच्याशी काय घेणं आहे? त्यांना फक्त अराफतचा उपयोग हातातलं बाहुलं बनवून करून घ्यायचा आहे. तोच त्यांचा डाव आहे!

सीरिया कम्युनिस्ट देश आहे का? प्रत्येकजण अमेरिकेविरुद्ध यांच्या शस्त्रास्त्रांविरुद्ध ओरडतो; पण मी तुम्हाला सांगून ठेवतो की, सोविएतनं या विभागात राक्षसी प्रमाणात जी शस्त्रं वाटलेली आहेत, त्यांच्यापुढं आम्ही किंवा अन्य देशांनी खरेदी केलेली शस्त्रं म्हणजे काहीच नाहीत.

**ओरियाना :** त्यावर माझा विश्वास आहे; परंतु आपण पुन्हा लेबाननकडे वळू या.

**शेरान :** आम्हाला लेबाननचा एक चौरस सेंटिमीटर सुद्धा नको आहे.

**ओरियाना :** दक्षिण लेबाननच्या लिटानी विभागातला सुद्धा नको? मी असं म्हणते. कारण बऱ्याच दिवसांपूर्वी, १९५५ मध्ये तुम्ही केलेलं एक भाषण. बेन गुरियन यांची एक योजना होती. पुढे मोशेदायान यांनी ती कार्यान्वित केली. त्या योजनेनुसार इस्राएलनं लेबाननवर चढाई करायची; नंतर लेबानीज नेत्याला विकत घेऊन त्याला अध्यक्ष बनवायचं. त्यानंतर त्याच्या जोडीला ख्रिश्चन सत्ता स्थापायची आणि मैत्री–करार लादायचा. अखेरीस त्यांनी मागं व्हायचं आणि लाटानी विभागातून देशाची सूत्रं हलवायची.

**शेरॉन :** पाहा, झिओवादाच्या दोन शाखा आहेत. वीझमनची राजकीय आणि बेन गुरियाची व्यावहारिक. मोशे दायान, गोल्डा मायर दुसऱ्या शाखेच्या. ही झाली जुनी पिढी. मी राजकीय मतप्रणालीला प्राधान्य देतो. करार, न्यायसंमत निर्णय, लेखी आश्वासने यांच्यावर आमचा विश्वास आहे. बेगिन सरकारचंही तेच मत आहे. तुम्ही खात्री बाळगा की, लेबाननचा चौरस सेंटिमीटर देखील आम्हाला नको!

**ओरियाना :** पण तुम्हाला ताबा घेण्याची गरजच नाही! एक ३४ वर्षांचा मित्र तिथे अध्यक्ष म्हणून निवडून दिला की झालं. फलांजिस्ट पक्षनेते बशीर गेमायल यांच्याबद्दल मी बोलतेय्. त्यांच्याशी दोस्ती निर्माण केली म्हणजे काही काळ इस्राएलच्या फौजा शांतता व सुव्यवस्थेच्या नावाखाली तिथे ठेवायच्या. अशी वसाहत स्थापन झाली म्हणजे पुरेसं आहे. सोव्हिएतनं नाही का अफगाणिस्तानात तसंच केलं.

**शेरॉन :** मिस् फालासी, तुम्ही एक अतिशय चांगल्या बाई आहात. तुमच्याशी नम्रपणे वागायची माझी इच्छा आहे. तुमच्यावर ओरडायची मात्र बिलकुल इच्छा नाही किंवा माझा संयम सोडायचा नाही; पण असली बदनामी मी अद्याप ऐकलेली नाही. केवढं धादांत खोटं! एवढा अपमान! तुम्ही माझी बदनामी करताय्, माझा अपमान करताय्!

**ओरियाना :** का बरं? बशीर गेमायल हा तुमच्या हातातला हुकमी पत्ता आहे, हे तर सर्वांनाच ठाऊक आहे. निदान हिवाळा संपेपर्यंत तुम्ही लेबाननमध्ये मुक्काम ठोकणार, हे सुद्धा सर्वांना माहीत आहे. तुमच्या सैन्याला तुम्ही खास थंडीचे बूटसुद्धा देऊन ठेवले आहेत. जनरल शेरॉन, तुम्ही सिनाईत जसा १५ वर्षे तळ ठोकलात, तितकी वर्षं लेबाननमध्ये नक्कीच राहणार नाही; काय?

**शेरॉन :** नाही, या खेपेला आम्ही खूपच कमी तिथे राहू असं मला खात्रीनं वाटतं.

**ओरियाना :** तुमच्या नव्या मित्राचं रक्षण करायची जबाबदारी असून सुद्धा?

**शेरॉन :** मी मिनीस्कर्टप्रमाणे (थोडक्यात) उत्तर देतो. म्हणजे विषयाची काळजी घेण्याइतकं पुरेसं लांब आणि त्याबद्दलची उत्सुकता टिकून राहावी इतपत अपरं.

निम्मा लेबनन सीरिया–व्याप्त आहे. त्रिपोलीत अद्याप दहशतवादी आहेतच आणि बेक्का प्रदेश सीरियाकडेच. नवं सरकार नुकतंच जन्माला आलेलं आहे–तेही शासनक्रिया झाल्यावरच. अशा बालकाला लेबाननची सध्याची परिस्थिती हाताळणं शक्य आहे का? निश्चितच नाही. शिवाय असं पाहा की, सीरियन्स बेरूतच्या इतके जवळ असताना आम्ही जर बेरूत ते दमास्कस रस्त्यावरील आमचा ताबा सोडला तर हे नवजात सरकार वाचत नाही!

**ओरियाना :** मग त्या रस्त्यावरून तुम्ही सहज आपले दमास्कसलाच पोचलात तर?

**शेरॉन :** दमास्कसला जाण्याची गरजच नाही. तिथवर पोचण्याची आमची इच्छा नाही. खरोखर कधीच नव्हती. बेक्कामधे युद्ध घडू नये असं मला नेहमीच वाटतं; पण जर सीरियानं हालचाल केली नाही तरच आम्ही स्वस्थ राहू. नाही तर सीरिया अडचणीत येईल. कारण आमचं सैन्य आणि तोफखाना दमास्कसकडून अवघ्या २५ किलोमीटर्सवर आहे. याचा अर्थ आम्ही दमास्कस कुठल्याही क्षणी जमीनदोस्त करू शकतो; पण ती कल्पना आम्हाला मंजूर नाही. आम्हाला शांततामय तडजोड हवी आहे. प्रश्न सोडवताना दर खेपेला युद्धाची काय गरज?

**ओरियाना :** त्यात काय विशेष? तुम्हाला तर युद्धाची फार आवड आहे.



# घडा भरेल पापाचा नायनाट होईल काळ्या बाजाराचा

- ज्याप्रमाणें एकादा हिरवा गर्द वृक्ष कीड लागल्यास सुकून जातो, त्याचप्रमाणे काळा पैसा देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करुन टाकतो.
- या जहरी किडयाची वाढ होऊ देऊ नका. हे विनाशाचे मूळ आहे. हाच किडा महागाईच्या आगींत तेल ओतत असतो.
- याचा नायनाट करण्यासाठीं, आवश्यक वस्तु अधिनियम, काळा बाजार प्रतिबंधक आणि आवश्यक वस्तु पुरवठा कायदा, वगैरे कायद्यांची अधिक कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**त्याचमुळें समाज आणि अर्थव्यवस्थेला उसंत मिळणार आहे.**

**नवा 20 कलमी कार्यक्रम** सविस्तर माहितीसाठीं खालील कूपन भरुन पाठवा

श्री. आर. के. जॉली
असिस्टंट प्रॉडक्शन मॅनेजर
रिजनल डिस्ट्रिबुशन सेंटर
२३, सिदपुर इन्डस्ट्रियल इस्टेटस्
हलाव पुल, मसरानी लेन
कुर्ला, मुंबई-४०००७०

नाव ______
पत्ता ______
______ पिन ______

नव्या २० कलमी कार्यक्रमाच्या माहितीसाठीं
कृपा करुन मराठी/हिंदी/इंग्रजी पुस्तिका पाठवा.

davp 82/296

**शेरॉन** : माझ्याबाबतं लोकांची इथेच फार मोठी चूक होते. मी एक युद्धपिपासू असून सतत गोळीबार मला आवडतो, असं माझं चित्र आहे, ते खोटं आहे. युद्धाचा मला तिटकारा आहे. जो माझ्या-इतका युद्धभूमीवर गेला असेल, मी युद्धातली भयानकता जेवढी अनुभवली ती ज्यानं पाहिली असेल, माझ्याइतके ज्याचे मित्र युद्धात गमावले असतील तोच माझ्याइतका युद्धाचा तिरस्कार करू शकेल! माझ्या जीवनातली सर्वांत सुखाची वर्षं कोणती विचाराल तर मी तीन वर्षं जेव्हा माझ्या शेतावर ट्रॅक्टर फिरवत होतो आणि माझ्या सुंदर मेंढ्यांची काळजी घेत होतो तो काळ !

**ओरियाना** : हे उत्तर ऐकून, तुमची जी प्रतिमा उभी झालेली आहे, त्यावर कोणाचा विश्वास बसेल ?

**शेरॉन** : कोणती प्रतिमा ?

**ओरियाना** : तुम्हाला ठाऊक असलं पाहिजे. देवदूत म्हणून तुमचा नक्कीच नावलौकिक नाही. जनरल, तुमच्याबद्दल मी जी जी वक्तव्यं ऐकली त्याचा इथे पाढा वाचला तर तुमचा तो विलक्षण संयम सुटायची शक्यता आहे, तुमची नम्रता कोसळून पडेल !

**शेरॉन** : सांगा, सांगा.

**ओरियाना** : ठीक आहे...तुम्हाला ते खुनी, पशू, निर्दय बुलडोझर, सत्तेची तृष्णा बाळगणारा हत्ती म्हणतात !

**शेरॉन** : इतर जण मला वेगळ्या नावानं संबोधतात.

**ओरियाना** : ठाऊक आहे. तुमच्याशी एकनिष्ठ असलेले सैनिक तुम्हाला 'इस्राएलचा शहेनशाह', 'राजे एरिक' असं म्हणतात! तुम्हीच खरे नेते आहात, निधड्या छातीचे सैनिक आणि सच्चे आहात, असं ते मानतात; पण तुमची लोकमानसातील खरी प्रतिमा मी मघाशी सांगितलं तशी आहे. का बरं ? ती कुठून निर्माण झाली? त्याला काही तरी कारण असलं पाहिजे !

**शेरॉन** : माझा द्वेष करणारे लोक आहेतच. माझी भीती बाळगणारेही आहेत—विशेषतः राजकारणी. मला जे पटत ते मी करतो. जे हवं ते मी करतोच. मी फारसा मृदु नाही. मी पाच वेळा राजकीय पक्ष बदललेला आहे; पण माझा द्वेष करणाऱ्या लोकांचं प्राबल्य असतं तर या देशात इतकी वर्षं माझा प्रभाव कसा टिकला असता? मी स्वत. राजकीय पक्ष बनवू शकलो आहे. दोन वेळा आम्ही निवडणुका जिंकलेल्या आहेत. त्यामुळं देशाला ऐतिहासिक-वळण प्राप्त झालेलं आहे. माझ्यात एवढी शक्ती आली कुठून ? इस्राएलमध्ये लोकशाही व्यवस्था आहे, हे तुम्हाला ठाऊकच आहे.

**ओरियाना** : आयर मॉर नावाचा एक काँग्रेसमन म्हणाला आहे की, 'शेरॉन जर पतप्रधान झाला तर इस्राएलच्या लोकशाहीचं भवितव्य काय राहील, याची मला चिंता वाटते.' तो पुढे म्हणाला, 'तो सर्वत्र कॉन्सेंट्रेटेड कॅम्प्स काढील!'

**शेरॉन** : हे पाहा, तुम्ही गंभीरपणे मुलाखत घेत आहात. त्याच्यावर पाणी फिरवू नका. माझ्याबद्दल तुम्हाला आणखी काय हवय् तेवढं सांगा !

**ओरियाना** : सगळे म्हणतात त्याप्रमाणे तुम्हाला पंतप्रधान होण्याची इच्छा आहे का ?

**शेरॉन** : पहिली गोष्ट, श्री. बेगिन अजून खूप वर्षं त्या पदावर राहतील असा मला विश्वास आहे. दुसरी गोष्ट, मी पंतप्रधान व्हायला उत्सुक नाही. संरक्षणखात्यात राहूनही कित्येक गोष्टी करण्यासारख्या आहेत. उदा. पॅलेस्टाइन प्रश्न राजकीय आणि शांततामय मार्गानं सोडवणं. आम्ही पॅलेस्टिनीविरुद्ध लढत नव्हतो, तर पीएलओच्या दहशतवाद्यांविरुद्ध. तो प्रश्न सुटला, म्हणजे कामगिरीपैकी अगदीच थोडा भाग पूर्ण झाला आहे.

**ओरियाना** : सुटला ? तुम्ही तो सोडवलाय् असं तुम्हाला खरोखर वाटतं का ? त्याउलट तो वाढलाय्, तीव्र झालाय् असं नाही तुम्हाला वाटत ? जे दहा हजार लोक आठ निरनिराळ्या देशांत परागंदा झाले आहेत, त्यांची पुढची पिढी वाढत्या प्रमाणात तुमचा द्वेष करील आणि यापुढं दहशतवादाचा कुठेही उद्रेक होईल ज्यांचा पराभव केला अशी तुमची समजूत आहे, ते लोक भडकलेले आहेत. त्यांनी निवृत्ती स्वीकारलेली नाही. 'आमचा लढा पूर्वीप्रमाणेच जारी राहील' असं अराफत नुकतंच म्हणाला आहे.

**शेरॉन** : तसल्या काल्पनिक शक्यतांवर मला काही बोलायचं नाही. लेबाननमध्ये त्यांना जे जमलं ते इतर राष्ट्रांत शक्य होणार नाही. सीरिया आणि जॉर्डनमध्ये यापूर्वी त्यांना विरोध झालेला आहे. त्या सर्व देशांना आपलो राजवट बेरूतप्रमाणे उलटून पडलेली कशी सहन होईल ? शिवाय दहशतवाद्यांनी तसा प्रयत्न केला, तर इस्राएल तटस्थ राहणार नाही. अराफत खरोखर तसं म्हणाला का? त्याच्या जागी मी असतो तर तसा प्रयत्नही केला नसता. मी त्यांना या वेळी जीवदान दिलेलं आहे. भविष्यात त्यांचं नशीब असंच अनुकूल राहील, असं नाही. त्यांनी पुन्हा हालचाल सुरू करावी आणि बघावं ! अगदी इस्राएलपासून दूरच्या देशात जरी चळवळ केली तरी खबरदार! त्याचा निःपातच होईल !

**ओरियाना** : मग पीएलओशी संबंधित नसलेल्या चाळीस लाख पॅलेस्टाइन लोकांचं काय ? सीरिया, लेबानन, गाझा, वेस्ट बँक इथल्या छावण्यात ते विखुरलेले आहेत. जनरल, मला सांगा, पृथ्वीवरील या नव्या ज्यूंनी काय करावं, कुठे जावं अशी तुमची अपेक्षा आहे ? तुम्ही जे सोसलत तेच पुढं चालू राहील का ?

**शेरॉन** : पण त्यांना मातृभूमी आहे. ती म्हणजे पॅलेस्टाइन-ज्याला जॉर्डन म्हणतात.

**ओरियाना** : म्हणजे राजे हुसेन यांचं जॉर्डन ?

**शेरॉन** : अर्थात ! हे बघा, गेली १२ वर्षं या पॅलेस्टिनी प्रश्नानं मला गोंधळात टाकलं आहे. जितका अधिक विचार करावा तितका मी या निर्णयाप्रत येतो की, जॉर्डन म्हणजे ट्रान्स-जॉर्डन हेच त्या प्रश्नाचं उत्तर आहे. सादात यांना हे ठाऊक होतं. मी त्यांना नेहमी म्हणायचो. ट्रान्सजॉर्डनची ७०% लोकसंख्या पॅलेस्टिनीची आहे. संसदेत त्या लोकांच प्राबल्य आहे. जवळजवळ सगळे मंत्री आणि पंतप्रधान पॅलेस्टिनी आहेत. फक्त ३० टक्के बेदुइन आहेत. हुसेन बेदुइन. विश्वास ठेवा, हेच खरं उत्तर आहे. माझं एकट्याचंच ते मत नाही.

**ओरियाना** : म्हणजे तुमच्या 'तोडग्या' प्रमाणे त्यांनी आपला गाशा गुंडाळावा आणि जॉर्डनकडे चालू लागावं ?

**शेरॉन** : का ? ते तिथे राहातच आहेत की !

**ओरियाना** : मी निर्वासितांबद्दल म्हणतेय्. छावण्यात विखुरलेले गरीब बिचारे जीव !

शेरॉन : काहीजण आहेत तिथेच राहू शकतील. काहीजण ट्रान्स-जॉर्डनला जातील.

ओरियाना : असं ? मग राजे हुसेन यांचं आपण काय करायचं ? त्याना ठार करायचं ? का' त्यांना कॅसिनो चालवण्यासाठी मॉन्टे कार्लो इथे धाडायचं ?

शेरॉन : मला हुसेनची काही फिकीर नाही. वैयक्तिक प्रश्नाना काहीच महत्त्व नाही. त्याला हवं ते त्यानं करावं. वाटलं तर तिथच राहावं. काय हरकत आहे ? पॅलेस्टाइन लोक राजा म्हणून त्याना का मान्यता देणार नाहीत ? म्हणजे त्यांना राजा शोधायचे कष्ट पडणार नाहीत.

मी तुम्हाला सांगून ठेवतो की, जॉर्डनखेरीज अन्य कोणतेही पॅलेस्टाइन राष्ट्र आम्ही निर्माण होऊ देणार नाही, कदापि नाही! कारण तुम्हा सर्वांची तीच इच्छा आहे की दुसरं पॅलेस्टिनी राज्य तयार व्हावं. ज्युडिया आणि समेरिया याच्यात-ज्याला तुम्ही वेस्ट बँक म्हणता तिथे तशी जागा द्यावी, त्यावर माझं उत्तर आहे की, इस्राएलचं उत्तर आहे की, तसे होणे नाही ! ज्युडिया, समेरिया किंवा गाझा यांना धक्काही पोचणार नाही.

कारण ज्युडिया-समेरिया आमचे आहेत. हजारो वर्षं ते आमच्या मालकीचे आहेत. गाझाचंही तेच. त्याच्यासह इस्राएल राष्ट्र आहे. जरी बायबल अस्तित्वात नसतं; आमच्या भावना त्यात गुतल्या नसत्या, तरी आमचं संरक्षण महत्त्वाच आहे. आमचं जीवन-मरण ! कारण त्या भागात दोनतृतियांश वस्ती इस्राएलीची आहे. ज्युडिया आणि समेरिया वगळले तर आमचा नायनाट होऊ शकेल !

ओरियाना : जनरल शेरॉन, तुमचा देवावर विश्वास आहे का ?

शेरॉन : हं ! मी तसा धार्मिक नाही, म्हणजे कधीच नव्हतो. तथापि ज्यूंचे काही नियम मी पाळतो. उदा. पोर्क खात नाही; पण मला वाटतं माझा देवावर विश्वास आहे. मी देव मानतो, असं नक्की म्हणू शकतो.

ओरियाना : मग कृपया जे देव मानत नाहीत त्याच्यासाठीसुद्धा तुम्ही अवश्य प्रार्थना करा. कारण आमच्यासह सर्वांना तुम्ही सर्वनाशाच्या गर्तेत लोटणार आहात, अशी भयानक जाणीव मला होत आहे ! ☐

('लंडन टाइम्स' दिनांक ३० ऑगस्ट १९८२ अंकावरून साभार.)

# बेरूतमधील घटना-चक्र

☐ इस्राएलने (स्वसंरक्षणाच्या सबबीवर) जून ८२ मध्ये बेरूतवर आक्रमण केले.

☐ इस्राएलला लेबाननमध्ये स्थिर व मजबूत सरकार हवे आहे. अतर्गत यादवीच्या भीतीमुळे बेरूतमधून आपण फौजा मागे घेऊ शकत नाही, असा त्याचा दावा. रक्तपात टाळून तिथे कायदा-सुव्यवस्था राखणे हे उद्दिष्ट.

☐ फलांजी पक्षनेते बशीर गेमायल (वय ३४) हे २३ सप्टेंबरला लेबाननच्या अध्यक्षपदाची शपथ घेणार होते. तथापी १४ सप्टेंबरला फलान्जिस्ट पक्षाच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बॉबस्फोटात ५०-६० लोकासह ते ठार झाले ! श्री. बशीर हे प्रखर व्यक्तिमत्त्वाचे, लढाऊ वृत्ती आणि कठोर धोरण यांसाठी प्रसिद्ध होते.

☐ लेबाननमधील इस्राएलच्या आक्रमणामुळे अमेरिकन अध्यक्ष रेगन भलतेच 'गरम' झाले. त्या दोन देशांच्या दीर्घकालीन मैत्रीत त्यामुळे बाध निर्माण होईल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

☐ न्यूजवीकने केलेल्या पाहणीत इस्राएलच्या बाजूने ३२ टक्के आणि अरबाच्या बाजूने २८ टक्के मतदान झाले.

☐ बेरूतमधील पॅलेस्टिनी निर्वासितांच्या दोन छावण्यामध्ये शुक्रवारी १७ सप्टेंबरला रात्री अचानक हल्ला होऊन त्यात हजाराहून अधिक नि.शस्त्र नागरिकाची भीषण हत्या झाली. शातिला छावणीत मोठ्या प्रमाणात मृतदेह आढळले. त्याबद्दल ख्रिश्चन लोकसेनेला जबाबदार धरण्यात आले आहे इस्राएल-वरही त्याचे खापर फोडण्यात आले. 'लडन टाइम्स'च्या वृत्तानुसार कत्तल करणाऱ्याची वाहतूक इस्राएली सैनिकांकडून गुरुवारी विमानाने झाली.

☐ छावण्यात आश्रयार्थ असलेल्या निरपराध स्त्रीपुरुष आणि मुलांची हत्या झाली ! मृतदेहांचा खच लपविण्यासाठी बुलडोझरचा वापर करण्यात आला. तथापी हात, पाय, अन्य अवयव इतस्ततः विखुरलेले दिसून येत होते.

☐ लेबाननमधील परिस्थिती आटोक्यात ठेवण्यासाठी बेरूत-मध्ये अमेरिकन, इटालियन व फ्रेंच शातता-फौजा दाखल झाल्या. शिवाय यूनोचे सुमारे ८० निरीक्षक तिथे हजर आहेत.

☐ लेबाननचे दिवंगत भावी अध्यक्ष बशीर गेमायल यांच्या मजुरीनेच पॅलेस्टिनी निर्वासिताच्या छावण्यात फलांजिस्ट घुसले, असे 'वॉशिंग्टन पोस्ट'चे वृत्त आहे. या 'योजने'त हत्याकांड अपेक्षित नव्हते, तर तिथल्या पॅलेस्टिनीना लेबानन सोडणे भाग पाडणे, दहशत दाखवून त्याची घरे नष्ट करणे, काहीना अटक करून चौकशी करणे, गनीम हुडकणे हे हेतू होते. बशीर याचे निकटवर्ती सहकारी इलाई होबेका याच्या नेतृत्वाखाली ही कारवाई झाली. 'न्यूयॉर्क टाइम्स'नेही याच आशयाची बातमी दिली आहे.

☐ जागतिक निषेध आणि वाढत्या दडपणानंतर बेरूत हत्याकाडाच्या चौकशीचा आदेश इस्राएलचे पंतप्रधान मेनाकेम बेगिन यानी दिला आहे. रोनाल्ड रेगन यांच्या प्रतिक्रिया तीव्र स्वरूपाच्या आहेत. भारतासह असख्य राष्ट्रानी या हत्याकांडाची निर्भर्त्सना केली आहे.

☐ लेबाननचे स्वातंत्र्योत्तर ८ वे अध्यक्ष म्हणून श्री. अमीन गेमायल (वय ४०) यांचा शपथविधी झाला. त्यांची मुदत ६ वर्षे आहे. उजव्या नेमस्त ख्रिश्चन फलांजी पक्षाचे ते नेते आहेत. दिवगत श्री. बशीर याचे ते ज्येष्ठ बंधू.

☐ इस्राएली सैन्य आणि संरक्षणमंत्री एरिक शेरॉन यांच्यात परस्पर विश्वास राहिला नसल्यामुळे सैन्यप्रमुख रफाएल ऐतान यानी लष्करी अधिकाऱ्यांच्या एका गुप्त बैठकीनतर श्री. शेरॉन याच्या राजिनाम्याची मागणी केली आहे.

☐ सरकारी स्तरावरील चौकशीत दोषी ठरल्यास आपण सर्व जबाबदारी स्वीकारण्यास तयार आहोत, असे विधान इस्राएल संरक्षणमंत्री श्री. शेरॉन यांनी केले आहे.

☐ लेबानन अध्यक्ष श्री. अमीन यांनी इस्राएलसह सर्व देशांच्या फौजांना लेबानन सोडून जाण्याचे आवाहन केले आहे. तसेच पॅलेस्टिनी निर्वासितानाही आपल्या देशात स्थान नाही, असा इशाराही त्यानी दिलेला आहे. ❖

रंगभूमी

# चार वर्षांपूर्वी 'आकाश' वेगळे होते

पुण्यातला 'शुभारंभा'चा प्रयोग. २६ सप्टेम्बर १९८२. बाल गंधर्व रंगमंदिर. वेळ रविवार सकाळ १० ची. त्यामुळे अर्थात बुकिंग मंद. अनिल बर्व्यांचे चौथे नाटक. व्यावसायिक रंगभूमीवरील. 'आकाश पेलताना.' निर्माता उदय धुरत आणि लेखक बर्वे अर्थात ॲक्सास.

पहिला अंक दाजीसाहेबाचा. एक यशस्वी राजकीय पुढारी. शुगर किंग इ. होम मिनिस्ट्री सांभाळून आलेला. मुख्यमंत्री होण्याच्या प्रयत्नात. सामदामदंडभेदादी सर्व साधने निश्चित आणि बिनधास्त मनाने वापरणारा. अंक चांगला रंगतो. अनिल बर्व्यांची जोरदार टेम्पोची टाळी घेणारी वाक्यं टाळ्या घेऊन जातात.

दुसरा अंक बाप्पाजीचा. एके काळचा ब्रीफलेस बॅरिस्टर. दाजीसाहेबाच्या सपोर्टमुळे व स्वतःच्या कसबाने एक यशस्वी वकील. रिटायर झालेला. एके काळी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेला.

पहिल्या अंकात दाजीसाहेबाचे सर्व कुभांड बाहेर काढण्याच्या तयारीत असलेल्या 'गर्जना' साप्ताहिकाच्या तरुण संपादकाचा खून दाजीसाहेबाच्या गुंडामार्फत झालेला. संपादकाची पत्नी व मुलगी हजर असल्याने त्याही मारल्या जातात. त्याबद्दल संपादकाच्या घरगड्यावर खुनाचा आरोप.

बाप्पाजी घरगड्याची केस घेण्याचे नाकारतो. घरगड्याची पत्नी विन्मुख होऊन परत जाते. त्याच वेळी बाप्पाजीचा ४२च्या चळवळीतील एक सहकारी—'मास्तर'. हजर असतो सध्या आदिवासी चळवळीत असलेला. मारली गेलेली संपादकाची पत्नी त्याचीच मुलगी असल्याचा 'हिंदी' योगायोग. आदिवासी मुलांच्या शाळेसाठी बाप्पाजीने देऊ केलेली तीस हजारांची वर्गणी नाकारून संतापून 'मास्तर' निघून जातो.

बाप्पाजीची मुलगी 'बाबी.' त्या संपादकाची पत्नी 'सुमी' बाबीची वर्गमैत्रीण असल्याचा दुसरा हिंदी 'योगायोग.' बाप्पाजीवर केस घेण्याची नैतिक जबाबदारी येते. ती देखील निव्वळ एक वकील म्हणून नव्हे तर खरा खुनी शोधून अन्यायाचे परिमार्जन करणारा समाज-कार्यकर्ता म्हणून.

तिसरा अंक बाप्पाजी आणि दाजीसाहेबातील द्वंद्वाचा. आकाश म्हणजे दाजीसाहेबाविरुद्धची लढाई. त्याची राजकीय, सामाजिक पापं चव्हाट्यावर आणण्याची मोहीम. ते पेलायला निघालेला बाप्पाजी. निवडणुका तोंडाशी आलेल्या. दाजीसाहेब आपल्या बचावासाठी लढत असतो व मुख्यमंत्री होण्यासाठी. बाप्पाजी 'न्यायासाठी !'

हे नाटक चार वर्षांपूर्वी लिहिले गेले. तेव्हा शेवट वेगळा होता. नावाला साजेसा होता. त्यात बाप्पाजी यशस्वी पण कफल्लक होतो. दाजीसाहेबाला पराभूत करतो आणि देणगी मागायला परत आलेल्या मास्तरला आपल्या फाटक्या कोटातील शेवटचा रुपया देतो. हा शेवट पहिला.

चार वर्षात जग बदलले आहे. बऱ्याच घडामोडी झाल्या आहेत. अनिल बर्वे कांग्रेसवासी झाले आहेत. राजकीय महत्त्वाकांक्षाही निर्माण झाल्या असाव्यात. स्वाभाविक आहे.

'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरी व नाटक मराठी वाङ्मय व नाट्यक्षेत्रात विजेसारखे लखलखून गेले. बर्व्यांचे पहिले व्यावसायिक रंगभूमीवरील नाटक. पहिलटकरणीचा क्रूडनेस व कलम्झीनेस त्यात भरपूर होता; पण गुण एवढे होते की टळक दोषही मराठी लोकांनी पचवले. त्यांनी कादंबरीला व नाटकाला भरपूर दाद दिली.

त्यानंतर बर्वे वाढीस लागले. 'हमीदाबाईची कोठी', 'पुत्रकामेष्टी' ही त्यानंतर चढत्या क्रमातील नाटके. लोकांच्या अपेक्षाही वाढीस लागल्या. एक मॅच्युअर व भारी नाटककार उदयास येण्याच्या अपेक्षा.

'आकाश पेलताना'ने या अपेक्षांचा भंग केला आहे.

तिसऱ्या अंकात घडामोडींची रेलचेल आहे. दाजीसाहेब बाप्पाजीला धमकी देतो. त्याला बाप्पाजी न बधल्याने ॲक्शन घेतो. दाजीसाहेबाच्या मुलाशी, साहेबरावाशी बाप्पाजीच्या मुलीचे — बाबीचे ठरलेले लग्न मोडण्यात येते. कारण कुजबुजले जाते. खोटेच. बाबीच्या 'गैरवर्तना'मुळे. साहेबराव काहीच करू शकत नाही. श्रीमंत व यशस्वी बड्या बापाचा 'छोटा' बेटा. बाबीचा प्रेमभंग. बाप्पाजी आणखी पेटतो.

—आणि मग अचानक दाजीसाहेबाचे, एका रांगड्या व दणकट राजकारण्याचे विद्वान कौटिल्यात रूपांतर होते. आता दाजीसाहेब बोलत नसतो. त्याच्या मुखातून अनिल बर्वे बोलतात. त्यांची नवीन राजकीय नीती बोलू लागते.

महाभारतातील अखेरचे पर्व. शरपंजरी पडलेला भीष्म, राजा कसा निर्माण झाला हे युधिष्ठिराला समजावून सांगत असतो. प्राचीन हिंदू तत्त्वज्ञान व मार्क्सवादाचा भोंगळ मिलाफ राजा वाईट कारण प्रजा वाईट. 'पिपल गेट द गवर्मेंट दे डिझर्व.' एकोणिसाव्या शतकातील ॲंग्लो-अमेरिकन तत्त्वज्ञानाचा मसाला भरीला टाकून दाजीसाहेब उर्फ मॉडर्न युधिष्ठिर एक प्रवेशभर लेक्चर देतो. संपूर्ण नाटकाला एक वेगळी कलाटणी देण्याचा अयशस्वी प्रयत्न.

दाजीसाहेबाने सात खून केले. बर्वेही सात खून करतात; पण पचत नाहीत.

एक बाप्पाजीचा. कारण न्याय्य भूमिकेवरून लढणाऱ्या बाप्पाजीचा अनपेक्षितपणे पराभव होतो. कितीही 'व्यवहार्य' असला तरी अनीतिमान व अनपेक्षित.

दुसरा बाबीचा. यशोमालिका घालून आलेल्या दाजीसाहेबापुढे पाण्याचे भांडे आदळून निघून जाण्याची पोरकट व निष्फळ कृती करून बाबी 'मारली' जाते, साहेबरावाच्या आत्महत्त्येचे शल्य घेऊन.

तिसरा साहेबरावाचा. असहाय्य साहेबराव. त्याच्यावर बाप्पाजीने लावलेल्या खटल्यांना कंटाळून व प्रेमभंगाचे दुःख असह्य होऊन गाडीखाली जीव देतो.

चौथा 'मास्तर'चा. कारण एक अपूर्ण पात्र जन्माला येताच मरते. त्याचा नावनिशाण। शिल्लक राहात नाही.

पाचवा व सहावा भिकू घरगडी व त्याची बायको यांचा. कारण भिकूला तीन खुनांबद्दल सजा लागते व त्याची बायको बाप्पाजीची भाडोत्री प्रचारिका बनते.

सातवा आणि शेवटचा खून नाटकाचा.

नाट्यातील सर्व तंत्रे न जुमानता शेवट केवळ लेक्चरबाजीच्या आधारे करण्याच्या अयशस्वी प्रयत्नात नाटक मरते.

प्रॉडक्शन नीटनेटके आहे. सर्व कलावंतांनी स्टेजवरील व बॅकस्टेजवरील आपापली कामे चोख बजावली आहेत.

डॉ. लागूंनी शेवटी त्यांच्या खांद्यावर कोसळलेले नाटकाचे आकाश पेलायचा कसोशीचा पण अपेशी प्रयत्न केला आहे.

अखेर आकाश बाप्पाजीला पेलले नाही. दाजीसाहेबाला तर नाहीच नाही; पण बर्व्यांना तर बिलकूल नाही !

—जयंत प्रधान

जपानी चित्रपट

# कुरोसावाचा ' इकिरु '

अकिरा कुरोसावा हा सुप्रसिद्ध जपानी चित्रपटदिग्दर्शक आणि ' इकिरु ' हा त्याचा गाजलेला चित्रपट. जपान, उत्तर अमेरिकेत तो खूपच लोकप्रिय झाला.

हृषिकेष मुकर्जींचा 'आनंद' चित्रपट ह्यावरच आधारलेला आहे असं म्हणतात. आता हे सत्य आहे की, चित्रपट–मासिकांनी पसरवलेली ती एक अफवा आणि गोड गैर-समज आहे, हे मला माहीत नाही; पण ' इकिरु ' पहाताना जाणवलं की एखाद्या विषयाची, कथासूत्राची हाताळणी केवढी अर्थपूर्ण, जिवंत आणि खरीखुरी होऊ शकते.

शिमुरा हा एक म्युनिसिपल पब्लिक सर्वंट ' सिटिझन डिपार्टमेंट ' चा प्रमुख. मध्यमवर्ग, उच्च मध्यमवर्गातला. नोकरी-तल्या जिन्यांची चढ–उतार करीत आता प्रमुख पदावर पोचलेला. तो प्रमुख असला तरी आजूबाजूचं वातावरण खास मध्यम-वर्गीय कारकुनी वृत्तीचं. प्रौढ, वृद्धत्वाकडे झुकणारा शिमुरा.

एकाएकी त्याला कळतं आपल्याला कॅन्सर झालाय, फार तर सहा महिने आयुष्य शिल्लक आहे. प्रयोगशाळेतली माणसं त्याच्या माघारी बोलतात, सहा महिने सतत मृत्यूच्या सावलीत जगण्यापेक्षा आत्ताच मेलेलं काय वाईट ?

पण शिमुरा कोणी धैर्याचा मेरुमणी नव्हे. आत्महत्या करण्याचं धैर्य त्याला होत नाही. आयुष्याची चव सपते. दिशाहीन भटकत तो घरी येतो कुणाला सागायचं हे ? बायको तर कधीच साथ सोडून गेली आता आहे मुलगा–बायकोच्या माघारी निष्ठेनं एकटंच राहून ज्याचा सांभाळ केला–आणि त्याची बायको.

अंधाऱ्या घरात शिमुरा एकटाच बसून राहतो. येणाऱ्या मुलाचे आणि सुनेचे शब्द कानावर आदळतात–नवं घर घ्यायला हवं. बाबाच्या निवृत्तीनंतर त्यांचे पैसे येतील, त्यातून.

पण देतील का बाबा ?

नाही तर काय करतील ? अगदी बाबासुद्धा वर जाताना पैसे इथेच ठेवून जाणारेत. आणि त्यांनी दिले नाहीत, तर मी सरळ सांगेन राहू नका इथे !

दिवा लागतो. समोर शिमुरा उभा आहे. प्रेतासारखा चेहरा. मुलगा आणि सुनेचे अप-राधी चेहरे, नंतर येणारी बेफिकिरी. शिमुरा आपल्या खोलीत परततो.

परस्परांच्या मिठीत विरघळून मुलाची आणि सुनेची संपणारी अपराधी भावना. बंद खोलीतून शिमुराला येणारी विनंतीवजा–आज्ञा–बाहेरचे दार लावून घ्या. आम्ही झोपतो आहोत.

कडाक्याच्या थंडीत, थकल्या गात्रांनी, शिणल्या मनानं अवजड दरवाजा लावत शिमुराचं मन मागे जातं. प्रिय पत्नीबरोबर घालवलेले सुखाचे क्षण, अंत्ययात्रेच्या वेळी झपाट्यानं पुढे निघून गेलेली तिची प्रेत-वाहिनी. आजूबाजूच्या लोकांनी आणि विशे-षत: भावानं केलेला आणि आपण टाळलेला पुनर्विवाहाचा आग्रह. मुलामधली गुंतवणूक, त्याच्या सुख–दु:खाच्या क्षणामधला सहभाग आणि आता हा गारठा, अंधार, जवळ येणारा आयुष्याचा शेवट, एकटेपणा, बंद दाराआडून कोरडेपणानं मुलानं केलेली आज्ञा !

शिमुरा धावतच आपल्या खोलीत येतो. जाडजूड पांघरुणाच्या आत आपले हुंदके दाबायचा प्रयत्न करीत रहातो.

नवा दिवस पण जुन्याच चिंतांना घेऊन सामोरा येणारा. शिमुरा ऑफिसला जात नाही. जाण्यासारखं तिथं असतंच काय ? जुनाट टेबल-खुर्च्या, फायलीचे ढिगारे. कोंदट अंधाऱ्या खोल्या. बढत्यांचे हिशेब करणारे सहकारी. कोरड्या माणुसकीहीन वातावर-णात कुणी सखे नाहीत, की कुणी सोयरे नाहीत. इतकी वर्षे नोकरी केली ती चाकोरी म्हणून, कर्तव्य म्हणून. पोट भरण्यासाठी, आपलं व मुलाचं; पण त्यातून मिळालं काही नाही !

मुलाबरोबरच्या संबंधातूनही काही मिळालं नाही आणि मृत्यु आता सहा महि-न्यावर येऊन ठेपला असतानाच कळतंय आयुष्याची बेरीज-वजाबाकी शून्य ! कसलाच आनंद नाही, काहीच कमावल्याचं जाणवत नाही !

घराबाहेर पडलेल्या शिमुराला चिल्लर आणि पोटभरू असा कादंबरीकार भेटतो. आयुष्याचा अर्थ शोधणाऱ्या शिमुराला तो सगळ्या भौतिक सुखांच्या मायाबाजारात हिंडवतो. गैशा, छान–छोकीचे कपडे, खाद्य-पेयं, गाणी बजावणी, जुगार या साऱ्यातून शिमुराच्या लक्षात राहतं एकच गीत– मुली, आजच प्रेम करून घे. अजून गाल गुलाबी आहेत, ओठ लालचुटुक आहेत. उद्याचा भर-वसा कोणी द्यावा ? विषण्ण मनानं शिमुरा परततो.

आणि मग त्याला एक सुखी मुलगी भेटते. त्याच्या ऑफिसमधली ही तरुण मुलगी. आपल्या राजीनामा-पत्रावर त्याची सही हवी म्हणून त्याच्या घरी येते. खूप उत्साह, अगदी खुळचट वाटावा असा. जेमतेम आर्थिक परि-स्थिती. तिच्या रसरशीत जिवंतपणाचं, उत्साहाचं, आनंदाचं शिमुराला आकर्षण वाटतं. तो सतत तिच्या सहवासात रहायचा प्रयत्न करतो. तिला नवे कपडे, बाहेर जेवण, नाटक-सिनेमा या साऱ्यामध्ये शिमुराची मिळकत हां हां म्हणता खर्च व्हायला लागते; पण त्याला त्याची पर्वा वाटत नाही. तिच्या-कडून आपल्याही आयुष्याला अमृताचा स्पर्श व्हावा म्हणून ही सारी खटपट असते; पण शिमुराच्या मैत्रिणीला असा हा म्हातारा, मरू घातलेला मित्र नको असतो. ती शिमु-राला ठणकावते! हे बघ, मुलाला मोठं केलंस तर त्याच्यावर उपकार नाही केलेस. जन्म तूच दिलास ना त्याला ? शिमुराचा मुलगा तर बापाला म्हातारचळ लागला, आता ही कोण प्रेयसी शोधून तिच्यावर पैसा उधळतोय, खानदान की इज्जत मिट्टी में मिला दी वगैरे आरडाओरडा करतो.

त्याच मुलीकडून शिमुराला आयुष्याचा अर्थ कळतो. कुठल्या तरी कामावर श्रद्धा आणि जीव तोडून काम हाच आयुष्याचा अर्थ ! आणि एक दिवस आपल्या सहकाऱ्यांना आश्चर्याचा धक्का देत शिमुरा कामावर हजर होतो.

निवेदक सांगतो, यानंतर पाच महिन्यांनी शिमुरानं या जगाचा निरोप घेतला. या मधल्या काळात त्यानं अविश्रांत श्रम केले आणि शहराच्या अगदी घाणेरड्या आणि गरीब वस्तीच्या भागात मुलांसाठी एक उद्यान बांधलं. त्याच उद्यानात एका सकाळी

तो मृतावस्थेत सापडला !

शिमुराच्या घरी मृत्यूनंतरची क्रियाकर्मं चाललेली. त्याचे सहकारी, वरिष्ठ, आप्तेष्ट जमलेले. मद्यप्राशन आणि त्या जोडीला आपलं महत्त्व वाढेल अशा शिमुराच्या आठवणी सांगणं. कार्यक्रमाचा प्रमुख पाहुणा — मेयर म्हणतो, ओहो ! पार्क नं ? शिमुरानं केलं होतं खरं थोडं-फार काम !

एवढ्यात वार्ताहर येतात. मेयरला बरेच आडवे-तिडवे प्रश्न विचारले जातात उद्यानाचं संपूर्ण श्रेय शिमुराचं असून ते नाकारलं गेलं. त्या भागातले नागरिकही त्याबद्दल बरेच नाराज आहेत — हे सगळं खरं का ? त्यामुळे निराश होऊन शिमुरानं थंडी-पावसात उद्यानात रात्र काढली आणि मरण स्वीकारलं हे खरं का ?

मेयर चांगलाच भडकतो; पण ढोंगी आव टळू न देता म्हणतो, उद्यानाचा आणि शिमुराचा संबंधच काय ? तो सिटिझन विभागाचा मुख्य होता, पब्लिक गार्डन्सचा नव्हे आणि मृत्यूचं म्हणाल, तर शिमुरालाही कदाचित माहीत नसावं; पण मरणोत्तर तपासणीत निष्कर्ष निघाला आहे की, त्याला कॅन्सर होता.

काय झक्क चपखल उत्तरं दिली म्हणून मेयर खुष; पण मेयर निघून जातो तसे माणसांना कंठ फुटतात. मेयरची हाजी हाजी करणारे अधिकारी आणि नोकर आता शिमुरानं केलेल्या कष्टाच्या कामाच्या आठवणी काढायला लागतात. पाच महिन्यात एखाद्या उद्यानाची कल्पनाही मंजूर करून घेणं, लाल फीत, दिरंगाई, भ्रष्टाचार, सहकाऱ्यांची नाखुषी, बड्या धेंडाचे गुतलेले इंटरेस्ट, निरनिराळ्या खात्यांचं सहकार्य मिळवणं आणि या साऱ्यांशी सामना देऊन केवळ पाच महिन्यात गरीब मुलासाठी सुसज्ज उद्यानाची निर्मिती करणं, ज्यांचा कोणी वाली नाही आणि ज्याची बाजू घेऊन कोणी दबाव आणू शकणार नाही, अशासाठी देह झिजवणं हे शिमुरानं घडवलेलं एक प्रशासकीय आश्चर्य आणि मानवतेचा कळस असतो.

प्रथम त्याच्या आठवणी निघतात, त्या कटकट म्हणून. चाकोरी बिघडवणारा आणि मागे लागून कामं करवून घेणारा उपद्रव म्हणून. फ्लॅशबॅकनं एकेकानं त्याच्याबरोबर अनुभवलेले प्रसंग मांडले जातात आणि हळूहळू दारूनं झिंगलेल्या माणसांचे सूर कौतुकमिश्रित आदराचे होतात. शिमुराच्या आयुष्याची, त्याच्या कामाची, स्वभावाची चीरफाड होते आणि प्रत्येक वेळी, प्रत्येक प्रसंगातून बाहेर पडत जातं झळझळीत सत्य, शिमुराचं माणूसपण.

त्याच्या मुलाला वडिलांनी सगळी संपत्ती आपल्याच नावानं ठेवल्याचं कळतं. अंत्यविधीला आली नाही म्हणजे बहुधा कोणी प्रेयसीही नसावी असा निष्कर्ष निघतो आणि त्याला पितृप्रेमाचा नव्यानं उमाळा येतो.

मंडळींना प्रश्न पडतो, शिमुरा एवढा उत्साही तर नव्हता. मग गेल्या पाच महिन्यातच असं काय झालं असावं ? हळूहळू एकेक प्रसंग आठवतात आणि लक्षात येतं, आपलं मरण जवळ आल्याचं त्याला आधीच कळलं असावं. तसं तो स्पष्ट बोलला नसेल कुणाला; पण अनेक वेळा, आता वेळ कमी राहिलाय असं मात्र तो म्हणाला होता. मरणानं माणसं लटपटून मोडून पडतात. शिमुरा मात्र मरणकल्पनेनं अधिकच अस्सल आणि समृद्ध जीवन जगला. उरलेल्या चार—पाच महिन्यांचं त्यानं सोनं केलं. शिमुराची अनेक चित्रं समोर येत रहातात. खात्यातल्या माणसांकडून कामं करवून घेणारा, 'अशक्य काही नाही' म्हणणारा, मेयरपुढे अजीजी करणारा, दुसऱ्या खातेप्रमुखांपुढे चिकाटीने बसून रहाणारा, त्या जागेवर हॉटेल बांधायची इच्छा असणाऱ्या लोकांची शारीरिक दमदाटी सहन करणारा, उद्यानाच्या कामात रोडरोलरच्या धक्क्यानं पडणारा, जिन्याच्या तळाला थकून उभा रहाणारा, सूर्यास्त पाहून हेलावणारा शिमुरा ! तेवढ्यात एक पोलीस येतो, शिमुराची चेपलेली हॅट घेऊन. तो आदल्या रात्री उद्यानावर गस्त घालत असतो. 'मी पाहिलं या गृहस्थाला रात्री पावसात भिजताना, थडीत गोठत ना; पण झोपाळ्यावर बसून एवढं गोड गाणं आनंदात म्हणत होता तो, 'मुली आजच प्रेम करून घे, उद्याचा काय भरवसा ?' की मी हटकलं नाही; पण मी टाळू शकलो असतो कदाचित त्याचा मृत्यू.'

तसबिरीतला शिमुरा शांत डोळ्यांनी पहातोय.

नशेत उत्तेजित झालेली माणस बरळत निर्धार करतात, वचनं देतात. शिमुरा महान होता. आम्हीही त्याच्यासारखं वागू. जनतेची निःस्वार्थ सेवा करू, झटून काम करू.

नवा दिवस.

माणसं टिपटॉप घडीची मनं आणि मख्ख कारकुनी चेहरे ठेवून इकडचे कागद तिकडे करताहेत. नवा सिटिझन विभागप्रमुख कालच्या नशेतून आज नीट भानावर येऊन बसलाय.

कुणी तरी त्याला येऊन सांगतं, 'साहेब, आमच्या भागातलं गटार तुंबलंय.'

मान वर न करता तो खेकसतो, 'मग इकडे काय येता ? तिकडे जा-पब्लिक वर्कस् खात्याकडे !'

कॅमेरा थोडा वेळ त्या जुनाट, कागदी ऑफिसात रेंगाळतो आणि मग मुलं खेळत असलेल्या उद्यानावर येऊन थांबतो.

कसल्याही नैतिक साराचं निवेदन न करता चित्रपट संपतो.

ही कथा एकट्या शिमुराची नाही. ती आहे एका देशाची, एका वृत्तीची कहाणी. माणसातल्या माणूसपणाची,पशूपणाचीकहाणी जगण्यातल्या मरण्याची आणि मरण्यातल्या जगण्याची कहाणी. माणसाची श्रद्धा आणि स्वार्थ, आळस आणि कामाची तळमळ सगळं एकाजवळ एक मांडलंय, कुठल्याही भाष्याविना. आणि हेच तर प्रभावी भाष्य आहे. शिमुराचा देव वगैरे काही होत नाही. तो माणूसच रहातो; पण आपल्या माणूसपणालाच त्यानं सार्थ जपलेलं असतं. मरण सामोरं आलं, तर याला मुरारीलाल म्हण आणि त्याचा बनवारी कर, वगैरे जनरल आनंद पसरवण्याचे उद्योग तो करत नाही.

त्याच्याकडे देखणं रूप नाही आणि तरुणपणी मरण येण्याचं वलयही नाही. तरीही त्याचं मरण चटका लावतं.

शिमुराची ही हृदयस्पर्शी कहाणी कुरोसावानं सौम्य आणि वास्तववादी ढगानं पेश केली आहे.

—ललिता बर्वे

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11)


## इतिहासाने लपवलेली एक कथा

लेखक—विद्याधर पुंडलिक

## माणूस दिवाळी अंक

"तुमचे गांधी गाईकडे Poem of pity म्हणून पहायचे ! आम्ही तिच्याकडे दूध आणि मास याची विपुल कविता म्हणून पाहतो !"
अन् एखादं धान्याचं कणगुलं डुगडुगावं तसे ख्रुश्चॉव्ह हसले. मग एकदम हातातला व्होडकाचा ग्लास उंच करून त्यांनी टोस्ट दिला—
"To this great ancient civilization which yearns for one more revolution !"
"अरे चोरा ! आमचा देश क्रांतीसाठी झुरतो आहे हो ?" मला हवा होता तो क्षण हाच. इथून 'त्या' संगीताच्या मुद्याकडे त्यांना खेचणे अगदी सोपे होते.
मी दुधाचा पेला उंच करून म्हटले, "आमची क्रांती तुमच्याहून वेगळी असते !"
"तुम्ही हिंदू ! आणि हिंदू कधी क्रांती करू शकत नाहीत" ते मिष्किलपणें म्हणाले.
"का बरं ?" मी जीभ ओठात खेळवत म्हटले.
"तुम्ही हिंदू नेहमी स्वप्नच पाहणार....कसली ना कसली... शातीच म्हणा, अध्यात्माचं म्हणा किंवा संगीताच –"
मी पुन्हा चमकलो !
"अन हिंदू कधी माथेफिरू होऊ शकत नाही !"
"तेच आमच्या क्रांतीचं वैशिष्टच !"

## सावरकरांचे रत्नागिरीपर्व : वर्ष पहिले

लेखक—श्री. पु. गोखले

## माणूस दिवाळी अंक

नासिक येथे विसर्जनाच्या मिरवणुकीच्या वेळी अग्रभागी गणपती कोणाचा असावा याचा वाद चालत असे.. वेगवेगळ्या मिरवणुका निघत होत्या. हा दरवर्षीचा वाद सावरकरानी प्रयत्न करून मिटवला.
वर्ष १९२४ : अंदमानहून सुटका झाल्यावर रत्नागिरीतील स्थानबद्धतेच्या पहिल्याच वर्षी. रत्नागिरीत प्लेगची साथ पसरल्याने काही काळ सावरकरांना नासिकला राहण्याची परवानगी सरकारने दिली होती.
वाद कसा मिटला ?
विसर्जनाच्या मिरवणुकीत सावरकरानी पहिले स्थान महारबंधूना दिले. दुसरा मान काठेवाडी मेहेतरांना (भंगी समाज) आणि तिसरा धनगरबंधूंना.
सावरकराच्या जीवनातील रत्नागिरीपर्व उक्ती आणि कृती याचा मेळ साधणाऱ्या अशा अनेक घटनानी गजबजलेले आहे.
हे पर्व एकूण बारा वर्षांचे.
या पर्वाच्या पहिल्याच वर्षात, तुरुंगातून सुटल्यानंतरच्या पहिल्याच आठवड्यात त्यांनी आपल्या समाजसुधारणा कार्याची प्रत्यक्ष सुरूवातही केलेली दिसते.
या वर्षाचा आलेख—